म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क.

# मण ३

श्रीपाद जोशी



REFBK-0017698

चेतक पुस्तक

... २२ ...

# भारत भ्रमण

भाग

तिर

पश्चि

REFBK-0017698

लेखक

श्रीपाद जोशी

किंमत अडीच रुपये

चेतक पुस्तकें

चिराबाजार, मुंबई २

© श्रीपाद जोशी

पहिली
आवृत्ति
१५
सेप्टेंबर
१९६९

मुद्रक
व० बा० खळे
जय गुजरात प्रिंटिंग प्रेस
गांवदेवी
मुंबई ७

प्रकाशक
बा० ग० ढवळे
चेतक पुस्तकें
चिराबाजार
मुंबई २

एकमेव विक्रेते
साहित्य सहकार संघ लि.
नायगांव क्रॉस रोड
दादर, मुंबई १४

…ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

…ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

चि० नारायण
रघुनाथ
ऊर्फ
श्यामराव
जोशी
आणि
चि० सौ० जयलक्ष्मी
जोशी
ह्यांना
स्नेहपूर्वक....

# भ्रमणाची संधि

सन १९४९ पासून १९६० पर्यंत सतत बारा वर्षें दरसाल सर्वोदय संमेलनाच्या निमित्तानें भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत भ्रमण करण्याची संधि मला मिळाली. तत्पूर्वींही सन १९३८ पासून ह्या-ना-त्या कारणानें मी भारतांत भटकलों. अशा प्रकारें गेल्या दोन-अडीच तपांतील भारत-भ्रमणाचा हा अहवाल वाचकांसमोर ठेवतांना मला आनंद होत आहे. ह्यांतील बहुतेक लेख त्या-त्या वेळीं वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं लेख 'माझा देश माझे लोक' ह्या पुस्तकाच्या दोन खंडांत प्रसिद्ध झाले होते. आतां त्या सर्व लेखांचें नीट वर्गीकरण करून नेटक्या स्वरूपांत वाचकांसमोर ठेवण्याचें स्वप्न साकार होत आहे.

माझीं प्रवास-वर्णनें मुख्यतः माहिती देण्याच्या हेतूनें लिहिलेलीं असतात. आजकालचीं प्रवास-वर्णनें ही लघुनिबंधाच्या स्वरूपाचीं असतात. त्यामुळें कांहीं टीकाकार माझ्या प्रवास-वर्णनांना नाकें मुरडतात. परंतु सर्वसामान्य वाचकांनीं माझ्या प्रवासलेखांचें नेहमींच स्वागत केलें आहे. त्यांच्या ह्या आत्मीयतेमुळेंच मी हे लेख पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यास तयार झालों.

ह्यांतील कांहीं लेखांत तत्कालीन व्यक्तींचे व घटनांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामुळें ते कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्या संदर्भांत जी माहिती देण्यांत आली आहे व जी चर्चा करण्यांत आली आहे, तिचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत घेऊन ते लेख तसेच ठेवले आहेत.

कांहीं स्थळांना मीं एकाहून अधिक वेळां भेटी दिल्या आणि त्या-त्या वेळीं त्यांच्यासंबंधीं लिहिलें. ह्यामुळें एकाच स्थानासंबंधीं अधिक लेखही ह्या संग्रहांतून आढळतील. त्यांत क्वचित् कोठें पुनरुक्ति झाली असली, तरी

प्रत्येक लेखाची भूमिका व त्यांतील माहिती ह्यांत खूपच फरक आहे म्हणून ते तसेच राहूं दिले आहेत.

भारताच्या भावनात्मक ऐक्याला हातभार लावावा हाही हे लेख लिहिण्यांतील एक हेतु. सारा भारत एक असल्याचें आपण बोलतों खरें, परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं आपल्याला किती थोडी माहिती असते! ही माहिती नसेल, तर आपण आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार? तेव्हां अशी माहिती आपल्या वाचकांना मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर हिंडतांना जें निरीक्षण केलें, त्याचें चित्र ह्या लेखांतून पाहायला मिळेल. क्वचित् एखाद्या ठिकाणीं स्थानिक लोकांचे दोषही मीं दाखविले आहेत; परंतु ते तिरस्काराच्या, हेटाळणीच्या भावनेनें नसून, वाचकांसमोर सत्यचित्र मांडलें जावें, एवढ्याच हेतूनें. त्यावरून कोणी गैरसमज करून घेणार नाहीं, अशी आशा आहे.

साऱ्या भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची ही माहिती संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडावी. ह्या मालेच्या वाचनानें भारताची व भारतीय लोकसमूहांची थोडीबहुत ओळख वाचकांना होऊं शकली, तर माझें उद्दिष्ट साध्य झालें, असें मी समजेन.

श्रीपाद जोशी

'श्रीरघुवंश', पुणें ४
स्वातंत्र्यदिन, १५ ऑगस्ट, १९६९

ग्रंथालय, ठाणे.
अनुक्रम ... दि:
क्रमांक ... नोंद दि:

# अनुक्रमणिका

भक्तीचें अमर पुष्प ९
जादूनगरी अजिंठा १९
देवगिरीच्या परिसरांत २४
देवगिरीवर ३०
दक्षिण-काशी : पैठण ३४
खानदेशची काशी : प्रकाशें ३८
सूर्या नदीवरील भीम-बांध ४४
वारल्यांची दुनिया ५१
खंडाळ्यांत फुललेला निसर्ग ५८
घारापुरीचें त्रिमूर्ति लेणें ६७
कार्ल्याची कारागिरी ७५
मराठ्यांची पहिली राजधानी : रायगड ८०
प्रतापगड ९०
भंडारदरा ९८
पांच नद्यांच्या उगमावर १०७
कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर ११७
हनुमंतें येथील हनुमान-मंदिर १२४
पूर्वेकडील रोम १२९

# भक्तीचें अमर पुष्प
## (वेरूळचीं लेणीं)

### भक्ति व कला ह्यांचा अद्भुत संगम

दौलताबादचा किल्ला आणि खुलदाबादच्या औरंगजेब, त्याचा गुरु, वगैरेंच्या समाध्या पाहून, जेव्हां रखरखीत उन्हांत आम्ही वेरूळकडे रवाना झालों, तेव्हां वेरूळचीं लेणीं पाहाण्यासाठीं आमचीं मनें अत्यंत उत्कंठित झालीं होतीं. ह्यामुळें बाहेरचें ऊन्ह आम्हांला जणूं जाणवतच नव्हतें. तसें पाहिलें, तर वेरूळचीं लेणीं मला कांहीं अगदींच अपरिचित राहिलेलीं नव्हतीं. त्यांच्यासंबंधीं इतकें वाचलें व ऐकलें होतें, कीं त्यांतील बारीक-सारीक तपशीलही मी तीं लेणीं प्रत्यक्ष पाहाण्यापूर्वींच सांगूं शकलों असतों, किंबहुना, मोटारींतील सह-यात्रिकांना, सह-प्रवाशांना मी अगदीं सराइताप्रमाणें तेथील शिल्पकलेचें सविस्तर वर्णन 'सुनावीत' ही होतों. त्यामुळें त्यांच्या औत्सुक्यांत भर पडत होती, कीं अद्भुताचें अचानक दर्शन घडल्यामुळें मिळणारा त्यांचा आनंद मी हिरावून घेत होतों, ह्याविषयीं विचार करण्याच्या मनःस्थितींत मी होतोंच कोठें ?

परंतु वेरूळला पोंचतांच आम्ही गाडींतून भराभर उड्या टाकून अधाशीपणानें जेव्हां लेण्यांकडे धावलों आणि एकेक लेणें भराभर नेत्रस्थ करूं लागलों, तेव्हां एका वेगळ्याच जगांत आम्ही जाऊन पोंचलों होतों. आपण जें वाचलें किंवा ऐकलें होतें, तें ह्या कलासृष्टीच्या दर्शनापुढें किती फिकें, किती तकलुपी होतें, त्याच्या अनुभवानें मला वाणी आणि लेखणी ह्यांच्या सामर्थ्याच्या मर्यादांची जाणीव झाली आणि माणसाच्या अहंकाराचें हसूंही आलें.

पहिल्या सपाट्यांत सर्व लेणीं भराभर पाहून घ्यायचीं आणि जेवण, वगैरे आटोपल्यावर त्यांपैकीं आपल्याला विशेष आवडलेलीं लेणीं

सावकाशीनें व तपशीलवारपणें पाहायचीं, असें आम्हीं ठरविलें होतें. त्याप्रमाणें जेव्हां माझी पहिली फेरी पूर्ण झाली, तेव्हां माझ्यावर जी छाप पडली, ती कांहीं अवर्णनीयच होती. त्या कलेनें मला मुग्ध केलें होतें, पण त्याचबरोबर तिच्याशीं भक्तीची जी अद्भुत सांगड घालण्यांत आलेली होती, ती पाहून मला एक वेगळेंच समाधान लाभलें. तसा मी कांहीं मोठा धार्मिक किंवा आस्तिक माणूस नाहीं, किंबहुना, थोडाफार नास्तिकच आहें; मूर्तिपूजेचा तर मी विरोधकच आहें. परंतु भारताच्या प्राचीन संस्कृतीविषयीं मला अभिमान वाटतो आणि त्या संस्कृतीचें असें दिव्य-भव्य दर्शन घडलें, कीं मी अत्यंत अभिभूत होऊन जातों. आजही तसेंच झालें. कोणतें तरी अज्ञात आकर्षण मला त्या ईश्वरी मूर्तीकडे पुनः पुनः ओढून नेत होतें. तें केवळ कलेचें होतें, असें मला वाटत नाहीं; त्यांत भक्तीचाही फार मोठा भाग खात्रीनें होता.

लेणीं पाहिल्यानंतर माझ्या मनांत आलें, हें भक्तीचें एक अमरपुष्प आहे. ताजमहाल हें जर प्रीतीचें अमरपुष्प गणलें जातें, तर वेरूळला भक्तीचें अमरपुष्प म्हणायला काय हरकत आहे? ह्या फुलाचें वैशिष्ट्य असें, कीं हें साधें एकेरी पुष्प नाहीं. तिहेरी पाकळ्या असलेलें एक अद्भुत कमलपुष्प आहे. बौद्ध, हिंदु व जैन ह्या तीन धर्मांचीं किंवा संप्रदायांचीं लेणीं येथें आहेत. त्यांच्या मुळाशीं एकमेकांविषयींच्या स्पर्धेचा भाव नसेल, असें नाहीं, परंतु आज तरी तीं एका माळेंत ओवलेल्या वेगवेगळ्या हिरे-माणकांसारखीं भासतात. शेवटीं प्रेम, सौहार्द, सहिष्णुता हींच अमर होतात; स्पर्धा, ईर्ष्या, द्वेष हीं केव्हांना केव्हां गळून पडल्याशिवाय राहात नाहींत. ह्या सिद्धान्ताचें जणूं हें एक मूर्तिमंत प्रमाण आहे. आज हीं लेणीं पाहातांना आपण वैदिक हिंदु आहोंत, कीं अवैदिक जैन-बौद्ध, हा विचार आपल्या मनांत उद्भवत नाहीं. किंबहुना, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, सगळेच ह्या कलेंतील अपूर्वतेनें दिपून जातात.

## ‘ आधीं कळस मग पाया रे ! ’

जेव्हां कोणी एखादी मुलखावेगळी गोष्ट करूं लागतो, स्वाभाविक

क्रम सोडून, विपरीत क्रम आचरूं लागतो, तेव्हां आपण कुचेष्टेनें म्हणतों, " 'आधीं कळस मग पाया' अशी ह्याची रीत आहे. ह्यांत ह्याला यश कसं येणार ?" पण येथें वेरूळच्या लेण्यांत हा उलटा क्रमच स्वाभाविक बनलेला आहे. त्यासंबंधीं आचार्य विनोबा भावे म्हणतात, " हीं लेणीं कशीं बनवलीं आहेत, तें आज आम्हांला लेणीं दाखविणारे गृहस्थ सांगत होते, पण ज्ञानदेवांनीं तेंच लिहून ठेवलें आहे, कीं 'चिंचेच्या पानावर देऊळ केलें । आधीं कळस मग पाया रे ॥' आतां तुम्ही कल्पना करा, ह्या पहाडावर कोठें तरी चिंचेच्या झाडाचें एक पान दगडाला लागलें असेल आणि तेथून त्या लोकांनीं कोरायला सुरुवात केली असेल. आधीं कळस मग पाया केल्याशिवाय लेणेंच बनत नाहीं. ह्या लेण्यावरून आम्हांला भगवंताच्या विश्वरूपाची कल्पना येते. त्यामध्यें 'खालीं शाखा, वर मूळ' असें वरून खालीं यायचें असतें, असें ज्ञानदेवांनीं लिहिलें आहे, परंतु ह्या लेण्यांचें रहस्य ज्ञानदेवांनीं इतकें अप्रतिम मांडलें आहे, कीं तें पाहून त्यांच्या कल्पनाशक्तीविषयीं मन थक्क होऊन जातें. ह्या लेण्यांमध्यें सबंध भक्तिमार्ग प्रगट झालेला आहे."

## भक्तीचें विविध दर्शन

येथें प्रगट झालेल्या भक्तिमार्गाविषयीं विनोबांचें विवेचन फार सुंदर आहे. ते म्हणतात, " योग आणि ध्यान हे कंबर कसून जेव्हां थकतात, तेव्हां विश्रांतीची गरज असते आणि मग ते भक्तीकडे येतात. असें लिहून ज्ञानदेवांनीं एक उपमा दिली आहे. ही गोष्ट तर्कानें किंवा शब्दानें सांगतां येत नाहीं, ती अनुभवायची असते, असें त्यांनीं ज्ञानेश्वरीमध्यें लिहिलेंच आहे. परंतु माणसाच्या मनाची अनुकूल भूमिका करायला उपमा उपयोगी पडते आणि म्हणून त्यांनीं वेरूळच्या लेण्याची उपमा देऊन म्हटलें आहे, 'देव देऊळ परिवारु । कीजे कोरुनी डोंगरु । तैसा भक्तीचा व्यवहारु । का न व्हावा ॥' एकाच दगडामध्यें रावण नांवाचा एक भक्त कोरला आहे, त्याच्या डोक्यावर कैलास पर्वतावर बसलेले शंकर-पार्वती कोरले आहेत, त्यांतच गंधर्व, वगैरे कोरलेले आहेत, फुलें कोरलेलीं आहेत,

इतकें भक्तीचें विविध दर्शन येथें होतें, तरीही एका दगडाशिवाय येथें दुसरें कांहीही नाहीं. जर एका दगडांत इतका सगळा भक्तीचा व्यवहार त्या शिल्पकाराला कोरतां येतो, तर मग आम्हांला अद्वैतामध्यें भक्तीचा व्यवहार कां करतां येणार नाहीं? ह्या उपमेवरून ज्ञानदेवांच्या अद्भुत प्रतिभेचें दर्शन घडतें."

## शुद्ध महाराष्ट्रीय लेणें

ज्ञानदेवांचें स्मरण झाल्यावर ज्ञानेश्वरीचा उल्लेख आल्याशिवाय कसा राहील ? वेरूळच्या लेण्यांजवळ दिलेल्या त्या अप्रतिम भाषणांत ते म्हणाले होते. "येथें वेरूळला जी कलाकृति आहे, तें लेणें अखिल भारतीय आहे, पण ज्याला शुद्ध मराठी लेणें म्हणतां येईल, म्हणजे जरी तें अखिल विश्वाचें लेणें असलें, तरी ज्यांत महाराष्ट्रीय कारागिरांनीं कारागिरी केलेली आहे, असें लेणें म्हणजे 'ज्ञानेश्वरी' होय! आणि हें ज्ञानदेवांनीं स्वतःच लिहून ठेवलें आहे. 'केलें ज्ञानदेवें। गीतेचें देशीकार लेणें ॥' ज्ञानदेवांनीं गीतारूपी पहाडांतून ज्ञानेश्वरीरूपी लेणें निर्माण केलें. तें अगदीं शुद्ध महाराष्ट्रीय लेणें आहे."

विनोबा लेण्यांवरून ज्ञानेश्वरीपर्यंत जाऊन पोंचले. माझी धाव कांहीं इतकी दूर जाऊं शकली नव्हती. तीं लेणीं पाहातांना त्यांचा भक्तीशीं फार जवळचा संबंध आहे, हा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं. ज्या कोणा कलावंताला तेथील डोंगरांत दडलेलीं तीं लेणीं अन्तश्चक्षूंनीं दिसलीं असतील, तो किती थोर असेल! पण त्यानें तर आपलें नांवनिशाणही मागें ठेवलेलें नाहीं. त्याच्यानंतर ज्या कारागिरांनीं त्याचीं स्वप्नें साकार केलीं, त्यांनीं तरी आपला ठावठिकाणा कोठें शिल्लक ठेवला आहे? पांच-दहा मिनिटांसाठीं मोटारींतून येऊन, भर्रकन् निघून जाणारे आम्ही बवे लोक कधीं खडूनें, तर कधीं खिळ्यानें आपलीं नांवें, पत्ते, तारीख, वार, तेथें टिपून किंवा कोरून ठेवतों आणि तें शिल्प विद्रूप करतों. आमची ही नांवाची, कीर्तीची, कीर्तिरूपानें अमर होण्याची हाव कोणीकडे आणि ज्यांनीं हीं लेणीं कोरलीं त्या कलाकारांची

पडद्याआड राहाण्याची वृत्ति कोणीकडे ! कीर्तीच्या बाबतींत इतकें विरक्त बनण्याचें सामर्थ्य त्यांना भक्तीमुळेंच प्राप्त झालें नसेल काय ? ज्या नांवासाठीं माणूस वाटेल तें भलें-बुरें कृत्य करायला मागें-पुढें पाहात नाहीं, तें नांव इतक्या सहजासहजीं विस्मृतीच्या गर्तेत स्वतःच्या हातांनीं फेकून देणें, हा काय लहानसहान त्याग आहे ? पण अशा प्रकारचा त्याग हें आमच्या भारतीय संस्कृतीचेंच अंग आहे, असें म्हणतां येईल. ( इतिहासवेत्त्यांच्या दृष्टीनें हा मोठा दोषही ठरतो ! )

## सर्वांत महत्त्वाचें लेणें : कैलास

दक्षिणोत्तर दीड मैलपर्यंत पसरलेल्या ह्या लेण्यांपैकीं १२ बौद्ध, ५ जैन व १७ हिंदु किंवा ब्राह्मणी लेणीं आहेत. आज जैन हे हिंदूंहून फारसे वेगळे समजले जात नाहींत, किंबहुना, व्यापक हिंदु धर्मांतील जैन हा एक पंथ समजला जातो आणि गौतम बुद्धाला हिंदूंनीं आपल्या दशावतारांत नववा अवतार म्हणून समाविष्ट केल्यानें, त्याचेंही वेगळेंपण विशेष उरलेलें नाहीं. परंतु ज्या काळीं हीं लेणीं कोरलीं गेलीं ( इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून आठव्या शतकापर्यंत ) त्या वेळीं बौद्ध व जैन ह्या अवैदिक संप्रदायांचें वैदिक हिंदु धर्माशीं चांगलेंच हाडवैर चालू होतें, तरी हीं लेणीं गुण्यागोविंदानें एकमेकांशेजारीं नांदत होतीं. ही सहिष्णुता स्पृहणीय नव्हती, असें कोण बरें म्हणेल ? विशेषतः नंतर आलेल्या मुस्लिम मूर्तिभंजकांनीं ह्या लेण्यांमध्यें जो धुमाकूळ घातला, जो विध्वंस केला, मूर्तींना विद्रूप करण्याचें जें लांछनास्पद कृत्य केलें, त्याच्या पार्श्वभूमीवर ही सहिष्णुता विशेषच उठून दिसते, ह्यांत मुळींच शंका नाहीं. वैदिक हिंदूंमध्येंही त्या काळीं शैव व वैष्णव हे एकमेकांशीं कमी शत्रुत्व करीत नव्हते. परंतु त्यांच्या आराध्य दैवताच्या मूर्तिही येथें प्रेमानें एकमेकांशेजारीं शेकडों वर्षें नांदत आहेत, हीं कांहीं कमी कौतुकास्पद गोष्ट नाहीं.

ह्या इतक्या लेण्यांमध्यें जर कोणतें लेणें प्रेक्षकांचें चित्त प्रकर्षानें वेधून घेत असेल, तर तें कैलास ह्या नांवानें ओळखलें जाणारें हिंदु लेणें

होय. येथील लेण्यांमध्येंच तें श्रेष्ठ आहे, असें नव्हे, तर जगांतील कोणत्याही लेण्यांपेक्षां तें अधिक सुंदर आहे. जगप्रसिद्ध कलाकोविद पर्सी ब्राउन ( Percy Brown ) ह्या लेण्याच्या शिल्पाविषयीं म्हणतो, "This plastic decoration is its crowning glory. Something more than a record of artistic form, it is a great spiritual achievement, each portion being a rich statement glowing with meaning. The Kailas is an illustration of one of those rare occasions when men's minds, hearts and hands work in unison towards the consummation of an ideal."

म्हणजे पर्सी ब्राउनच्या मतेंही कैलास लेणें हा केवळ कलाविलास नसून, त्याच्या मुळाशीं आध्यात्मिक प्रेरणा आहे. 'एखादें ध्येय साध्य करतांना जेव्हां माणसांचीं मनें, हृदयें आणि हात एकतानतेनें काम करतात, अशा कांहीं दुर्मिळ प्रसंगांपैकीं कैलास हें एक दृश्य उदाहरण आहे,' असें तो म्हणतो.

कैलास ह्या शिवाच्या अलौकिक निवासस्थानाची हुबेहूब प्रतिलिपि (नक्कल) ह्या लेण्यांतील शिवमंदिराच्या पार्श्वभागावर कोरून त्या स्वर्गीय स्थानाला कलाकारांनीं ह्या भूलोकीं चिरस्थायी बनविलें आहे. एक सबंध टेकडी वरून खालीं कोरत येऊन, हें लेणें ज्यांनीं बनविलें असेल, त्यांच्या अलौकिक दृष्टीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच होईल. कारण नेहमींच्या परिपाटीविरुद्ध त्यांना लेण्याचा वरचा भाग आधीं कोरावा लागला असेल आणि मग त्या प्रमाणांत खालचे भाग कोरावे लागले असतील. ह्या कामाला कमींत कमी शंभर वर्षें लागलीं असावींत. म्हणजे कारागिरांच्या निदान चार पिढ्यांनीं येथें सतत काम केलें असलें पाहिजे. त्यासाठीं त्यांना तीस लाख घनफूट दगड छिन्नीनें तासून काढावा लागला असेल.

कैलास लेण्याचें काम वरून खालीं करण्यांत आलेलें असल्यामुळें त्याचें स्वरूप गुंफेसारखें नसून, एका अखंड दुमजली सुबक देवळासारखें आहे. म्हणजे त्याच्यावर डोंगराचें छत नसून, मध्यें खुलें अंगण आहे. शिवाचें मुख्य देऊळ सुमारें १५०० चौरस फूट क्षेत्रफळाचें असून, तें २५ फूट उंच जोत्यावर कोरलेलें आहे. वर जाण्यास प्रशस्त पायऱ्या आहेत. येथें कोरलेले हत्ती व सिंह अगदीं सजीव असल्यासारखे भासतात. शिवमंदिराचें प्रवेशद्वार पश्चिमेस आहे. मंदिराचें शिखर तीन टप्प्यांचें असून वर एक घुमट आहे. मंदिराची एकूण उंची ९५ फूट असून, मध्यभागीं १६ खांबांवर आधारलेला एक प्रशस्त दिवाणखाना आहे. ह्या दिवाणखान्याच्या भिंतींवर रामायणांतील अनेक प्रसंग कलापूर्ण पद्धतीनें कोरलेले आहेत. ५० फुटांवर नंदीचें देऊळ असून, तें एका पुलानें मुख्य देवळाशीं जोडलेलें आहे. नंदीच्या दोहों बाजूंस एकेक खांब असून, त्यांना ध्वजस्तंभ असें संबोधलें जातें. ह्या स्तंभांवर अनेक शैवपंथीय चित्रें कोरलेलीं आहेत. त्यामुळें हे स्तंभही मोठे प्रेक्षणीय बनले आहेत. येथें कारागिरांनीं दगडांना बोलकें केलें आहे. फक्त त्यांची भाषा समजण्याची पात्रता आपल्यांत हवी, एवढेंच. परंतु कुंचल्यांना व रंगांनाही जें साधणार नाहीं, तें येथें छिन्नीनें साध्य करून दाखविलें आहे, हें कोणालाही सहज कळेल.

क्रमांक १४ च्या ‘ रावण ’ लेण्यांच्या ( ह्याला ‘ रावणाची खाई’ असें म्हणतात. ) दक्षिणेकडील भिंतीवर महिषासुर-वध, शिव-पार्वतीनें मांडलेला सारीपाटाचा डाव, शिवाचें तांडवनृत्य, कैलास पर्वत उचलूं पाहाणारा रावण, वगैरे शैवपंथीय चित्रें कोरलेलीं असून, उत्तरेकडील भिंतीवर वैष्णवपंथीय चित्रें आहेत. येथें दुर्गा, लक्ष्मी, वराहिणी, चतुर्भुज विष्णु, लक्ष्मीसह बसलेला विष्णु, वगैरे चित्रें कोरलेलीं आहेत. शैव-वैष्णवांचें अशा प्रकारें एकाच लेण्यांत सम्मीलन झालेलें दिसतें.

क्रमांक १५ च्या लेण्याचें नांव ‘ दशावतार ’ असें असून, तें दुमजली आहे. येथें गणेश, दुर्गा, वगैरे अनेक देव-देवतांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत

## बौद्ध लेण्यांतील वैशिष्टयें

कालक्रमाचा विचार करतां हिंदु ( वैदिक ) लेण्यांच्या आधीं बौद्ध लेण्यांचा क्रम लागतो. परंतु कैलास हें सर्वांत आकर्षक लेणें असल्यामुळें त्याचा व त्या अनुषंगानें हिंदु लेण्यांचा परामर्श प्रथम घेतला. हिंदु लेणीं हीं जशीं त्यांच्यांतील अद्भुत कलाकुसरीमुळें डोळ्यांत भरतात, तशीं बौद्ध लेणीं त्यांच्या साधेपणामुळें व भव्यतेनें आपल्याला आकर्षित करतात. वेरूळमधील सर्वांत मोठें लेणें किंवा गुंफा ह्या भागांत असून, क्रमांक ५ च्या ह्या लेण्याची लांबी किंवा खोली ११७ फूट व रुंदी ५८ फूट आहे. ह्यांत बाजूच्या ओवऱ्यांचा समावेश नाहीं. बहुधा अतिथिगृह म्हणून ह्या गुंफेचा उपयोग केला जात असावा. क्रमांक ८ च्या लेण्यांत भगवान् बुद्धांच्या बाळपणींचें चित्र कोरलेलें असून, त्यांत त्यांचे आई-वडील आहेत. क्रमांक १० चें लेणें हें वेरूळमधील चैत्य असलेलें एकमेव लेणें. त्याचें नांव विश्वकर्मा. लाकडावर कोरीव काम करावें, तसें ह्या लेण्यांत कलाकुसरीचें काम करण्यांत आलेलें आहे. त्यामुळें त्याचें ‘ विश्वकर्मा ’ हें नांव सार्थच वाटतें. क्रमांक ११ व १२ चीं लेणीं अनुक्रमें दुमजली व तिमजली आहेत. अशा प्रकारचीं एकाहून अधिक मजले असलेलीं लेणीं भारतांत अन्यत्र क्वचितच पाहायला मिळतात. ह्या सर्व बौद्ध लेण्यांतून बुद्धाच्या लहानमोठ्या मूर्ति कोरलेल्या आहेत.

## जैन लेण्यांतील तीर्थंकरांच्या मूर्ति

जैन लेण्यांचा गट हा कैलास लेण्यापासून सुमारें दीड मैलावर आहे. येथील लेण्यांमध्यें इंद्रसभा आणि जगन्नाथसभा हीं विशेष प्रेक्षणीय आहेत. इंद्रसभा ही दोन मजली इमारत काळ्या खडकांत कोरलेली असून, तिची लांबी किंवा खोली २०० फुटांहून अधिक आहे. दगडांतून कोरलेल्या एका भव्य प्रवेशद्वारांतून तेथें प्रवेश करतांच, मनाला एक प्रकारची अपूर्व शांति मिळते. उजव्या बाजूला हत्तीची एक रुबाबदार मूर्ति आहे. वरचा मजला १२ नक्षीदार खांबांवर आधारलेला असून, खालच्या मजल्यावर

२४ तीर्थंकरांच्या मूर्ति आहेत. वेदीवरील छताचा आकार कमळासारखा आहे. दालनाच्या प्रत्येक टोकाला एक एक देव्हारा असून, त्यांत महावीराची मूर्ति आहे. पायाशीं हत्ती असलेली इंद्राची मूर्ति म्हणजे शिल्पकलेचा एक अप्रतिम नमुना आहे. वरच्या मजल्यावरील नाजूक कलाकुसर इतकी सुंदर आहे, कीं कांहीं कलासमीक्षक वेरूळमधील कलाकुसरींत तिला सर्वोच्च स्थान देतात.

जगन्नाथसभा हें लेणें इंद्रसभेसारखेंच, परंतु आकारानें लहान आहे. येथील प्रवेशद्वारावरील तोरण कोणाचेंही लक्ष चटकन् वेधून घेतें. आंत शेवटचे जैन-तीर्थंकर महावीर ह्यांची मूर्ति असून, भिंतींवर व खांबांवर उत्कृष्ट चित्रें कोरलेलीं आहेत. ज्या टेकडीमध्यें जैन लेणीं कोरलेलीं आहेत, तिच्या माथ्यावर खडकांत कोरलेली १६ फूट उंचीची पारसनाथाची मूर्ति आहे. पूर्वी ही मूर्ति उघड्यावरच होती, परंतु सुमारें २०० वर्षांपूर्वी तिच्यावर आवरण उभारण्यांत आलेलें आहे.

वस्तुतः हीं लेणीं कांहीं नुसतीं जातां जातां पाहून टाकावींत अशीं नाहींत. तीं पुनः पुनः अभ्यासपूर्वक पाहिलीं पाहिजेत. ज्यांना शिल्पकलेचें ज्ञान मिळवायचें आहे, त्यांनीं तर त्यासाठीं कितीतरी काळ खर्च केला पाहिजे, पण ज्यांना सर्व कला नीट समजून घ्यायची आहे व तिचा भरपूर आनंद लुटायचा आहे, त्यांनींही तीं फुरसतीनेंच पाहिलीं पाहिजेत. आम्हांला जास्त वेळ थांबणें शक्य नव्हतें, म्हणून घृष्णेश्वराचें दर्शन घेऊन, आम्ही परत फिरलों. अर्थात् लेण्यांना आपण पुरेसा वेळ दिला नाहीं, ह्याची चुटपुट मनाला लागली होतीच, पण पुनः केव्हांतरी सवडीनें येऊन पाहूं, अशी मनाची समजूत घालून, आम्हीं पाहिलेलीं चित्रें मनश्चक्षूंसमोर घोळवीत, आम्ही घृष्णेश्वराचें दर्शन घेण्यास गेलों.

## घृष्णेश्वराचें ओझरतें दर्शन

लेणीं पाहून आम्ही इतके थकून गेलों होतों, कीं एक मैलावर इलागंगा नांवाच्या नदीच्या कांठीं असलेल्या घृष्णेश्वराचें दर्शन घेण्याचा उत्साह आमच्यापैकीं फार थोड्यांजवळ उरला होता. परंतु घृष्णेश्वर हें

बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असल्यामुळें, इतक्या जवळ येऊन त्याचें दर्शन न घेतां परत जाणें, कांहीं धार्मिक प्रवृत्तीच्या मित्रांना बरें वाटलें नाहीं आणि त्यांच्या भावनांचा अनादर होऊं नये, म्हणून आम्हीही त्यांच्याबरोबर गेलों. हें देऊळ औरंगजेबानें नष्ट करून टाकलें होतें व पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर ह्यांनीं तें पुनः बांधलें, असें कांहीं लोकांचें म्हणणें असून, कांहींच्या मतें मल्हारराव होळकरांच्या थोरल्या पत्नी गौतमाबाई ह्यांनीं ह्या मंदिराचा जीर्णोद्धार करविला होता. अर्थात् ह्या दुसऱ्या मताला शिलालेखाचा आधार असल्यामुळें, तेंच ग्राह्य समजावें लागतें.

ह्याचें नांव घृष्णेश्वर, पण त्या नांवाचा नीट अर्थ लागत नाहीं, म्हणून तें घृष्णेश्वर ( घृष्णिः म्हणजे प्रकाशकिरण, ह्यावरून ) असावें, असें काकासाहेब कालेलकरांना वाटतें. तर घुसृणं म्हणजे केशर, ह्यावरून घुसृणेश्वर व त्यावरून घृष्णेश्वर शब्द बनला असावा, असें श्री. गो. ह. फडके म्हणतात. पार्वतीनें केशराचें शिवलिंग केलें होतें, अशी पौराणिक आख्यायिका असल्यामुळें, ही व्युत्पत्तिही चूक वाटत नाहीं.

## येथेंही कोरीव काम

ह्या प्रदेशांत न आढळणारा तांबूस रंगाचा दगड ह्या देवळासाठीं वापरण्यांत आलेला आहे. शिवलिंगही उत्कृष्ट तांबूस दगडाचें आहे. वेरूळचें अद्वितीय शिल्प जवळ असल्यानंतर, हें देऊळ घडविणाऱ्या कारागिरांना आपलें कलाकौशल्य दाखविण्याचा मोह कसा आवरणार ? त्यांनीं मंदिराच्या सभामंडपांतील खांबांवर कोरलेल्या मूर्ति पाहिल्या, कीं मन थक्क होऊन जातें. ह्याचा अर्थ, दोन-अडीचशें वर्षांपूर्वींही जुनी शिल्पकला येथें तग धरून होती. मंदिराचें शिखरही मोठें छान आहे. त्यावर कोरलेल्या मूर्ति अप्रतिम सुंदर असून, मूर्तिकलेंतील भारतीयांची प्रगति दाखविणाऱ्या आहेत. ह्या मूर्तींच्या खालीं जीं नांवें लिहिलीं आहेत, तीं मात्र अशुद्ध आहेत. 'मत्स्य'चें 'मछ' आणि 'बुद्ध'चें 'बुध' झालें आहे. वस्तुतः आपले देव व देवता हीं इतकीं

सर्वपरिचित असतात, कीं त्यांचीं नांवें कोरण्याची कांहींच आवश्यकता नसते. कदाचित् कारागीर मोंगलाईत राहात असल्यामुळें, लोकांना आपल्या देव-देवतांचें विस्मरण झाल्यास, त्यांच्या मूर्ति ओळखण्याच्या कामीं अडचण पडूं नये, ह्या सद्भावनेनें त्यांनीं खालीं नांवें कोरलीं असावींत. तसें करतांना त्यांनीं एखाद्या जाणत्या माणसाकडून त्यांचें शुद्ध लेखन समजावून घेतलें असतें, तर बरें झालें असतें. म्हणजे मूर्ति पाहातांना सुज्ञ प्रेक्षकांच्या डोळ्यांना अशुद्ध लेखन बोचून जो रसभंग होतो, तो झाला नसता.

येथें जिकडे तिकडे शिकारीचींच चित्रें कोरलेलीं दिसतात. त्यांत बंदुकीनें करण्यांत येणाऱ्या वाघाच्या शिकारीचींही चित्रें आहेत. त्यावरुन वेरूळचीं लेणीं कोरणारे कारागीर व घृष्णेश्वराच्या मंदिरांत चित्रें कोरणारे कारागीर वेगवेगळ्या संस्कृतींत वाढलेले असले पाहिजेत, हें उघड दिसतें. मोंगलाईच्या जुलमानें त्रस्त झालेल्या कारागिरांनीं त्या राजवटीविषयींचा आपला राग तर त्या चित्रांच्या द्वारें व्यक्त केला नसेल ?

आम्ही परत फिरलों त्या वेळीं लेण्यांतील अहिंसक चित्रें आणि घृष्णेश्वराच्या देवळांतील हिंसेचीं चित्रें हीं एकमेकांत पार मिसळून, त्यांचा एक गुंताच आमच्या डोक्यांत तयार झाला होता !

# जादूनगरी अजिंठा

१९३६ सालीं फैजपूर कॉंग्रेसहून परततांना जळगांवला उतरुन आम्ही अजिंठ्याला गेलों होतों. त्यानंतर तब्बल सत्तावीस वर्षांनीं, १९६३ सालीं औरंगाबादच्या बाजूनें मी अजिंठ्याला गेलों. परंतु काय आश्चर्य ! आमची बस अड्डयावर थांबतांच समोर जें दृश्य दिसलें, तें पाहातांच मी उद्गारलों, "अरे ! हें तर मी नुकतंच पाहून गेलोंय." सत्तावीस

वर्षांच्या कालखंडानें त्या अद्भुत नैसर्गिक दृश्यांत कांहींच फेरफार केलेला नव्हता, हें तर खरेंच, परंतु बालपणीं पाहिलेलें तें दृश्य मनःपटलावर असें कांहीं खोल कोरलें गेलें होतें, कीं इतक्या वर्षांचा अवधिही तें पुसून टाकूं शकला नव्हता. होय. हीच ती ओहोळवजा वाघोरी नदी, तिला वाट करून देणारे हेच ते आमने-सामने उभे असलेले उत्तुंग डोंगर आणि सभोवतालची हीच ती रम्य वनश्री !

जेव्हां पायऱ्या चढून मी वर गेलों आणि एकेक गुंफा पाहूं लागलों, तेव्हां तेथील तीं चित्रें व शिल्पें पाहून तर जुने मित्र भेटल्याचाच आनंद मला झाला. फरक एवढाच, कीं त्या वेळीं विद्युत्‌दीपांची सोय नसल्यामुळें बॅटरीच्या अंधुक प्रकाशांत पाहिलेलीं चित्रें आतां झगझगीत विद्युत् प्रकाशांत अधिक स्पष्ट दिसलीं व वाटाड्यानें त्यांचीं मर्में समजावून सांगितल्यामुळें, द्विगुणित झालेल्या आनंदाला डोळसपणाचीही जोड मिळाली.

## निसर्गाची कारागिरी

आजिंठ्याला भेट देणारी व्यक्ति पहिल्या प्रथम तेथील निसर्गाच्या देखाव्यानेंच प्रभावित होऊन जाते. अर्धचंद्राकृति पर्वत-रांगेंत हीं लेणीं आहेत आणि पर्वतांच्या मधून छोटी नदी वाहाते. अगदीं जवळ जाईपर्यंत ह्या स्थानाची कल्पनाच येत नाहीं. त्यामुळेंच इ. स. १८२९ पर्यंत हीं लेणीं बाह्य सुसंस्कृत जगापासून दूर राहिलीं. खि. पू २०० पासून इ. स. ६५० पर्यंत म्हणजे साडेआठशें वर्षेंपर्यंत ह्या लेण्यांतील काम चालू होतें. भारताच्या उत्तर-दक्षिण भागाला जोडणाऱ्या मुख्य व्यापारमार्गावर हीं लेणीं होतीं. ह्यावरून त्या भरभराटीच्या काळीं त्यांची किती शान असेल, ह्याची कल्पना येऊं शकते.

निगर्सानें आपल्या दाट झाडींनें व उंच डोंगरांनीं ह्या जागेला एक प्रकारचें संरक्षणच दिलें आहे. मानवी शत्रूंपासूनच नव्हे, तर वादळ-वारा, पाऊस, ऊन्ह, इत्यादि प्राकृतिक आपत्तींपासूनही. बरें, असें असूनही सभोवतालची सृष्टि कांहीं कमी मोहक नाहीं. ह्या गुंफांतून काम करणाऱ्या कारागिरांना ह्या चिरयौवना सृष्टीनें सतत प्रोत्साहित व प्रेरित केलें असेल,

ह्यांत मुळींच शंका नाहीं. ज्या कोणा महाभागानें ही जागा शोधून काढली असेल, तो कोणाही महाकवीपेक्षां कमी प्रतिभावान् नसला पाहिजे.

## अजिंठा व वेरूळ : तुलनात्मक अवलोकन

अजिंठा व वेरूळ ह्यांच्यांतील अंतर सुमारें पन्नास मैलांचें, परंतु दोन्ही ठिकाणच्या कारागिरींत मात्र जमीन-अस्मानाचें अंतर आहे. अजिंठ्यानंतर वेरूळची कला सुरू झाली. चौथ्या शतकापासून आठव्या शतकापर्यंत ती प्रगट झाली. वेरूळला डोंगराच्या वरून खोदकाम सुरू करून, पायथ्यापर्यंत पोंचविण्यांत आलें आहे! तर अजिंठ्याला डोंगराचें पोट पोखरून गुंफा व लेणीं बनविलीं आहेत. अजिंठ्याला फक्त बौद्ध लेणीं, चैत्य व विहार आहेत, तर वेरूळला बौद्ध, जैन व वैदिक (ब्राह्मणी) स्थापत्यकलांचा मोहक संगम आहे. अजिंठ्याला शिल्पकृतींची संख्याही कमी नाहीं, परंतु तेथें पाहाण्यासारखी सर्वोत्कृष्ट गोष्ट, म्हणजे तेथील भिंतींवरील व छतांवरील अप्रतिम चित्रें. रंग-रेषांची जादू पाहावी अजिंठ्यालाच. तेथील चित्रें इतकीं सजीव वाटतात, कीं जणूं कोणा योग्याच्या शापानें तीं नुकतींच वाचाहीन झालेलीं माणसें आहेत, असा भास आपल्याला पदोपदीं होतो. ह्या ठिकाणीं माती, गाईचें शेण व भाताचें तूस ह्यांचा गारा करून, किंवा विटांची पूड व तंतु मिसळून, त्यांचा लेप देण्यांत आलेला आहे व त्यावर चुन्याचा थर बसविण्यांत आलेला आहे. स्थानिक वनस्पति व खनिजें ह्यांपासून तयार करण्यांत आलेले त्या चित्रांचे रंग आजही विटलेले नाहींत, अगदीं ताजे टवटवीत आहेत.

## जातकांतील चित्रें

बौद्धांच्या हीनयान व महायान ह्या दोन्ही पंथांचीं लेणीं येथें आहेत. येथील चैत्यांत व विहारांत कोरलेलीं अप्सरांचीं व यक्षगंधर्वांचीं चित्रें आपलें लक्ष सहज वेधून घेतात. पहिल्या क्रमांकाच्या लेण्यांतील पद्मपाणि बोधिसत्त्वाची उभी मूर्ति चटकन् नजरेंत भरते. येथील एका खांबावर हरिणाचें एक मजेदार चित्र कोरलेलें आहे. त्यांत वेगवेगळ्या अवस्थेंतील चार हरिणें आहेत, परंतु त्यांचें तोंड मात्र एकच आहे.

अजिंठ्याच्या लेण्यांत जातककथांतील आकर्षक प्रसंग चित्रित करण्यांत आलेले आहेत, त्याचप्रमाणें वेली व फुलें ह्यांचीही कारागिरी अत्यंत सफाईदार आहे. भगवान् बुद्धांच्या जीवनाची माहिती असलेल्यांना हीं चित्रें विशेष आकर्षित करीत असल्यास नवल नाहीं. येथें सिद्धार्थ, शाक्य मुनि, बोधिसत्त्व व गौतम बुद्ध हीं बुद्धाचीं विविध रूपें पाहायला मिळतात. शिवाय राजा शुद्धोदन, माता माया, मावशी महाप्रजापति, सावत्र भाऊ नंद, त्याची मरणोन्मुख पत्नी, गोपा यशोधरा, छोटा राहुल, वगैरे सर्वजण आहेत. येथील प्रसंगांत वैविध्यही खूप आहे. कोणी प्रणयी राजा आपल्या प्रमद्वरा राणीला मदिरेचा प्याला घेण्याचा आग्रह करीत आहे आणि ती मानेनें नको-नको म्हणत, पण हातानें तो जवळ करीत आहे, हें मादक चित्र एकीकडे आहे, तर दुसरीकडे नंदाची पत्नी ( बहुधा आपल्या पतीनें बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळें ) उदास होऊन मरणाच्या पंथाला लागली आहे आणि तिची दासी खिन्न मनानें तिची शुश्रूषा करीत आहे, असें करुण चित्र आहे. दुसरा पुलकेशी आणि इराणचा बादशहा दुसरा खुसरो व त्याची पत्नी शीरीन हीं एका चित्रांत एकत्र आलीं आहेत. त्यावरून त्या काळच्या भारत-इराण स्नेह-संबंधांची कल्पना येते. छदंत हत्ती आपल्या सोंडेनें सहाही दांत उपटून ते लोभी पारध्याला देत आहे आणि ते दांत पाहून पूर्वजन्मीं त्याची पत्नी असलेली राणी पश्चात्तापदग्ध झाली आहे. कोठें क्रोधानें आंधळा झालेला राजा आपल्या पायांशीं वेलीप्रमाणें वाकलेल्या दासीला शिक्षा फर्मावीत आहे, तर कोठें इच्छाभोजन मिळाल्यामुळें भिकारी संतुष्ट झाला आहे. कोठें राजाची रुबाबदार मिरवणूक चालली आहे, तर कोठें एक जोडपें हत्तीवरून पळून चाललें आहे. ह्यांतील कांहीं चित्रें आपल्या स्मृतिपटलावर अगदीं पक्कीं कोरलीं जातात. उदाहरणार्थ, क्रमांक २७ च्या लेण्यांतील यशोधरा, राहुल व बुद्ध ह्यांचें चित्र सत्तावीस वर्षांनंतरही माझ्या स्मरणांतून पुसट झालेलें नव्हतें. भगवान् बुद्ध ज्ञानप्राप्ति झाल्यानंतर, आपल्या धर्माच्या प्रसारार्थ भिक्षा मागत, आपल्या-

राजधानींत येतात, तेव्हां यशोधरा दाराआडून आपल्या पुत्राला त्याचे वडील दाखवते आणि सांगते, "जा, तुझ्या वडिलांकडून तुझा वांटा मागून घे." तें चित्र पाहातांना आजही आपले डोळे पाणावतात. सिलोनच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवणारा विजय, वेस्संतराकडे त्याचीं मुलें मागणारा क्रूर जुजक ब्राह्मण, सात तोंडांच्या फणेखालीं उभा असलेला नाग, त्याची पत्नी, दासी, वगैरे कितीतरी चित्रें आपल्या नजरेसमोर तरळत राहातात.

## चैत्य व विहार

अजिंठ्यांतील २९ लेण्यांपैकीं चार चैत्य व इतर सर्व विहार आहेत. ते सर्व पाहिल्यानंतर आपल्या मनांत विचार येतो, हीं लेणीं कोणत्या हेतूनें कोरण्यांत आलीं असावींत ? येथील शिल्पें व चित्रें कशासाठीं व कोणीं बनविलीं असावींत ? ही जागा ध्यानाला उत्कृष्ट आहे, ह्यांत शंका नाहीं. येथील विहारांतील व्यवस्थेवरून येथें पुष्कळच साधु-संन्यासी व विद्यार्थी राहात असले पाहिजेत, असें वाटतें, पण मग चित्रांचें व शिल्पांचें प्रयोजन काय ? सांसारिक व वासनात्मक जीवनाचीं चित्रें समोर ठेवून, ध्यान करण्यांत, कांहीं विशेष औचित्य असेल काय ? आज जीं चित्रें पाहायला विद्युत्‌दीपांचा उपयोग करावा लागतो, तीं त्या अंधारांत इतकीं निर्दोष व प्रमाणबद्ध कशीं बनवितां आलीं ? आजच्या आमच्या यंत्रनिर्मित सीमेंटच्या गिलाव्याचे ढलपे दोन वर्षांतच पडूं लागतात, तर मग दोन हजार वर्षांहून अधिक काळ लोटलेल्या ह्या लेण्यांतील चित्रांचे अजूनही ढलपे पडलेले नाहींत, किंवा रंग उडालेले नाहींत, ह्याच्या मुळाशीं कोणतें रहस्य दडलेलें असावें ? ह्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें आपल्याला मिळत नाहींत. परंतु जगांतल्या कलारसिकांना मोहून टाकणारी एक तरी कलाकृति आपल्या महाराष्ट्राजवळ आहे, ह्याचा अभिमान आपल्याला वाटतो आणि आपण त्या उंच पायऱ्या उतरून खालीं येतों, तेव्हांही जणूं त्या स्वप्निल कलासाम्राज्यांतच विहार करीत असतों.

# देवगिरीच्या परिसरांत

## मराठीच्या माहेरघरीं

१९५१ च्या एप्रिलमध्यें हैदराबादजवळील शिवरामपल्ली ह्या गांवीं अखिल भारतीय सर्वोदय समाजाचें संमेलन भरलें होतें. तें आटोपल्यानंतर नेहमींप्रमाणें जवळपासचीं प्रेक्षणीय स्थानें पाहाण्यासंबंधीं विचारविनिमय सुरू झाला. मी म्हणालों, "ह्या निमित्तानें कां होईना, आपण आपल्या मायभाषेच्या माहेराजवळ आलों आहोंत, तेव्हां आपल्या ह्या विसर पडलेल्या आजोळचं ओझरतं दर्शन अवश्य घेतलं पाहिजे. मराठवाडा हें मराठी भाषेचं माहेर. त्या मराठवाड्याच्या राजधानीसारखं असलेलं औरंगाबाद तरी आपण अवश्य पाहिलं पाहिजे."

"म्हणजे मग आपोआपच दौलताबाद नि वेरूळही होऊन जाईल. आपल्याला ही कल्पना शंभर टक्के पसंत आहे." त्रिकमभाईनीं दुजोरा दिला.

त्याच दिवशीं रात्रीं हैदराबादहून औरंगाबादला जाणाऱ्या गाडींत एका स्पेशल डब्यांत आम्हीं आमच्या पथाऱ्या पसरल्या. संमेलनासाठीं आलेल्या आम्हां लोकांसाठींच तो डबा राखून ठेवण्यांत आलेला असल्यामुळें, गर्दीचा त्रास न होतां, आरामशीर झोप मिळाली.

सकाळीं ७ वाजतां औरंगाबाद स्टेशनवर उतरलों, तेव्हां आमचे समाजवादी मित्र श्री. विजयेंद्र काबरा भेटले. त्यांच्या घरीं गेलों असतों, तर आमची राहाण्या-खाण्याची छान सोय झाली असती, परंतु करणभाई, वगैरे उत्तर प्रदेशचे बरेच मित्र बरोबर होते, त्यांना सोडून जाणें प्रशस्त दिसलें नसतें, म्हणून शहरांत जाण्याऐवजीं स्टेशनजवळच्याच एका धर्मशाळेंत उतरलों.

## बीबीका मकबरा

औरंगाबाद हें कांहीं औरंगजेबानें वसवलेलें शहर नव्हे. खडकी नावांच्या एका अत्यंत प्राचीन शहराच्या भग्नावशेषांवर दक्खनचा

सुप्रसिद्ध हबशी राजकारणी पुरुष मलिकंबर ह्यानें १६१० सालीं हें शहर वसवलें. त्याच्यानंतर त्याच्या फत्तेखान नांवाच्या मुलानें ह्या शहराला फत्तेनगर असें नांव दिलें. तें शब्दशः वडिलोपार्जित असल्यामुळें, त्यानें त्या शहराला आपलें नांव दिलें, ह्याबद्दल त्या काळच्या नीतीचा विचार करतां, त्याला फारसा दोष देतां येणार नाहीं, पण दक्खनचा सुभेदार म्हणून आलेल्या औरंगजेबानें ह्या शहराला आपलें नांव द्यावें, म्हणजे ' आयत्या बिळांत नागोबा ' ह्याखेरीज दुसरी उपमाच त्याच्या ह्या कृत्याला लागू पडत नाहीं.

ह्या शहराला तटबंदी होती, तेव्हां अनेक दरवाजे आणि बावन्न मोहल्ले होते. त्या वेळीं ह्याला दक्षिणेंतील दिल्ली असें म्हणत. औरंगजेबानें ह्याला आपली दक्खनची राजधानी बनविल्यानंतर, तिला खरोखरीच दिल्लीची शान प्राप्त झाली असली पाहिजे.

पुढील काळांत ह्या शहरानें औरंगजेबाच्या जीवनाचा फार मोठा भाग व्यापला ह्यांत शंका नाहीं. तसा महाराष्ट्राचा व औरंगजेबाचा फार घनिष्ठ संबंध. महाराष्ट्राच्या नवोदित हिंदवी स्वराज्याला चिरडून टाकण्यासाठीं त्यानें आपल्या आयुष्याचीं अखेरचीं १९ वर्षें घालविलीं, पण महाराष्ट्रांतील पहाडी ' चुव्यां ' नीं त्याला पहिल्यापासून अखेरपर्यंत खडेच चारले. तसे त्यानें विजय कांहीं कमी मिळविले नाहींत, पण त्या विजयांचा आनंद त्याला मराठ्यांनीं फार काळ लाभूं दिला नाहीं. विजयाचें रूपान्तर पराजयांत होण्यास फार वेळ लागत नाहीं, हें सत्य मराठ्यांनींच औरंगजेबाला व त्याच्या द्वारें सर्व जगाला पटवून दिलें. महाराष्ट्राविषयींची त्याची ही विरोधभक्ति जवळ जवळ दोन दशकांचा महाराष्ट्रांतील त्याचा निवास आणि त्याचा गुरु, त्याची धर्मपत्नी, त्याचा एक मुलगा, सून, गुरुकन्या व तो स्वतः ह्यांनीं दिल्ली-आग्रा सोडून महाराष्ट्रांतच चिरनिद्रा घेण्याचा केलेला संकल्प, ह्या सर्व गोष्टींवरून, श्री. काकासाहेब कालेलकरांनीं म्हटल्याप्रमाणें, त्याला महाराष्ट्रीय समजण्यास कांहींच हरकत नसावी. बाकी त्याचा स्वभाव खास ' मराठी ' होता ह्यांत शंका नाहीं.

तीच जिद्द, तोच ताठरपणा, झालेला अपमान न विसरण्याची वृत्ति, हातीं घेतलेलें काम तडीस नेण्यासाठीं वाटेल तितका त्याग करण्याची तयारी आणि कांहीं झालें तरी तडजोड करण्याचा विचार मनांत येऊं न देणें, हे महाराष्ट्रीय ' गुण ' औरंगजेबांत प्रकर्षानें नव्हते, असें कोण म्हणेल ? केव्हां तरी मनांत विचार येतो, औरंगजेबाशीं समान पातळीवर मराठ्यांची मैत्री झाली असती, तर कोणता चमत्कार घडून आला असता ? भारत-विजयच काय, पण जगज्जेत्या शिकंदरालाही मागें टाकील असा विश्वविजयही त्यांनीं करून दाखवला असता ! पण ...

औरंगाबादमध्यें पाहाण्यासारखीं स्थळें तीन-चारच आहेत. त्यांपैकीं बीबीका मकबरा हें एक आहे. मकबरा म्हणजे एखाद्याच्या कबरीवर—समाधीवर—बांधण्यांत आलेली इमारत. तिलाच रौझा असेंही म्हणतात. असें सांगतात, कीं औरंगजेबानें आग्र्याच्या ताजमहालची एक प्रतिकृति औरंगाबादला बनविली आणि आपला गुरु शाह मुसाफिर ह्याला विचारलें, " ह्या कबरींत कोण विश्रांति घेणार ? " गुरूनें ताबडतोब उत्तर दिलें, " तूं आहेस, तुझी राणी आहे आणि मी आहें. आपणांपैकीं जो कोणी आधीं मरेल, त्याचा हा मकबरा होईल. " औरंगजेबाची राणी राबिया दुराणी हिला आपली सासू मुमताजमहल हिच्याप्रमाणें अमर होण्याची अभिलाषा झाली आणि तिनें घाई करून त्या मकबऱ्याचा ताबा घेतला, म्हणून तो बीबीचा मकबरा झाला. बीबी म्हणजे पत्नी किंवा बाईसाहेब ! बीबीका मकबरा म्हणजे बाईसाहेबांची समाधि !

औरंगजेबानें हा मकबरा बांधून एक प्रकारें आपल्या पित्याशींच स्पर्धा केली आहे. पण मकबरा पाहिल्यानंतर, ह्या स्पर्धेत तो सपशेल हरला आहे, हें चटकन् लक्षांत येतें. कोठें ताजमहाल आणि कोठें हा मकबरा ! कोठें राजा भोज आणि कोठें गंगू तेली ! वस्तुतः औरंगजेबाचा हा प्रांतच नव्हे. कला ही कांहीं स्पर्धेनें साध्य होणारी गोष्ट नव्हे. त्यासाठीं कलावंताचें हृदय हवें. त्याचा अंशही औरंगजेबाच्या ठिकाणीं होता कीं नाहीं, हा संशोधनाचा विषय आहे ! ज्या राणीला त्यानें हा मकबरा

बहाल केला, तिच्यावर त्याचें कितपत प्रेम असेल, ह्याचीही शंका येते. कारण त्याची कबर कांहीं तिच्या कबरीशेजारीं नाहीं. मृत्यूनंतरही जिचा सहवास त्याला प्रिय वाटला नाहीं, त्यानें जिवंतपणीं तिच्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहिलें असेल, हें सहज कळण्यासारखें नाहीं काय?

तसें पाहिलें, तर ताजमहालांत आणि बीबीच्या मकबऱ्यांत बाह्य साम्य पुष्कळच आहे. गिलावा आणि संग-मरवरी बांधकाम ताजसारखेंच आहे. तसेच मिनार, तसाच घुमट, तसेंच समोरचें लांबट टाकें. घुमटाचे भाग शुद्ध पांढऱ्या संग-मरवराचे असून बाकीचा भाग प्लास्टरच्या गिलाव्याच्या अरेबेस्क पद्धतीनें बनवलेला आहे.

तरीही मकबऱ्यांत कांहींतरी उणीव आहे. ताजकडे पाहिलें, कीं एखादें ताजें, टपोरें, टवटवीत शुभ्र गुलाबाचें फूल पाहात असल्याचा भास आपल्याला होतो, तर मकबरा म्हणजे त्याच आकाराचें, पण निर्जीव, कागदी फूल असल्यासारखा वाटतो. कदाचित् आम्ही रखरखीत उन्हाळ्यांत तो पाहिल्यामुळें, आमच्यावर तशी छाप पडली असावी. तरीपण ताजमहालच्या कलाकुसरींतील नाजूकपणा जसा आपल्या डोळ्यांना पदोपदीं जाणवतो, तसा तो येथें जाणवत नाहीं. तशीच कलाकुसर येथें असूनही ती मात्र ओबडधोबड वाटते.

देशोदेशींचे लोक ताजकडे धाव घेतात, ताज पाहून बेहद्द खूष होतात, त्यावर काव्यें करतात, पण बीबीचा मकबरा मात्र विस्मृतीच्या पडद्याआड राहातो. भलत्या क्षेत्रांत पदार्पण केलें, कीं असेंच व्हायचें !

## अद्‌भुत पाणचक्की

बीबीच्या मकबऱ्यापासून एक मैलावर एक मनोरंजक प्रेक्षणीय स्थान आहे. तें म्हणजे पाणचक्की. एका लहानशा चौकोनी बुरुजांतून अहोरात्र पाण्याचा एक लोंढा खालीं पडत असतो. ह्या धबधब्यांच्या जलशक्तीवर एक पाणचक्की चालते. हें पाणी शेजारच्या डोंगरांतून जुन्या मातीच्या नळांतून आणण्यांत आलें असलें पाहिजे. इतकें पाणी अहोरात्र, बारा महिने, तेरा काळ, कोठून येतें, ह्याची मात्र कोणालाच कल्पना नाहीं.

ह्यामुळें ह्या पाणचक्कीभोवतीं एक अद्भुताचें वर्तुळ तयार झालेलें आहे. हें पाणी ज्या हौदांत सांठविलें जातें, त्यांत हजारों मासे असून, असें म्हणतात, कीं ह्या माशांचे पूर्वज औरंगजेबाच्या काळीं ह्या हौदांत आले होते. येथील बागही चांगली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत येथें कसें थंडगार वाटतें.

## औरंगजेबाची समाधि

मलिकंबरनें बांधलेली एक जुनी मशीद येथें आहे. तीही आम्हीं नजरेखालून घातली, पण तिच्यांत आम्हांला कांहीं वैशिष्ट्य आढळलें नाहीं, म्हणून आम्ही ९ मैलांवर असलेला दौलताबादचा किल्ला पाहून, वेरूळकडे रवाना झालों. वाटेंत खुलदाबादला थोडा वेळ थांबून, औरंगजेबाची समाधि पाहून घेतली. औरंगजेब वारला अहमदनगरला, परंतु त्याचें पार्थिव शरीर औरंगाबादला बीबीच्या मकबऱ्यांत नेण्याऐवजीं खुलदाबादसारख्या एका कोपऱ्यांत पडलेल्या खेड्यांत नेऊन, तेथें त्याच्या गुरूच्या समाधीशेजारीं त्याला धराशायी करण्यांत आलें. माया, प्रेम, नातीं, गोतीं ह्यांच्याहून ज्यानें आपल्या जीवनांत धर्मप्रसारालाच अधिक महत्त्व दिलें, त्याला पत्नीऐवजीं आपल्या गुरूचा मरणोत्तर सहवास अधिक प्रिय वाटावा, ह्यांत कसलें नवल ? औरंगजेबाच्या गुरूची कबर पुष्कळच शानदार वाटते, पण प्रत्यक्ष औरंगजेबाची कबर मात्र साधेपणाची कमाल आहे. कबरीमध्यें पक्की वीट किंवा दगड-चुना वापरणें अथवा कांहीं वचन खोदणें किंवा कबरीवर इमारत बांधणें, हें इस्लाममध्यें निषिद्ध आहे, परंतु कालान्तरानें हें बंधन शिथिल झालें आणि दगडा-विटांचीं थडगीं सर्रास बांधण्यांत येऊं लागलीं. आग्र्याचा ताजमहाल किंवा विजापूरचा गोलघुमट हीं ह्याचीं जगप्रसिद्ध उदाहरणें. परंतु कबरीवर मकबरा नसलेली समाधि फक्त औरंगजेबाचीच आहे. त्याची कबर धर्माज्ञेप्रमाणें मध्यभागीं कच्ची ठेवून, कडेनें पक्की करण्यांत आलेली आहे.

हैदराबादच्या निजामानें आतां कबरीच्या आसपास संग-मरवरी जाळी बसविली आहे, परंतु तिच्यामुळें कबरीच्या साधेपणांत कांहीं वैगुण्य

आलेलें नाहीं. औरंगजेबाच्या कर्मठपणामुळें इस्लामी धर्माचा आणि मोंगल साम्राज्याचा कितपत फायदा झाला, हा प्रश्न विवाद्य होऊं शकेल, परंतु धर्मप्रसाराच्या व धर्माचरणाच्या आपल्या वेड्या कल्पनांशीं तो आमरण – आणि मरणोत्तरही – इमानी राहिला, ह्याविषयीं मुळींच शंका नाहीं. त्याच्या ह्या निष्ठेचें कोणीही कौतुकच करील. भारताच्या राजधानी-पासून इतक्या दूर येऊन पडल्यामुळें लोकांना त्याचें विस्मरण फार लवकर होणार, ह्यांत मात्र शंका नाहीं. त्याची कबर दिल्ली-आग्र्याला असती, तर तो इतक्या लवकर जनमानसावरून पुसून जाऊन, केवळ इतिहासाच्या पुस्तकांत बंदिस्त झाला नसता, असें वाटल्यावांचून राहात नाहीं. औरंगजेबाव्यतिरिक्त मलिकंबर, निजामुल्मुल्क, नासिरजंग आणि अन्य अनेक वली व फकीर येथील भूमींत मरणोत्तर विश्रांति घेत आहेत. रोझांच्या ह्या गर्दीमुळेंच बहुधा ह्या गांवाला 'रोझा' असेंही नांव पडलें असावें.

## तीं दीनवाणीं बालकें

औरंगजेबाच्या कबरींतून बाहेर पडलों, तोंच कांहीं गोरींपान, गोंडस मुस्लिम मुलें आमच्या भोंवतीं गोळा होऊन, भीक मागूं लागलीं. इतक्या सुंदर मुलांना भीक मागतांना पाहून माझें हृदय पिळवटून निघालें. मी त्यांना कांहींतरी देणार, इतक्यांत बरोबरचा हिंदु वाटाड्या म्हणाला, " कांहीं देऊं नका त्यांना ! हीं रझाकारांचीं पोरं आहेत. ह्यांच्या बापांनीं आम्हांला 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं होतं. अशीं कितीतरी बालकं त्यांनीं निर्दयपणानें ठार मारलीं आहेत. आपण लोकशाहीचे पुरस्कर्ते नसतों, तर ह्या पोरांचीही तीच गत झाली असती. ह्यांचे बाप आतां तुरुंगांत खडी फोडत असतील, किंवा दंग्यांत मरून गेले असतील." माझ्या डोळ्यांसमोर ते रझाकारी बेबंदशाहीचे दिवस उभे राहिले आणि माझ्या जिवाचा थरकांप उडाला. मीं त्या मुलांकडे तिरस्कारानें पाहिलें, पण लगेच मनांत विचार आला, त्या सगळ्या सैतानशाहींत ह्या निरागस बालकांचा काय अपराध ? त्यांना ही शिक्षा कशाबद्दल ? कशाबद्दल ?...

# देवगिरीवर

## इतिहासांतील एक महत्त्वाचें पान

देवगिरी म्हणजेच दौलताबाद, पण देवगिरी नांवाशीं आपणा मराठ्यांचा इतिहास जसा निगडित झालेला आहे, तसा तो दौलताबादशीं झालेला नाहीं, म्हणून सध्या दौलताबाद हें नांव अधिक प्रचलित असलें, तरी मला देवगिरी हेंच नांव विशेष आवडतें. देवगिरी म्हणतांच तो अल्लाउद्दिन खिल्जी, तो रामदेवराव यादव, त्याचा पराक्रमी व जिद्दी मुलगा शंकरदेव, अल्लाउद्दिनाशीं झालेलें रामदेवरावाचें युद्ध, महाराष्ट्राच्या पांचवीला पुजलेल्या फितुरीमुळें त्याला पतकरावी लागलेली शरणागति, इतक्यांत मोहिमेवरून परत आलेल्या शंकरदेवानें केलेली चढाई आणि मुसलमानांचा समूळ नाश होण्याची वेळ आली असतां, दिल्लीहून कुमक आल्याची उठलेली अफवा व मग हिंदु सैन्याची झालेली दाणादाण ... हा सारा खेदजनक इतिहास दौलताबादचा किल्ला दिसतांच आमच्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

औरंगाबादहून दौलताबादचा किल्ला नऊ मैलांवर असून, औरंगाबादहून वेरूळला जाणारा मोटाररस्ता ह्या ऐतिहासिक किल्ल्याच्या पायथ्याजवळूनच जातो. तेथून पुढें तेवढ्याच अंतरावर म्हणजे ९ मैलांवर वेरूळचीं लेणीं आहेत, म्हणजे औरंगाबादहून वेरूळला जातांना बरोबर मध्यावर दौलताबादचा किल्ला येतो.

किल्ल्याच्या पायथ्याशीं मोटार उभी राहातांच भराभर खालीं उतरून आम्ही मोठ्या उत्सुकतेनें किल्ल्याकडे पाहिलें, तेव्हां आमचा चांगलाच विरस झाला, हें आम्हांला कबूल केलें पाहिजे. आमचा म्हणजे महाराष्ट्रीय मंडळींचा. उत्तर भारतीय मित्रांना तो किल्ला अवाढव्य वाटला, पण ज्यांनीं सिंहगड, रायगडसारखे किल्ले पाहिले आहेत, त्यांस दौलताबादचा

किल्ला म्हणजे दिवाळींतला किल्ला वाटावा, ह्यांत काय आश्चर्य ? कारण हा किल्ला एका सुळक्यासारख्या डोंगरावर (समुद्रसपाटीपासून २२५० फूट) बांधलेला असून, त्याची जमिनीपासूनची उंची फक्त ६०० फूट आहे. म्हणजे मोठीशी पर्वतीच म्हणतां येईल. रोज पर्वतीवर फिरायला जाणाऱ्या पुणेंकरांना हा किल्ला पाहून हसूं आल्यास त्यांत त्यांचा काय दोष ? पण सभोवतालच्या पठारावर हा किल्ला शोभून दिसतो, ह्यांत मात्र संशय नाहीं.

दौलताबादच्या किल्ल्याभोंवतीं कितीतरी तट आहेत व ते ठायींठायीं ढासळले आहेत. त्यांच्यावरून जुन्या वैभवाची, बंदिस्तीची कल्पना मात्र अवश्य येते. त्यांपैकीं पहिला तट म्हणजे नुसती साधी जाडजूड भिंत आहे. तिला बुरूज नाहींत. दुसऱ्या तटास बुरूज आहेस. एक तट तर मूळ डोंगराच्या अंगचाच कोरलेला आहे आणि त्याच्या आंत खोल खंदक आहे. ह्या छोटेखानी किल्ल्याचें रक्षण करण्याचें पुष्कळसें कार्य त्याच्या सभोंवतीं असलेला हा खोल व रुंद खंदकच करीत असला पाहिजे. आम्ही गेलों त्या वेळीं त्या खंदकांत पाणी नव्हतें, परंतु ज्या वेळीं तो पाण्यानें भरलेला असेल, त्या वेळीं शत्रूला तो सहजासहजीं पार करतां येत नसला पाहिजे, ह्याची कल्पना त्याच्या आजच्या स्वरूपावरूनही आम्ही करूं शकलों. अर्थात् ज्या वेळीं लढाईचें स्वरूप अगदींच ओबडधोबड होतें, दूर पल्ल्याचीं शस्त्रें अस्तित्वांत आलेलीं नव्हतीं, त्याच वेळीं अशाच खंदकांचा उपयोग होण्यासारखा होता, हें उघड आहे.

## चांदमिनार ऊर्फ विजयस्तंभ

किल्ल्यांत प्रवेश करण्यापूर्वी कांहीं दरवाजे ओलांडावे लागतात. त्यांपैकीं दुसऱ्या दरवाजाच्या आंतल्या दोन्ही बाजूंस दोन दगडी हत्ती आहेत, परंतु त्यांच्यांत विशेष प्रेक्षणीय असें आम्हांला कांहीं आढळलें नाहीं.

तेथून जरा पुढें गेलें, कीं छोट्याशा कुतुबमिनारासारखा चांदमिनार किंवा विजयस्तंभ आपलें लक्ष वेधून घेतो. हा मिनार १३ व्या किंवा

१४ व्या शतकांत बांधलेला असून, त्याच्यावर मुस्लिम संस्कृतीची व स्थापत्याची छाप स्पष्ट दिसून येते. ह्यालाच कोणी वेधशाळा असेंही म्हणतात. कदाचित् ह्या मनोऱ्यावर चढून कोणींतरी आकाशस्थ ग्रहताऱ्यांचें निरीक्षण केलें असेल.

ह्या मनोऱ्याचें वैशिष्ट्य, म्हणजे त्याची उत्कृष्ट प्रमाणबद्धता. ह्या प्रमाणबद्धतेमुळेंच तो छोटा असूनही प्रेक्षणीय वाटतो. त्याच्या पोटांत असलेल्या जिन्यानें वर चढून बाहेरचें दृश्य पाहाण्यास गंमत वाटते.

हा किल्ला टेकडीसारखा आहे, असें वर म्हटलें आहे, पण त्यावरून त्याची नीट कल्पना येणार नाहीं. वस्तुतः तो एकसंध एका दगडाचा किल्ला आहे, असेंच म्हटलें पाहिजे. म्हैसूर राज्यांतील बाहुबली गोमटेश्वराची टेकडी जशी सबंध एका दगडाची असल्यासारखी दिसते, तशी ही टेकडीही एकाच दगडाची आहे, हें त्यांत प्रवेश केल्यानंतर कळून येतें. किल्ल्याचा मुख्य दरवाजा मोठा भक्कम असून, तो एकदा बंद केल्यानंतर शत्रूचा आंत प्रवेश होणें दुरापास्त होत असलें पाहिजे.

## भुयारासारखा नागमोडी रस्ता

किल्ल्यावर जाण्याचा रस्ता भुयारासारखा व नागमोडी वळणाचा आहे. एकसंध दगडी टेकडी खोदून किंवा कोरून हा रस्ता तयार करण्यांत आलेला आहे. त्यामुळें आंत गुडुप अंधार असतो. दिवा आणि मार्गदर्शक नसेल, तर नवख्या माणसाला वर जातांच येणार नाहीं. आमच्याबरोबर असलेल्या वाटाड्यानें दिवटी पेटवून घेतली होती व तो त्या रस्त्याच्या खुब्या आम्हांला समजावून सांगत होता. त्याच्या स्वरांत एक प्रकारचा मजेदार स्वाभिमान होता. जणूं तो रस्ता त्यानेंच तयार केला होता आणि त्याचीं रहस्यें त्याच्याशिवाय कोणालाच माहीत नव्हतीं ! त्याच्या चेहऱ्यावरील भाव, त्याचे हातवारे आणि त्याच्या स्वरांतील चढउतार ह्यांचीच मला गंमत वाटली. तो सांगत होता...

" इथपर्यंत जरी शत्रु आला, तरी त्याला वर येतां येणं अशक्य होई. ह्या इथें पाण्याचा गुप्त खजिना आहे. वाटेल तितकं सैन्य पोटांत

रिचवण्याची ताकद ह्या तळ्यांत आहे. इथें माणूस पडलं, कीं तें एकदम गुदमरून त्याचं प्रेत खंदकांतच बाहेर पडायचं. नि हा तवा पाहा! ह्याच्यावर जाळ पेटविला, कीं इथवर आलेलं सारं सैन्य गुदमरून नि होरपळून खलास होई. अशा अशा युक्त्या पूर्वींचे लोक योजीत."

बाहेरून एवढीशी टेकडी वाटणारा हा किल्ला आंतून चांगलाच मोठा आहे.

## जयदुर्गे : बालेकोटावरील मोठी तोफ

येथें बालेकोटावर एक प्रचंड तोफ आहे. तशी विजापूरच्या मुलुख मैदान तोफेसारखी ती मोठी नाहीं, पण चांगलीच अवजड आहे. ह्या तोफेच्या बाबतींत माझ्या मनांत ठसलेली गोष्ट म्हणजे तिचें नांव. सगळ्या किल्ल्याचं इस्लामीकरण करण्याच्या प्रयत्नांत निजामाच्या हस्तकांना ह्या तोफेच्या नांवाचें मुस्लिमीकरण करण्याचें स्मरण कसें राहिलें नाहीं, ह्याचें मला आश्चर्य वाटलें. तोफेचें नांव आहे जयदुर्गे! दुर्गा ही भीषण, कराल देवी. तोफेला नांव अगदीं छान शोभतें, पण तोफेचें नांव असें संबोधनात्मक कां ठेवलें असावें? कदाचित् नुसतं दुर्गा नांव मिळमिळीत वाटल्यामुळें 'जयदुर्गे' हें खणखणीत नांव शोधून काढण्यांत आलें असावें. अर्थात् तोफेवर कोरलेलीं अक्षरें मात्र 'श्रीदुर्गा' एवढींच आहेत.

वरच्या बाजूस कांहीं देवळें आहेत. त्यांतील बहुतेकांची मोडतोड झालेली आहे. आतां त्यापैकीं कांहीं देवळांची डागडुजी सुरू आहे. संत एकनाथमहाराजांचे गुरु जनार्दनस्वामी ह्यांची समाधि एका तळघरांत आहे, तेथें नेहमीं पाणी असतें, परंतु आम्ही गेलों तेव्हां फारसें पाणी नव्हतें. एकनाथांचा महाराष्ट्रावर मोठा उपकार, म्हणजे त्यांनीं ज्ञानेश्वरीचें संशोधन करून, ज्ञानेश्वरीची जास्तींत-जास्त शुद्ध व प्रामाणिक प्रत तयार केली, हा होय.

मोडी लिपीचा संशोधक समजला जाणारा हेमाडपंत देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण देवगिरीचाच. रामदेवराव व त्याचा चुलता महादेवराव ह्या

दोघांचाही करणाधिप ( देशांतील जमाबंदीचा मुख्याधिकारी ) म्हणून त्यानें काम केलें होतें. वास्तुकलेंतही त्याचें नांव हेमाडपंती शैलीमुळें अजरामर झालें आहे.

## तो वेडा मुहंमद

आणखी एका व्यक्तीचें स्मरण मला तेथें झालें. ती व्यक्ति म्हणजे वेडा मुहंमद उर्फ दिल्लीचा सुलतान मुहंमद तघलख. त्याला ह्या देवगिरीनें इतकें मोहून टाकलें, कीं त्यानें १३३९ सालीं दिल्लीची राजधानी देवगिरीला नेण्याचा प्रयत्न केला आणि त्या प्रयत्नांत हजारों गोरगरिबांचे प्राण आणि कोट्यवधि रुपयांची मालमत्ता ह्यांची धूळदाण उडाली. ( देवगिरीला दौलताबाद – धननगरी – हें नांव त्यानेंच दिलें. ) मनांत विचार आला, देवगिरीच्या ज्या परिसरानें मुहंमद तघलघाला वेडें केलें, तो त्या काळीं किती सुंदर अशेल ? किती रम्य असेल ? तितकाच रम्य तो आतां होणार नाही का ?

# दक्षिण-काशी : पैठण

## वैभवशाली प्रतिष्ठान

पैठणचें मूळ नांव प्रतिष्ठान. अखिल महाराष्ट्रावर एकछत्री राज्य करणाऱ्या सातवाहनांची ती राजधानी. त्या काळच्या वैभवाच्या खुणा भग्नावशेषांच्या रूपानें आजही पाहायला मिळतात. महाराष्ट्रांत गोदावरीला गंगा म्हणतात. तिच्या कांठीं असलेलें क्षेत्र, म्हणून पैठणला दक्षिण काशी ही संज्ञा मिळाल्याचें कांहीं विद्वान् समजतात, पण तें चूक आहे. पैठण हें रूढ अर्थानें तीर्थक्षेत्र कधींच नव्हतें. तें विद्येचें माहेरघर, संस्कृत पंडितांचें स्थान होतें, म्हणूनच त्याला दक्षिण काशी ही संज्ञा मिळाली. आज

पैठणला एकमेव एकनाथांचेंच माहात्म्य आहे, त्यामुळें त्याला नाथांचें पैठण असेंही म्हणतात. ह्या ठिकाणीं महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक चक्रधर, ज्ञानेश्वर, कृष्णदयार्णव, शिवदिन केसरी, अमृतराय, वगैरे दिग्गज पंडितांनीं व महाकवींनीं आपल्या प्रतिभेचें तेज प्रगट केलें आहे. त्या दृष्टीनेंही ही नगरी दक्षिण-काशी ह्या नांवाला सार्थ बनविते.

## बाहेरचें नाथमंदिर

आम्ही पैठणला औरंगाबादहून गेलों. अंतर ३२ मैल. उत्तम सडकेमुळें दीड तासांत पोंचलों. प्रथम नाथांच्या समाधीचें दर्शन घेतलें. हें स्थान गोदाकांठीं गांवाबाहेर असल्यामुळें ह्याला बाहेरचें नाथमंदिर किंवा नुसतें बाहेरचे नाथ म्हणतात. मंदिर चांगलें प्रशस्त असून, भोंवतीं फरसबंद प्रदक्षिणामार्ग आहे. सभोंवतीं ओवऱ्या आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यांत नाथांच्या पादुका आहेत. मंदिरासमोरचें मैदान चांगलें विस्तीर्ण आहे, पण नाथांच्या निर्वाणदिनीं, फाल्गुन कृष्ण षष्ठीला (नाथषष्ठीला) जमणाऱ्या यात्रेच्या वेळीं एवढें मोठें मैदानही अपुरें पडतें, हें ऐकल्यावर त्या यात्रेची कल्पना आली.

## गांवांतील नाथमंदिर

तेथून आम्ही गांवांतील नाथमंदिरांत गेलों. वाटेंत उदासी बुवांचा मठ, कृष्णदयार्णवांचा मठ, शिवदिन नाथांचा मठ व अमृतरायांचा मठ लागतो. कृष्णदयार्णवांच्या नित्यपूजेंतील कृष्णपाषाणाची गरुडवाहन मनोहर कृष्णमूर्ति विशेषपणें मनांत ठसते.

नाथमंदिरांत गेल्यावर डाव्या बाजूला देवाचा रांजण आहे. ह्याच रांजणांत श्रीकृष्णानें श्रीखंड्याचें रूप घेऊन, बारा वर्षें नाथांच्या घरीं आवडीनें व कावडीनें पाणी भरलें होतें. गोदामाईचें पात्र इतकें खोल आहे, किंवा पैठण गांव इतकें उंचावर आहे, कीं हा रांजण भरतांना श्रीखंड्याची चांगलीच दमछाक होत असली पाहिजे. बरें, रांजणही कांहीं मामुली नाहीं. फाल्गुन कृष्ण द्वितीयेला ह्या रांजणाचा उत्सव असतो.

त्या वेळीं गोदाजलानें हा रांजण भरतांना श्रीकृष्णाच्या कष्टांची चांगलीच कल्पना येते.

मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश करतांना दोन खांब दिसतात. त्यांपैकीं दक्षिणेकडील खांबाला टेकून एकनाथमहाराज पुराण सांगण्यासाठीं बसत. उत्तरेकडील खांब हा उद्धव खांब ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्याच्यावर 'श्रीउद्धव' अशीं अक्षरें आहेत.

ह्या मंदिराचा गाभारा हें नाथांचें वंशपरंपरागत देवघर. त्यांत नाथांच्या पूजेंतला बाळकृष्ण आहे. त्याला 'विजयी विठ्ठल' असेंही म्हणतात. वीतभर उंचीची ही पंचरसी धातुमूर्ति 'दास जेवूं घाला न घाला' अशीं अक्षरें उमटलेल्या विटेवर उभी आहे. गाभाऱ्यांत उजव्या बाजूस विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ति आहेत. तेथेंच एक सहाण दिसते. श्रीकृष्णानें श्रीखंड्याच्या रूपानें ह्याच सहाणेवर गंध उगाळलें होतें.

## शिवरायांचें हस्ताक्षर

पैठणला जाण्यांत नाथांच्या जन्म-कर्म-भूमीचें दर्शन घ्यावें हा हेतु तर होताच, परंतु तेथील श्री. बाळासाहेब पाटील ह्यांच्याकडे असलेलें छत्रपति शिवाजीमहाराजांचें हस्ताक्षर पाहायचें हाही एक महत्त्वाचा उद्देश होता. सुदैवानें श्री. पाटील ह्यांची भेट झाली आणि त्यांनीं पैठण येथील तीर्थोपाध्याय व शिवछत्रपतींच्या कुळाचे परंपरागत पुरोहित असणाऱ्या कावळे कुटुंबियांच्या दप्तरांत सापडलेला श्रीशिवाजीमहाराजांचा अस्सल हस्तलेख आम्हांला मोठ्या आत्मीयतेनें दाखविला. सध्या तो हस्तलेख त्यांच्याजवळ सुरक्षित आहे. दौलताबादी जुन्या अशा ६ इंच लांब व ४ इंच रुंद कागदावर शिवाजीमहाराजांनीं मोडींत लिहिलेला तो मजकूर असा आहे :

"स्वती श्रीमत गोवींदभट कावले यासि लेहुन दीधले प्रतिस्टाणचे तीर्थपुरोहीतपन माहाराजा राजेश्री सीवाजी राजे भोसले ही जो कोन्ही आपल्या वैंषीची येईल तोसी माण्य. सके १५८९ हुकुम." दर्शनी घडींत उपाध्यायांनीं आपल्या हस्ताक्षरांत माहितीसाठीं 'सीवाजी राजे

भोसले ' असें बाळबोध लिपींत लिहिलेलें आहे. पत्राच्या शेवटीं जी मुद्रा आहे, तींत ' श्री भवानी सेंकर प्रसन्न ' हीं अक्षरें दिसतात. रियासतकार कै. गो. स. सरदेसाई वगैरे कांहीं इतिहासकारांनीं हें हस्ताक्षर शिवाजी-महाराजांचें असण्याची शक्यता असल्याचें नमूद केल्याचें व महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांनीं त्या बाबतींत कांहीं शंका उपस्थित केल्याचें माझ्या वाचनांत होतें. परंतु तरीही शिवाजीमहाराजांविषयींच्या भक्तीमुळें म्हणा, अथवा नाविन्याच्या आकर्षणामुळें म्हणा, आम्हीं तो हस्तलेख अत्यंत श्रद्धेनें पाहिला आणि पैठणची आपली वारी सफळ झाल्याची कृतार्थता अनुभविली.

## गोदामाईचें स्नान

तेथून आम्ही गांवाबाहेरील शालीवाहनाचा सुरेख कोरीव दगडी विजयस्तंभ पाहायला गेलों. त्याच्या जवळच प्रतिष्ठानचें नवें उत्खनन झालेलें आहे. त्या उत्खननांत इतिहासपूर्व काळांतील अवशेषच नव्हे, तर मानवपूर्व अवस्थेंतील आदिमानवाचे अवशेषही सापडले असल्याचें समजलें. परंतु ते सारे हैदराबादच्या पुराण-वस्तु-संग्रहालयांत असल्यामुळें आम्हीं फक्त तेथील खड्डेच पाहिले. त्याच्या शेजारींच नागघाट किंवा नागतीर्थ आहे. गोदेचा हा घाट अरुंद पायऱ्यांचा व खूप उतरता आहे. ह्याच्या एका बाजूला बक्षी सावकारानें केलेल्या जीर्णोद्धाराचा शिलालेख आहे आणि दुसऱ्या बाजूला एका बुरुजावर रेड्याची कोरीव पण पुसट प्रतिमा आहे. ह्या ठिकाणीं ज्ञानदेवांनीं रेड्याकडून वेद वदविले होते, त्याचें हें स्मारक. ह्या घाटावर अनेक सत्पुरुषांनीं स्नानें केलीं असतील. अनेक ग्रंथकारांनीं येथें बसून ग्रंथही लिहिले असतील. भागवताचे एक भाष्यकार कृष्णदयार्णव ह्यांनीं आपल्या भागवत टीकेचा कांहीं भाग येथेंच बसून लिहिला होता. ह्या सर्व घटनांच्या साहचर्यामुळें हें स्थान विशेष पुनीत वाटतें. आम्ही तेथें क्षणभर विसावलों. स्नान करण्याची कल्पना मुळांत नव्हती. त्या तयारीनें आम्ही गेलोंही नव्हतों, परंतु आईला पाहातांच मुलानें तिच्या अंगावर झेप घ्यावी, तितक्या सहजतेनें आम्ही

अंगांतील कपडे काढून पाण्यांत उतरलों आणि गोदामाईच्या वात्सल्यांत मनसोक्त डुंबलों. तेथें पाण्याला ओढ बरीच होती, पण आम्हांला त्याची भीति काय ?

## इतर कांहीं ठिकाणें

परत येतांना नाथांच्या जीवनांतील कांहीं ठळक ठिकाणें वाटाड्यानें दाखविलीं. ज्या ओट्यावर बसून पैठणचे ब्राह्मण एकनाथमहाराजांची कुचाळकी करीत, तो कुचर ओटा परळकरांच्या मठाजवळ आहे. नाथांच्या अंगावर एकवीस वेळां ( कीं एकशें आठ वेळां ) थुंकून त्यांना तितक्यांदा स्नान करायला लावणाऱ्या एका मुसलमानाचें चित्रही रस्त्यांत एके ठिकाणीं पाहायला मिळालें. मौलानासाहेबांचा दरगा व सय्यद सआदतसाहेबांचा दरगा हींही प्रेक्षणीय स्थळें असल्याचें वाटाड्याकडून समजलें, परंतु आम्ही इतकें पाहिलें होतें, इतके चाललों होतों, कीं शरिराप्रमाणें मनही थकून गेलें होतें. म्हणून पुढच्या खेपेसाठीं कांहीं ठिकाणें मागें ठेवून आम्ही तडक बसस्टँडवर पोंचलों.

# खानदेशाची काशी : प्रकाशें

## क्षेत्रांचें स्थानिक माहात्म्य

आपल्या देशांत जागजागीं कितीतरी प्रसिद्ध व पवित्र क्षेत्रें आहेत. त्यांतील कांहींची ख्याति त्या त्या प्रदेशापुरतीच मर्यादित असली, तरी त्यांचें महत्त्व त्यामुळें मुळींच कमी होत नाहीं. जे लोक अखिल भारतीय कीर्तीच्या क्षेत्रांची तीर्थयात्रा करूं शकत नाहींत, त्यांना आपल्या ह्या स्थानिक क्षेत्रांची तीर्थयात्रा करूनच दुधाची तहान ताकावर भागवावी लागते.

भारतांतील सर्वांत श्रेष्ठ व लोकमान्य क्षेत्र म्हणजे काशी अथवा वाराणसी. 'काशीस जावें नित्य वदावें' ही म्हण तर आपल्याकडे सर्वतोमुखींच आहे. सर्वांनाच काशीस जाणें जमत नाहीं. हल्लीं जरी तें पुष्कळच सोपें झालें असलें, तरी एके काळीं काशीला जायचें म्हणजे जणूं परलोकगमनच असे. अशा स्थितींत आपल्या भागांतील एखादें स्थान निवडून, त्यालाच आपली 'काशी' बनवण्याचा विचार लोकांना सुचला असल्यास नवल नाहीं.

अशीं स्थानिक काशीक्षेत्रें बहुतेक प्रत्येक प्रांतांत आहेत. आपल्या महाराष्ट्रांतच नाशिक, कोल्हापूर व पंढरपूर हीं तीन क्षेत्रें स्वतःला 'दक्षिण काशी' म्हणवीत असल्याचें आपल्याला माहीत आहे. कांचीपुरमला तामिळनाडचे लोक आपली 'दक्षिण काशी' समजतात, तर हळेबीडचें महत्त्व कर्नाटकच्या दृष्टीनें काशीहून कमी नाहीं.

खानदेशांतील प्रकाशें हें क्षेत्रही असेंच आहे. 'खानदेशाची काशी' असें त्याचें वर्णन करण्यांत येतें. पश्चिम खानदेशच्या (आतांचा धुळें जिल्हा) शहादें ह्या तालुक्याच्या ठिकाणापासून तें नऊ मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं मी नुकताच जाऊन आलों.

## पावसाळ्यांतील तापदायक मार्ग

ह्या क्षेत्राची काशीशीं इतर कोणकोणत्या बाबतींत तुलना होऊं शकेल, हा प्रश्न थोडा वेळ बाजूस ठेवला, तरी एका बाबतींत ती खासच होऊं शकेल. पूर्वींच्या काळीं काशीला जाणें जसें अवघड होतें, तसेंच प्रकाश्यापर्यंत जाऊन पोंचणें, निदान पावसाळ्यांत तरी, भयंकर अवघड असल्याचा मला अनुभव आला. हल्लीं मुंबईला गाडींत बसलें, कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपण काशीला जाऊन पोंचतों. वाटेंत कोठें गाडी बदलावी लागत नाहीं, कीं इतर कसली चिंता करावी लागत नाहीं. ह्याच्या उलट प्रकाश्याला पोंचणें, म्हणजे महान् दिव्य आहे. तापी नदीच्या पलीकडे हें गांव वसलेलें आहे आणि तापीवर पूल बांधण्याच्या बाबतींत खानदेशमध्यें अत्यंत हेळसांड झालेली आहे. त्यामुळें पावसाळ्यांत ही

तापीमाई आपल्याला पावलोपावलीं अडविते. धुळें, नंदुरबारच्या बाजूनें जाणारा रस्ता पावसाळ्यांत बंदच असतो. म्हणून मी प्रथम दोंडाइचें (पश्चिम रेल्वे) येथें गेलों आणि तेथून मजल दरमजल करीत प्रकाश्याला पोंचलों.

## वेग नसलेला तापीचा प्रवाह

दोंडाइचें तें टाकरखेडें हा आठ मैलांचा प्रवास एस्. टी. च्या बसनें सुखाचा झाला. टाकरखेड्याजवळ तापी नदी ओलांडून सारंगखेड्याला जायचें. तापी नदीचें पात्र येथें कांहीं फार खोल नाही. उन्हाळ्यांत गुडघाभरच पाणी असतें, पण मी गेलों तेव्हां बरेंच पाणी होतें. ह्यामुळें नावेंतून जावें लागलें. येथें तापीचें एक मजेदार वैशिष्ट्य पाहायला मिळालें. ह्या ठिकाणीं तापीच्या प्रवाहाला वेग असा मुळींच नाहीं, त्यामुळें नाव वाऱ्यावरच चालवावी लागते. आम्ही गेलों त्या वेळीं वारें चांगलें होतें. ह्यामुळें पंधरा मिनिटांत आम्ही पलीकडे गेलों, पण ज्या वेळीं वारें नसतें, तेव्हां हें एक दीड फर्लांगाचें अंतर तोडण्यास नावेला तीन ते चार तासही लागतात, असें मला सांगण्यांत आलें ! अर्थात् वाहतूक पुरेशी नसल्यामुळें यांत्रिक नावा ठेवणेंही शक्य नाहीं. आतां ह्या ठिकाणीं एक पूल बांधायचें काम चालू आहे, तें पुरें झालें, म्हणजे ह्या मार्गानें थेट मध्यभारतांत इंदूरपर्यंत जाऊन पोंचतां येईल असें म्हणतात. तसें झाल्यास ह्या भागाची चांगलीच भरभराट होईल.

## वेळ निघून गेली, तरी भान नाहीं

एस्. टी. च्या नोकरांबद्दल ज्या अनेक तक्रारी प्रत्यहीं वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात, त्यांचा अनुभव मला तापी ओलांडून पलीकडे गेल्यावर, सारंगखेडें ह्या ठिकाणीं आला. बसचा कंडक्टर आपल्या हिशेबांत इतका गढून गेलेला होता, कीं बसची वेळ टळून गेल्याचेंही त्याला भान राहिलें नाहीं. त्यानंतरही सारें काम अगदीं संथपणें चाललें होतें. त्याच्या त्या हलगर्जीपणाचा पुढें आम्हांला चांगलाच त्रास झाला.

## सायकलप्रवासाचा लाभ

सारंगखेड्याहून ९ मैलांवर असलेल्या शहादें गांवीं आम्ही पोंचलों, तों दहा मिनिटांपूर्वींच प्रकाश्याची मोटार निघून गेल्याचें आम्हांला कळलें. वस्तुतः आमची गाडी येईपर्यंत त्या मोटारनें वाट पाहायला हवी होती, पण कोण कोणाला विचारणार ?

आमच्यापुढें मोठा प्रश्न उभा राहिला. त्यानंतरची गाडी चार तासांनीं जाणार होती. म्हणजे तोंपर्यंत थांबल्यास आम्हांला प्रकाश्याला अडकून पडावें लागलें असतें. कारण परत येतांना सोयीची गाडी नव्हती. म्हणून आम्ही गांवांतील हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना भेटलों. त्यांच्याकडे भोजन केलें आणि दोन सायकली मिळवून आम्हीं स्वावलंबी होण्याचें ठरविलें. शहादें ते प्रकाशें हें अंतर ९ मैल असल्यामुळें तेवढा सायकलप्रवास सहज शक्य होता. परंतु समोरचें वारें असल्यामुळें चांगलाच त्रास झाला. तरीपण वेळ वांचल्यामुळें समाधानांत आम्हीं तो त्रास नजरेआड केला.

## तराफ्यावरून गोमती ओलांडली

सहा मैल गेल्यावर डामरखेडें लागलें. तेथें पुनः गोमती नदीनें (हिला गोमई किंवा गोमी असेंही म्हणतात.) आम्हांला पुनः अडविलें. पाणी छातीइतकें असेल-नसेल, पण सायकली व कपडे संभाळून स्वतः पलीकडे जाणें आम्हांला शक्य नव्हतें. त्या ठिकाणीं तराफे तयार होते. साधीं लाकडें एकमेकांस बांधून, त्यांवर एक बाक ठेवलेलें होतें. पाण्यांतली रिक्षाच जणूं. भिल्लांप्रमाणें दिसणारीं काळींकुळकुळीत, पण तरतरीत कोळ्यांचीं तरुण मुलें सेवेला हजर होतीं. दोघांनीं दोन सायकली घेतल्या व दोघांनीं तराफा (ह्याला ते ताफा म्हणतात.) ओढून पैलतीराला नेला. माणशीं दोन आणे (व प्रत्येक सायकलला दोन आणे) द्यावे लागले. पुढें समजलें, कीं त्यांचा हा दर ठरलेला नसून, पाणी जितकें जास्त चढेल, तितका

त्यांचा दर वाढत असतो. कांहीं दिवसांपूर्वी त्यांनीं माणशीं एक रुपयाही घेतला होता, असें आम्हांला सांगण्यांत आलें. अडवणूक किंवा काळाबाजार हा कांहीं फक्त व्यापाऱ्यांना व सरकारी नोकरांनाच करतां येतो, असें नाहीं !

## टेकडीवर वसलेलें प्रकाशें

गोमती नदी ओलांडून पलीकडे गेल्यावर थोड्याच वेळांत टेकडीवर वसलेलें प्रकाशें दिसूं लागलें. तापी नदीच्या कांठचीं ह्या भागांतलीं गांवें अशींच टेकड्यांवर वसलेलीं दिसतात. इकडे तापी नदीला सहसा पूर येत नाहीं, कारण तिचे किनारे खूप उंच आहेत, परंतु जेव्हां पूर येतो, तेव्हां मात्र तो अगदीं प्रलयंकारी असतो. त्यापासून बचाव व्हावा, म्हणून टेकड्यांचा आधार गांवांनीं घेतलेला असतो. हीं गांवें टेकड्यांवर चांगलीं शोभून दिसतात, ह्यांत मात्र मुळींच शंका नाहीं.

गांव दिसूं लागतांच माझ्या सायकलनें एकदम असहकार पुकारला. तिचें फ्रायव्हील नादुरुस्त झालें आणि पॅडल काम देईना. जणूं आतांपर्यंत कसेंबसें ती मला घेऊन आली होती. आपल्याला फार चालावें लागलें नाहीं, ह्यांतच समाधान मानून, आम्हीं गांवांत प्रवेश केला आणि सायकल दुरुस्तीला टाकून आपल्या कामाला लागलों.

मुख्यतः तेथील ग्रामीण विद्यालय पाहायलाच मी गेलों होतों. तें पाहिलें, मुख्याध्यापकांशीं चर्चा केली आणि त्यांना मी म्हणालों, "तुमच्या गांवाची कीर्ति बरीच ऐकली आहे. तेव्हां इथलं सर्वांत महत्त्वाचं स्थान तुम्ही आम्हांला दाखवा, म्हणजे संध्याकाळ होण्यापूर्वी आम्हांला परत जातां येईल."

## तीर्थक्षेत्र म्हणून मंदिरांची गर्दी

ते म्हणाले, " हें मुख्यतः तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळें इथें मंदिरांची गर्दी असणं साहजिकच आहे. हीं सगळीं देवळं पाहायचीं, म्हणजे

तुम्हांला दोन दिवस तरी काढावे लागतील. इथलं उत्खननाचं काम आतां संपलेलं असून, तिथें फक्त एक खड्डा राहिलेला आहे. पावसामुळें त्या खड्ड्याच्या आसपासची जमीन भुसभुशीत झाली आहे. म्हणून तिथें जाणं फार धोक्याचं आहे. तेव्हां आपण येथील मुख्य मंदिर पाहून घेऊं. तें म्हणजे केदारेश्वराचं मंदिर."

## नयनरम्य नदीकांठीं केदारेश्वर

त्याप्रमाणें आम्ही तापी नदीच्या कांठाकांठानें सुमारें तीन-चार फर्लांग दूर असलेल्या केदारेश्वराच्या मंदिरांत गेलों. ह्या ठिकाणीं तापी नदींत काळेभोर खडक वर आलेले आहेत. समोर खळखळणारी तापी नदी आणि कांठावरील खडकांच्या समूहांत बसलेलें केदारेश्वराचें देऊळ दुरून मोठें सुंदर दिसतें. देवळाच्या आवारांत उभें राहिलें, कीं गार वारा शरिराला सुखवूं लागतो.

## मुसलमानी धाटणीचें देऊळ

हें देऊळ मीं लांबून पाहिलें, तेव्हां ती मशीद असावी, असाच भास झाला. ह्याचें कारण असें, कीं मंदिरावर शिखर नसून, मशिदीसारखे घुमट आहेत. भारतीय शिल्पकलेच्या एखाद्या अत्यंत अवनतीच्या काळांत हें देऊळ बांधलें गेलें असावें. किंवा दुरून मुसलमानांची फसगत व्हावी, म्हणूनही देवळाचा आकार-प्रकार मशिदीसारखा ठेवण्यांत आला असावा. देवळासमोरची दीपमाळही हिंदु पद्धतीची भरीव नसून, मशिदीसमोरच्या मनोऱ्यासारखी आहे. ती आंतून पोकळ असून, वर जायला शेवटपर्यंत पायऱ्या आहेत. अशा प्रकारची दीपमाळ मला हिंदुस्थानांत इतरत्र पाहायला मिळाली नाहीं.

## कलाकुसरीचा मागमूसही नाहीं

ह्या देवळांत शिल्पकला, चित्रकला, मूर्तिकला, वगैरे कसल्याही कलेचा मागमूस नाहीं. केदारेश्वर व विश्वेश्वर ह्यांच्या मूर्ति म्हणजे

नुसत्या पिंडी आहेत. शाळुंका नाहींत. त्यांच्यावर शाळुंकांचा आकार नंतर बांधलेला आहे. तेव्हां तेथेंही कलाकुसरीला वाव नाहीं. देवळाच्या आवारांत कांहीं भग्नावशेष बाहेरून आणून ठेवलेले आहेत. ते मात्र चांगले कलापूर्ण आहेत. ह्यावरून ह्या गांवांत पूर्वी केव्हांतरी शिल्पकलेची चांगली प्रगति झाली असावी, असा अंदाज बांधतां येतो.

## दरोडेखोर सच्चिदानंदस्वामी

ह्या देवळाशीं एक आधुनिक घटना संबद्ध आहे. एकदा एक दरोडेखोर ह्या ठिकाणीं येऊन राहूं लागला. प्रथम त्यानें मडक्यांतून सोनें काढण्याची किमया ( नजरबंदीच्या हातचलाखीनें ) लोकांना करून दाखविली आणि त्यांचा विश्वास संपादन केला. पुढें कनक आणि कांता ह्यांच्या बाबतींत अनाचारांचा धूमधडाका सुरू केला, पण लवकरच त्याचें बिंग बाहेर फुटलें आणि आतां आपल्याला तुरुंगांत जाऊन खडी फोडावी लागणार असें दिसतांच, त्यानें ह्या देवळाच्या तटावरून, भरलेल्या नदींत उडी टाकून, आत्महत्या केली. अर्थात् गांवापासून हें देऊळ बरेंच दूर, निवान्तस्थानीं असल्यामुळें ह्या ठिकाणीं ही लबाडी बरेच दिवसपर्यंत चालूं शकली.

## पुष्पदंतेश्वराचें माहात्म्य

ह्या केदारेश्वराच्या जवळच, पुष्पदंतेश्वराचें देऊळ आहे. काशीला शंकराचीं जीं शेकडों देवळें आहेत, त्यांत पुष्पदंतेश्वराचें देऊळ नाहीं. म्हणून ह्या भागांतील लोक काशीयात्रा करून आल्यानंतर आधीं प्रकाश्याला येतात व पुष्पदंतेश्वराचें दर्शन घेऊन यात्रेची समाप्ति करतात. जोंपर्यंत पुष्पदंतेश्वराचें दर्शन घेतलें नाहीं, तोंपर्यंत काशीयात्रा सफळ होत नाहीं, अशी इकडे समजूत. त्यामुळें ह्या क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

ह्याखेरीज गोमती व तापी ह्यांच्या संगमावरील संगमेश्वर देऊळही प्रेक्षणीय आहे. नदीच्या पैलतीरावर केदारेश्वराच्या समोरच सिद्धेश्वराचें

देऊळ आहे. त्या देवळाची स्वतःची ३० एकर जमीन असून, तें चांगलें संपन्न आहे. गुजरात व महाराष्ट्र ह्यांच्या सीमेवर प्रकाशें असल्यामुळें येथें येणाऱ्या यात्रेकरूंत गुजराती लोकांचाही बराच भरणा असतो.

अशा प्रकारें हाताशीं असलेल्या थोड्या वेळेचा उपयोग करून, आम्हीं जेवढें पाहातां येण्यासारखें होतें तेवढें पाहिलें आणि उल्हसित मनानें परत फिरलों. वारा मागील बाजूनें असल्यामुळें सायकल चालवितांना मुळींच श्रम पडले नाहींत आणि वेळेवर शहाद्याला पोंचलों.

ठरल्याप्रमाणें शहाद्याची बस वेळेवर सुटली नाहींच, पण टाकरखेड्याजवळील बस आमच्यासाठीं थांबली होती. त्यामुळें सकाळीं निघालेले आम्ही १२ तासांत चोवीस मैलांचा प्रवास करून, दोंडाईचेंला सुखरूप परतलों.

# सूर्या नदीवरील भीम-बांध

## जंगलांत लपलेलें सौंदर्य

देश आणि प्रदेश ह्यांच्याप्रमाणेंच नद्यांचा शोध लावण्याची हौसही मानवामध्यें फार प्राचीन काळापासून असली पाहिजे. 'ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ शोधायला जाऊं नये' अशी म्हण आपल्याकडे प्रचलित असली, तरी आतांपर्यंत आपण बहुतेक ऋषींचीं कुळें आणि नद्यांचीं मुळें शोधून काढलीं आहेत. ह्या दोन्हीची सांगड ही म्हण करणाऱ्यानें कां घातली असावी, हें मात्र समजत नाहीं. कारण ऋषीचें कूळ मोठें भानगडीचें आणि नीतीच्या रूढ कल्पनांशीं मेळ न बसणारें

असतें व म्हणून त्याच्या मुळाशीं जाण्यानें धर्मभावनेला धक्का लागण्याची भीति असते, परंतु नदीचें मूळ अनेक ठिकाणीं इतकें सुंदर व निसर्गरम्य असतें, कीं तेथपर्यंत जाण्यानें नदीसंबंधींची पवित्र भावना वाढीस लागण्याचीच शक्यता अधिक असते. अर्थात् कांहीं नद्यांचीं मुळें अगदींच सामान्य असतील आणि तीं पाहून नदीसंबंधीं अनादराची भावना माणसाच्या मनांत निर्माण होऊं नये, ह्या हेतूनेंच बहुधा ही म्हण तयार करण्यांत आली असावी.

परंतु त्यामुळें आपण फार मोठ्या आनंदाला मुकलों आहोंत. नदीचें मूळ शोधायला माणूस निघाला, कीं जंगलांतून व डोंगरकपाऱ्यांतून लपलेलें सौंदर्य त्याच्या दृष्टीस पडतें आणि तो त्या आनंदानें बेहोष होऊन जातो. ही बेहोषी पाश्चात्य लोकांमध्यें खूप मोठ्या प्रमाणावर सापडते. ते लोक वेगवेगळ्या नद्या, सरोवरें, धबधबे शोधून काढतात आणि मग आपण ते पाहायला जातों; परंतु आपल्याला मात्र अशीं सौंदर्यस्थळें शोधायला जाण्याची प्रेरणा होत नाहीं. त्यामुळें अगदीं आपल्या शेजारीं असलेलीं सुंदर ठिकाणेंही आपल्याला माहीत होत नाहींत.

## सूर्या नदीवरील भीम-बांध

आतां सूर्या नदीवरील भीम-बांधाचेंच पाहा ना! डहाणूरोड (पश्चिम रेल्वे) पासून १७-१८ मैलांवर, जव्हारच्या रस्त्यावर, कासें नांवाचें एक लहानसें गांव आहे. येथून जवळच सूर्या नदी वाहाते. ह्या नदीवर एक नैसर्गिक धरण आहे. ह्याला तेथील आदिवासी लोक 'भीम-बांध' म्हणतात. हा बांध म्हणजे निसर्गाचा खरोखरी एक चमत्कारच आहे. पण आपल्यापैकीं किती लोकांना ह्याची माहिती होती? कासें येथें सर्वोदय केंद्र सुरू झाल्यामुळें अनेक ठिकाणची बडीबडी मंडळी तेथें जाऊं लागली आणि मगच आम्हांला ह्या धरणाचा शोध लागला. आतां तेथें जाणाऱ्या पाहुण्यांच्या कार्यक्रमांत हा बांध पाहाणें हा एक महत्त्वाचा कार्यक्रम होऊन बसलेला आहे.

## काळ्याकभिन्न फत्तरांचा बांध

परवां ( ८ फेब्रुवारी, १९५७ रोजीं ) मी तो बांध पाहून आलों आणि आपण एक अद्भुत व नवलाची गोष्ट पाहिल्याचें समाधान मला झालें. कासें सर्वोदय केंद्राचे उत्साही संचालक व माझे जुने मित्र श्री. मुरलीधर घाटे आणि त्यांच्या सेवाभावी पत्नी सौ. सरस्वतीताई ह्यांनीं मोठ्या अगत्यानें त्या बांधाची माहिती सांगितली आणि तेथील बारीकसारीक गोष्टी दाखविल्या. हा बांध पाहाण्यासाठीं मुख्य रस्ता सोडून, शेतांतून जावें लागतें. भातें निघालीं असल्यामुळें पायवाट अगदीं छान मळलेली होती. नदीच्या जवळ पोंचतांच काळ्याकभिन्न अखंड दगडाचा एक लांबरुंद बांध पाहून आपलें मन हरखून जातें. ह्या बांधावरून एक मोटार किंवा दोन बैलगाड्या सहज जाऊं शकतील, इतका तो रुंद आहे. त्याची लांबीही चांगली एक-दीड फर्लांग आहे. वस्तुतः निसर्गनियमानें वर आलेला तो एक लांबलचक खडकच आहे. पण त्यांत खडबडीतपणा मुळींच नाहीं. लोण्यासारखा काळा गाळ पाण्यांनीं आणून, हें धरण बनविलें असावें असें वाटतें. हा बांध मध्येंच थोडा फुटल्यासारखा असून, त्यांतूनच सूर्या नदी झुळूझुळू वाहात असते.

## महालक्ष्मी देवीची चलाखी

हा बांध असा अपूर्ण कसा राहिला ? भूस्तर शास्त्रज्ञांजवळ ह्याचें उत्तर असेलच, पण तें आदिवासींना कसें पटणार ? त्यांनीं आपल्या ( आणि इतरांच्याही ) समाधानासाठीं एक लोककथा तयार केली आणि ती शेकडों-हजारों वर्षांपासून त्या भागांत प्रचलित आहे.

जेव्हां पांडव ह्या जंगलांतून वनवासाला ( किंवा तीर्थयात्रेला ) चालले होते, तेव्हां ते ह्या सूर्या नदीवर येऊन पोंचले. नदी ओलांडतांना महाप्रतापी भीमाची नजर समोरच असलेल्या महालक्ष्मीच्या डोंगराकडे गेली. डोंगरावरील महालक्ष्मी दिसतांच, कांहींही करून हिच्याशीं आपण लग्न लावायचेंच, असें त्यानें ठरविलें. त्याच्या

स्वभावाप्रमाणें तो महालक्ष्मीकडे जाऊन तिला लग्न करण्याबद्दल धमकी देऊं लागला. बिचारी महालक्ष्मी घाबरली. ह्या दांडगटापुढें आपला कांहीं निभाव लागणार नाहीं असें पाहून, तिनें देवांचें पूर्वापार चालत आलेलें कपटाचें शस्त्र वापरण्याचें ठरविलें. तिनें आवाजांत गोडवा आणि प्रेमळपणा (अर्थात खोटा!) आणून भीमाला सांगितलें, "मी तुमच्याशीं लग्न करायला आनंदानें तयार आहें. पण त्यासाठीं माझी एक अट आहे, ती तुम्हीं आधीं पुरी केली पाहिजे!"

"कसली अट? बोल लवकर!" उतावळेपणानें भीम बोलला.

"ही जी सूर्या नदी समोर वाहाते आहे ना, तिला बांध घालून, तुम्ही तिला माझ्या ह्या देवळासमोर घेऊन या, म्हणजे मी तुमच्याशीं लग्न करीन."

"हात्तिच्या! एवढंच ना? हें काम तर माझ्या हातचा मळ आहे!" भीम खुषींत येऊन म्हणाला.

"पण तें काम एका रात्रींत झालं पाहिजे. सकाळीं कोंबडा आरवायच्या आंत जर बांध पुरा झाला नाहीं, तर माझी आशा तुम्ही सोडा!" महालक्ष्मीनें बजावलें.

"कांहीं हरकत नाहीं, आजच्या रात्रींत मी हा बांध पुरा करतों!" असें म्हणून भीम परत नदीवर आला.

भीमानें मोठमोठ्या प्रचंड शिळा उचलून आणून नदींत टाकल्या आणि पहाट होण्यापूर्वींच बांध जवळजवळ पुरा होत आला. परंतु थोडीशी जागा उरली, तेथें घालण्यासाठीं दगड भीमाला मिळेना, म्हणून तो आपली पाठ लावून तेथें बसला. त्याबरोबर पाणी अडलें आणि महालक्ष्मीच्या डोंगराच्या बाजूनें हळूहळू वाहूं लागलें.

तें पाहातांच महालक्ष्मीचें धाबें दणाणलें. आतां आपल्याला खरोखरीच ह्या रांगड्या माणसाशीं लग्न करावें लागणार, हें कांहीं तिला रुचेना आणि मग देवांची कपटनीति अवलंबिण्याचें तिनें ठरविलें.

तिनें एका कोंबड्याचें रूप धारण केलें आणि पहाट होण्यापूर्वींच ती 'कुकूच कू ऽ ऽ' करून मोठ्यानें आरवली.

बिचारा भोळा भीम !

पहाट होण्यापूर्वींच ज्या अर्थी कोंबडा आरवला, त्या अर्थी येथें कांहींतरी दगाफटका असला पाहिजे, एवढी साधी गोष्ट हजार हत्तींचें बळ असणाऱ्या त्या मानवाच्या डोक्यांत कांहीं आली नाहीं. त्याला वाटलें, आपण कामांत असल्यामुळें पहाट झालेली आपल्याला कळली नसावी ! इतकी मेहनत घेऊनही अखेर महालक्ष्मी आपल्याला मिळत नाहीं हें पाहून, तो भयंकर निराश झाला आणि आतां थंडींत कुडकुडण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून, तो उठून उभा राहिला. त्याबरोबर सूर्या नदीचें पाणी महालक्ष्मीच्या डोंगराकडे जाण्याऐवजीं त्या मोठ्या फटींतून वाहूं लागलें.

थोड्याच वेळानंतर खरी पहाट झाली आणि खरे कोंबडे आरवूं लागले, तेव्हां भीमाला आपली झालेली फसवणूक कळून आली, पण आतां तो कांहींच करूं शकत नव्हता. देवीच्या धूर्तपणाला लाखोली वाहात, दांत-ओठ खात, तो गप्प बसला.

देव आणि असुर ह्यांच्या संघर्षांत जें घडत असे, तेंच देव आणि मानव ह्यांच्या झगड्यांत घडलें ! शक्तीवर बुद्धीनें विजय मिळविला.

देवांच्या कुटिलतेची कायमची खूणच जणूं ती आहे.

## भीमाच्या पाठीची गुळगुळीत जागा

ह्या बांधामध्यें भीमानें पाठ लावलेली जागा अत्यंत मजेदार आहे. काळ्या खरासारखा एक गोल खड्डा तेथें असून, समोरच्या बाजूस एक छोटासा उंचवटा आहे. त्याच्या दोहों बाजूंनीं भीमानें आपल्या मांड्या सोडल्या होत्या. ही खोळ इतकी नैसर्गिक वाटते, कीं खरोखरीच एखादा भीमकाय पुरुष तेथें कांहीं क्षणांपूर्वीं बसला असावा आणि नुकताच तेथून उठून गेला असावा, असा भास होतो.

## खबदाडांतील छोटीशी पणती

ह्या बांधामध्यें वेगवेगळे मजेदार आकार पाण्याच्या प्रवाहामुळें बनलेले आहेत. त्यांतील एक पणती आहे. इतकी प्रमाणबद्ध आणि मोहक पणती मुद्दाम तयार करूनही बनवितां येणार नाहीं, असें वाटतें. ही पणती अशा खबदाडांत आहे, कीं तेथपर्यंत वाराही पोंचूं शकणार नाहीं, जणूं कांहीं वाऱ्यापासून ज्योतीचें रक्षण करायलाच ती कोणींतरी तेथें निर्माण केलेली आहे.

## भीमाच्या भाकऱ्यांची चवड

नदीच्या पलीकडल्या बाजूस एका शिळेवर गोल गोल रेघा आहेत. त्या भीमाच्या भाकऱ्या. त्यांच्यासमोरच एक छोटासा गोळा आहे, ती त्याची चटणी. आदिवासींचा भीम तूप-रोटी थोडाच खाणार ? त्याला चटणी आणि भाकरीच मिळायची !

सूर्यास्ताच्या उदास गंभीर वातावरणांत आम्हीं त्या धरणाचा निरोप घेतला. माझ्या मनांत राहून राहून भीमाची झालेली फसगत येत होती. आदिवासी माणसाला आजपर्यंत सर्वांनींच लुबाडलें आहे, सर्वांनींच फसविलें आहे. तेव्हां त्याच्या भीमदेवाची फसगत महालक्ष्मीनें केली असली, तर त्यांत काय आश्चर्य ?

पण आतां हा आदिवासी भोळा-भाबडा राहाणार नाहीं. त्याला फार दिवस फसविणें किंवा लुटणें इतरांना शक्य होणार नाहीं. तो हा भीम-बांध दुरुस्त करील आणि सूर्या नदीच्या पाण्यावर आपली खडकाळ जमीन भिजवून तेथें फळबागा निर्माण करील, तेव्हांच त्या वंचित प्रतापी भीमाच्या आत्म्याला समाधान लाभेल !

# वारल्यांची दुनिया

## अत्याचारी चळवळीचा परिणाम

ठाणें जिल्ह्याच्या डहाणू-उंबरगांव विभागांत तेथील 'वारली' नांवाच्या आदिवासींवर वर्षानुवर्षें चालत आलेल्या अन्यायांविरुद्ध कम्युनिस्टांनीं १९४५-४६ सालीं एक अत्याचारी स्वरूपाची चळवळ सुरू केली होती, हें आपल्यापैकीं अनेकांना आठवत असेल. किंबहुना, कम्युनिस्टांच्या त्या चळवळीमुळेंच 'वारली' हें नांव ठाणें जिल्ह्याच्या बाहेरील लोकांना माहीत झालें, असें म्हणायला हरकत नाहीं. कम्युनिस्टांचा अत्याचारी मार्ग कोणाला पटो वा न पटो, जेथें जुलूम, अन्याय चालू असेल, तेथें जाऊन त्याला वाचा फोडण्याचें जें कार्य त्यांनीं गेलीं कित्येक वर्षें चालविलें आहे, त्याबद्दल त्यांना योग्य तें श्रेय दिलेंच पाहिजे. कम्युनिस्टांचा मार्ग विध्वंसक, विनाशक आहे, विधायक दृष्टि त्यांच्याजवळ नसते, ह्यामुळें भारताच्या विशिष्ट परिस्थितींत त्यांना यश मिळणें अशक्य, परंतु समाजांतील घाण शोधून काढून तिच्याकडे आम जनतेचें व राज्यकर्त्यांचें लक्ष वेधणें हें त्यांचें कार्य फार महत्त्वाचें आहे, ह्यांत शंका नाहीं.

## गुलामांप्रमाणें शेतीवर राबत

ठाणें जिल्ह्यांतील बहुतेक शेती मोठमोठ्या जमीनदारांच्या मालकीची असून, कित्येक वर्षें आदिवासी लोक गुलामांप्रमाणें त्या शेतीवर राबत असत. वस्तुतः एके काळीं ही सर्व जमीन आदिवासींच्या मालकीची होती, परंतु इराणी, पारशी, गुजराती, मारवाडी, ब्राह्मण, वगैरे प्रत्यक्ष शेतींत काम न करणाऱ्या जमातींच्या लोकांनीं भल्याबुऱ्या मार्गांनीं ही सगळी जमीन त्यांच्यापासून बळकावून घेतली व त्यामुळें त्यांच्या

कृपेवर जगण्याची पाळी आदिवासींवर आली. ह्या परिस्थितींतून सुटण्याचा एकच मार्ग होता आणि तो म्हणजे आदिवासींना त्यांच्या भूमीचे पुनः मालक बनविणें. परंतु ती गोष्ट घडून येण्यास वाजवीपेक्षां अधिक काळ लागला.

## आदिवासींची विखुरलेली वस्ती

हा सर्व विभाग डोंगराळ व जंगलांनीं भरलेला आहे. येथील गांवें देशावर असल्याप्रमाणें एकत्र गोळा झालेलीं नसून, कोकणांतल्याप्रमाणें सर्वत्र विखुरलेलीं आहेत. एक गांव अनेक वाड्यांत विभागलेलें असतें. ह्या वाडीला पाडा असें म्हणतात. उदाहरणार्थ, कैनाड हें तीन हजार वस्तीचें गांव दहा-बारा पाड्यांत विभागलेलें आहे. प्रत्येक पाडा दुसऱ्या पाड्यापासून मैल-दोन-मैल दूर आहे. प्रत्येक पाड्यावर पांच-दहा घरें किंवा झोपड्या असतात. ह्यामुळें आपण एका गांवाचे रहिवासी आहोंत, ही भावना येथील जनतेंत उत्पन्न होऊं शकत नाहीं. मग अर्थातच सहकारी अथवा सामुदायिक कार्याची वा जीवनाची गोडी त्यांना लावणें कठीण जातें. कम्युनिस्टांनीं आजपर्यंत त्यांच्यांत केवळ सरकार व जमीनमालक ह्यांच्याविषयीं द्वेषभाव निर्माण करण्याचीच खटपट केली. ह्यामुळें त्यांचा हेतु चांगला आहे, असें एक वेळ मान्य केलें, तरी त्यायोगें आदिवासी जनतेच्या जीवनांत प्रत्यक्ष कांहीं सुधारणा घडून आलेली नाहीं व आदिवासी हा स्वभावतः शांतताप्रेमी असल्यामुळें हिंसक मार्गाकडेही तो आकर्षित होऊं शकलेला नाहीं.

## जमिनीची स्थिति :

आदिवासी विभागांतील जमीन निकस व कोरडवाहू (फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी) असल्यानें, तिच्यांतून फक्त एकच पीक काढणें शक्य असतें. म्हणजे वर्षांतून सहा महिने ती रिकामीच राहाते व म्हणून शेतकऱ्यालाही निम्में वर्ष बेकारींतच

काढावें लागतें. त्यासाठीं त्याला जोंपर्यंत कांहीं जोडधंदा देण्यांत येत नाहीं, तोंपर्यंत त्याची उपासमार हमखास टळूं शकणार नाहीं. ग्रामोद्योग समितीतर्फे कैनाड येथें १९४९ सालीं ऑक्टोबर महिन्यांत ताडगूळ केन्द्र सुरू झालें. तेव्हांपासून आतांपर्यंत सतत चार वर्षें हें काम येथें चालू आहे. दारूबंदीमुळें बेकार झालेल्या भंडाऱ्यांना ह्या कामापासून खूपच फायदा झालेला आहे. रोज सकाळीं ताजी नीरा आदिवासींना विकत देऊन, उरलेल्या नीरेचा गूळ तयार करण्यांत येतो. तसेंच कोंबड्या पाळण्याचा उपक्रमही यंदा त्यांनीं सुरू केला आहे. येथील कस्तुरबा ग्रामसेवा केंद्रांत हातमाग बसविण्यांत आला असून, लोकांनीं फुरसतीच्या वेळीं सूत कातून, स्वतःचें कापड तयार करावें, निदान सूत-कताईच्या द्वारें चार पैसे मिळवावेत, असा प्रयत्नही सुरू झाला आहे. आतांपर्यंत इराणी व पारशी लोकांनीं हजारों रुपये खर्चून, ह्या भागांत चिकूच्या बागा तयार केल्या आहेत. शेतीचा धंदा किफायतशीर व्हायचा असेल, तर त्याला बागायतीची जोड दिली पाहिजे. त्यासाठीं विहिरी खोदून पाणी पैदा केलें पाहिजे. शेतकऱ्यानें हिशेबीपणा शिकून घेतला पाहिजे, वगैरे गोष्टी आदिवासींना शिकविण्याची धडपड कार्यकर्ते करीत आहेत.

## सांठा करण्याची प्रवृत्ति नाहीं

येथील आदिवासी म्हणजे जणूं मूर्तिमंत अपरिग्रह आहे. संग्रह अथवा सांठा करण्याची प्रवृत्तिच त्याच्या ठिकाणीं नाहीं. त्याची झोपडी म्हणजे कारवीच्या कुडाची एक छोटी खोलीच असते. लेखणीसाठीं वापरण्यांत येणाऱ्या बोरूप्रमाणें हीं कारवीचीं लाकडें किंवा धाटे असतात. त्यांचा कूड तयार करून, ते तो तांबडमातीनें उत्तम प्रकारें सारवून घेतात आणि वर गवताचें व पाल्याचें छप्पर घालतात. रात्रीच्या वेळीं गुरें ह्याच झोपडींत असतात. तेथेंच शेजारीं माणसें झोपतात. झोपडीमध्यें दोन-चार गाडगीं-मडकीं, एखादी कोंबडी, थोडेंसें धान्य, मासे पकडण्याच्या बांबूच्या टोपल्या व तीन

विटांची चूल, एवढेंच सामान दिसायचें. आदिवासीचें जीवन नेहमींच अस्थायी असतें. थोडीशी भुताटकी किंवा अपशकुन झाल्याचा संशय आला रे आला, कीं ती जागा सोडून ते दुसरीकडे जातात. ह्यामुळेंच बहुधा त्यांची चूल जमिनींत पुरलेली अथवा कायम स्वरूपाची नसते. तीन दगड किंवा तीन विटा ठेवून आपण प्रवासांत जशी चूल तयार करतों, तशीच चूल आदिवासीची असते. आदिवासीच्या जीवनांत बाथरूम व संडास ह्या संस्थाच नाहींत. नदीवर, विहिरीवर किंवा झऱ्यावर जाऊन स्नान करायचें, भांडीं घासायचीं व नाममात्र असलेले कपडे धुवायचे. शौचासाठीं सारें जंगल मोकळेंच पडलेलें असतें.

## दागिन्यांचा सोस, फुलांचें वेड

एकूण सर्वसाधारण आदिवासी अपरिग्रही व असंग्रही असला, तरी आदिवासी स्त्रीला मात्र नागरी स्त्रियांप्रमाणेंच दागिन्यांचा सोस व फुलांचें वेड फार असतें. नाकांत नथ, कानांत दागिने, गळ्यांत असंख्य पांढऱ्या व पिवळ्या मण्यांच्या माळा, जर्मन सिल्व्हरच्या सांखळ्या, चांदीच्या पुतळ्यांची माळ, दंडांत चांदीच्या वाक्या, हातांत चांदीचे गोठ, हातांच्या बोटांत अनेक चांदीच्या आंगठ्या, असा सामान्यतः षोक असतो. आम्ही आदिवासीच्या झोपड्या पाहायला गेलों असतां एका बाईच्या गळ्यांतील जाडजूड जर्मन सिल्व्हरची सांखळी पाहून तिला विचारलें, "असली सांखळी तूं कशाला वापरतेस ?" त्यावर ती हसून म्हणाली, "आतां तर ही सांखळी पुष्कळच बारीक झाली आहे. पूर्वीं तो म्हशीच्या गळ्यांतला सांखळदंडच होता." जणूं तिला म्हणायचें होतें, ह्या दागिन्यांच्या सोसांतून आम्ही हळूहळू मुक्त होत आहोंत. तिच्या त्या उत्तरानें आम्ही खदखदून हसलों आणि कुसुमताई नारगोळकरांनीं वारली स्त्रियांमध्यें जागृतीप्रमाणेंच विनोदवृत्ति निर्माण केली असल्याची खात्री पटली. आदिवासी स्त्रियांना लाल रंग आवडतो. मात्र आपल्याकडील स्त्रियांप्रमाणें त्या काचेच्या

बांगड्या घालीत नाहींत अथवा कुंकूंही लावीत नाहींत. त्यांचें फुलांचें वेड अगदीं डोक्यांत भरल्यासारखें आहे.

## लग्नाच्या बाबतींत मुलीला स्वातंत्र्य

आदिवासींचा एक गुण आपण सुधारलेल्या लोकांनीं अवश्य घेण्यासारखा आहे. तो म्हणजे लग्नाच्या बाबतींत मुलींना देण्यांत येणारें संपूर्ण स्वातंत्र्य हा होय. मुलगी आपला नवरा स्वतःच पसंत करते आणि आई-बाप त्याला मान्यता देतात. ह्यामुळें त्यांचें वैवाहिक जीवन मोठें शांत व समाधानाचें होतें. जर एखाद्या बापानें आपल्या मुलीच्या ह्या हक्कावर गदा आणून, बळजबरीनें तिचें लग्न लावून देण्याचा प्रयत्न केला, तर ती अशिक्षित मुलगी बंड करून उठते. कैनाडच्या एका आदिवासी गृहस्थाला एकुलती एक मुलगी आहे. ती आतां लग्नाला आली आहे. घरच्या शेतीला ज्याचा चांगला उपयोग होईल, असा एक धट्टाकट्टा तरुण त्या गृहस्थानें पसंत करून आणला व त्याला घरीं ठेवलें. परंतु त्या मुलीचें प्रेम त्याच्यावर नव्हतें. म्हणून तिनें त्याच्याशीं असहकार करण्यास सुरुवात केली. त्याच्याशीं बोलायचें नाहीं, त्याचें काम करायचें नाहीं, किंबहुना त्याच्याकडे पाहायचेंही नाहीं. ह्यामुळें अखेर तो भावी नवराच बिचारा कंटाळून निघून गेला व अशा प्रकारें त्या तरुणीचा जय झाला.

## नाचांत वृद्धांपेक्षां तरुण अधिक

आदिवासी लोकांचा सर्वांत आवडता छंद कोणता असेल, तर तो म्हणजे नाच. पूर्वीं दारूबंदी नव्हती, तेव्हां दारू पिऊन नाचणें, हा त्यांच्या जीवनांतील सर्वोच्च आनंद होता. परंतु आतां दारूबंदी झाली, तरीही नाचाची धुंदी कांहीं कमी झालेली नाहीं. एकदा नाच सुरू झाला, म्हणजे तासन्तास तो चालू असतो. कधींकधीं तर सारी रात्र तो चालतो. विशेषतः पावसाळा सुरू झाल्यापासून दिवाळीपर्यंत तारपें ह्या विशिष्ट वाद्यावर चालणारा नाच मोठा मोहक व सुरुचिपूर्ण असतो.

शिमग्याच्या सुमारास जो नाच ते करतात, त्यांत गाणीं व असभ्य हावभाव असतात, परंतु ह्या चातुर्मासांतील नाचांत गाणें नसतें. मूकपणें नुसतें तासन् तास तालावर नाचायचें असतें. तारपें वाद्य कांहींसें गारुड्याच्या पुंगीसारखें असतें आणि त्याचा आवाजही कांहींसा पुंगीसारखाच असतो. हें तारपें वाजविणारा अत्यंत प्रवीण असावा लागतो. प्रत्येक गांवांत असा एखादा प्रवीण तारपेकर अवश्य आढळतो. सुरुवात करतांना त्यानें जो सूर काढलेला असतो, त्यांत मध्यंतरीं – नाच संपेपर्यंत – मुळींच खंड पडत नाहीं. ओरिसामध्यें म्हातारे-कोतारे आदिवासी स्त्रीपुरुषही नाचांत सामील झालेले मीं पाहिले आहेत. परंतु वारली लोकांमध्यें मात्र सामान्यतः तरुण स्त्री-पुरुषच नाचतात. त्यांतही अविवाहितांची संख्या जास्त असते. नाचत असतांच तरुण-तरुणी आपल्या जीवनाचे जोडीदार निवडतात. ह्यामुळें वयस्क लोक आजूबाजूस बसून त्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवतात. लग्नें जुळविण्याची ही पद्धत ‘ रोमँटिक ’ नाहीं, असें कोण म्हणेल ? आदिवासींची भाषाही संपूर्णपणें मराठी असून, तिच्या उच्चारावर कोठें कोठें गुजराती भाषेचा प्रभाव पडल्याचा भास होतो. परंतु आपलें बोलणें त्यांना व्यवस्थित कळतें आणि त्यांचें म्हणणेंही आपण समजूं शकतों.

## हुशार व बुद्धिमान जमात

ठाणें जिल्ह्यांतील आदिवासी सामान्यतः हुशार व बुद्धिमान समजले जातात. विशेषतः कोकणा जातीचे लोक अत्यंत हुशार असतात. वारलीही चांगलाच बुद्धिमान आहे. कातकरी मात्र त्या मानानें जास्त मागासलेला व निकृष्ट बुद्धीचा समजला जातो. कम्युनिस्टांचें मुख्य क्षेत्र डहाणू, उंबरगांव व मोखाडा ह्या तालुक्यांतील वारली लोकांमध्येंच आहे. ह्यामुळें त्यांनीं ह्या लोकांतून चांगले स्थानिक पुढारी निर्माण केले आहेत.

वारली हा जितका बुद्धिमान् तितकाच अत्यंत प्रामाणिकही आहे. चोऱ्या-माऱ्यांकडे तो सहसा वळत नाहीं. फक्त पावसाळ्यांत उपासमार होऊं लागली, म्हणजे क्वचित् एखाद्या ठिकाणीं धान्याच्या किरकोळ चोऱ्या होत असत. परंतु आतां सहकारी शेतीमुळें त्या चोऱ्याही लवकरच बंद होतील. गेल्या सहा-सात वर्षांत कैनाड येथें हजारों रुपयांचे व्यवहार चालू असतांही एका पैशाचीही चोरी झाली नाहीं, ही एकच गोष्ट आदिवासींचा प्रामाणिकपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

## अंधविश्वास व लोकभ्रम

आदिवासींच्या जीवनांतील सर्वांत कमकुवत भाग म्हणजे त्यांचा अंधविश्वास व लोकभ्रम हा होय. भुतें-खेतें, मंत्र-तंत्र व जादू-टोणा ह्यांच्या ते पूर्ण आहारीं गेले आहेत. ह्या अंधविश्वासामुळें आजारीपणांत औषधोपचार करून घेण्याऐवजीं मंत्र-तंत्रावरच ते विसंबून राहातात. बालमृत्यु तर जवळजवळ नाहींतच म्हटलें तरी चालेल. लहान मुलें चांगलीं सशक्त व सुदृढ असतात. परंतु पुढें योग्य अन्नाहाराच्या अभावीं तीं वाळून जातात. त्यांच्या मुलांकडे लक्ष देण्याचें काम कस्तुरबा स्मारक निधीच्या सेविका करीत असतात. अर्थात् तेथेंही अंधविश्वास आड येतातच. परंतु कस्तुरबासेविकांनीं आपल्या केंद्रांत पाळणे बांधून, तान्ह्या मुलांना सांभाळायची जबाबदारी स्वीकारल्यापासून, आदिवासी मातांचा त्यांच्यावर चांगला विश्वास बसूं लागला आहे. आदिवासींचा देवही आपल्यापेक्षां वेगळा असून, त्यांना राम, कृष्ण, वगैरे हिंदु देवतांची मुळींच माहिती नाहीं. त्यांना रामायण-महाभारतांतील कथाही माहीत नसतात. त्यामुळें उदाहरण देतांना आपली मोठी अडचण होते.

## शिक्षणाचा दुष्परिणाम ?

आदिवासींमध्यें शालेय, पुस्तकी शिक्षणाचा प्रसार होऊं लागल्यापासून, त्याचा एक दुष्परिणाम ठळकपणें दिसून येऊं लागला

आहे. तो म्हणजे शरीरश्रमाची स्वाभाविक आवड नाहींशी होऊन, पांढरपेशांच्या जीवनाचें आकर्षण शिक्षित आदिवासींमध्यें उत्पन्न होऊं लागलें आहे. शेती करण्यापेक्षां मास्तरकी किंवा कारकुनी मिळविण्याची धडपड तो करतो. अर्थात् हा प्रश्न फक्त आदिवासींपुरताच मर्यादित नसून, साऱ्या भारताचाच आहे. त्यामुळें त्याचा दोष आपल्या शिक्षणपद्धतीकडेच जातो. हा दोष काढून टाकून, शरीरश्रमाबद्दल तिटकारा वाटणार नाहीं व मास्तरकी किंवा कारकुनी करून जेवढा पैसा मिळतो, त्यापेक्षां कितीतरी जास्त पैसा सहकारी व शास्त्रीय पद्धतीनें शेती केल्यास मिळूं शकतो, हें सप्रमाण दाखवून देण्याचें काम तेथील विधायक कार्यकर्त्यांनीं अंगावर घेतलेलें आहे. नव्या परिस्थितींत त्यांना यश येण्याची पुष्कळच आशा आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेंच तेथील शेत-मजुरांच्या हातीं आतां पैसा खेळूं लागला आहे व आजपर्यंत पैसा जमिनींत पुरून ठेवण्याची लागलेली सवय कमी होऊन, तो पोस्टांत ठेवण्याची अथवा चांगलीं कौलारू घरें बांधण्याची गोडी त्यांच्यांत निर्माण होऊं लागली आहे.

# खंडाळ्यांत फुललेला निसर्ग

## घाटाचें आकर्षण कांहीं न्यारेंच

खंडाळ्याच्या घाटांतून आजपर्यंत शेकडों वेळां मी आलों-गेलों असेन. घाट सुरू झाल्यापासून संपेपर्यंत गाडीच्या खिडकींतून बाहेर डोकावून पाहात राहाण्याचा मला छंदच लागलेला असतो. घाट सुरू झाल्यावर माझ्यानें स्वस्थ बसवतच नाहीं. जणूं गाडींतल्या वातावरणानें मी गुदमरूं लागतों. खिडकींतून बाहेर पाहून घाटांतली

मोकळी हवा आधाश्यासारखी पिऊन घेतली, म्हणजेच माझ्या मनाला समाधान होतें. पावसाळ्यांतील झऱ्यांचीं व धबधब्यांचीं दृश्यें असोत, शरद् ऋतूंतील प्रसन्न हिरवळ असो किंवा उन्हाळ्यांतील उघडे बोडके डोंगर असोत, सर्व प्रसंगीं मला हा घाट आकर्षकच वाटतो आणि म्हणूनच एरवीं खिडकीपासून दूर बसणारा मी, पुण्याला किंवा मुंबईला गाडींत चढतांच उजव्या-डाव्या बाजूची खिडकी मिळविण्यासाठीं धडपडत असतों आणि खिडकी न मिळाल्यास घाट सुरू झाल्यावर सरळ डब्याच्या दरवाजांत जाऊन उभा राहातों. आजही असेंच झालें. दादरला गाडींत चढल्यामुळें मनाजोगती खिडकी मिळूं शकली नाहीं. म्हणून मग डब्याच्या दारांत उभें राहून बाहेरचें दृश्य नेत्रांत सांठवावें लागलें.

## मुंबईबाहेर सर्वत्र पाणीच पाणी

गेल्या कांहीं दिवसांपासून वरुणानें मुंबापुरी व आसपासच्या भागांत रुद्राचें तांडवनृत्य सुरू केलेलें होतें. त्यामुळें मुंबईतून बाहेर पडलों, तों आपण जणूं समुद्रांतूनच प्रवास करीत आहोंत, असा भास होऊं लागला. शेतांना बांध घालून माणूस सरहद्दी निर्माण करतो, त्या किती कृत्रिम आहेत, हें दाखवून देण्यासाठींच कीं काय, पाण्यानें त्या सर्व सरहद्दी आपल्या पोटांत घेतल्या होत्या. कल्याणच्या अलीकडे एक देऊळ पाण्याखालीं बुडूं लागलेलें होतें. त्याचें कांहीं वाटलें नाहीं, पण एका राहात्या घरांत पाणी शिरूं लागलेलें होतें आणि त्यांतील लोक होडीच्या साहाय्यानें सुरक्षित जागीं चालले होते. तें दृश्य पाहून मात्र मन हळहळलें. ज्या शेतांतून माणसांनीं चिखल तुडवीत चालायचें, तेथून होडींत बसून जावें लागावें, ही कांहीं आनंदाची गोष्ट खास नव्हती. पावसाचा तो प्रताप पाहून, पुण्यास नदीच्या कांठीं असलेल्या स्वतःच्या घराची मला आठवण झाली आणि मुळा-मुठेला तर असाच पूर आला नसेल ना, ह्या विचारानें मी अस्वस्थ झालों. आग, पूर, वगैरे गोष्टींतील भीषण सौंदर्याचा आनंद आपण स्वतः दूर असतों तोंपर्यंतच आपल्याला

लुटतां येतो. स्वतःवर तें संकट येऊन कोसळलें, म्हणजे त्यांतील सौंदर्य पाहाण्याची आपली शक्तिच नाहींशी होते.

## हिरवें सौंदर्य न्याहाळण्याचें वेड

अशा प्रकारच्या विवंचनेंत असतांनाच कर्जत आलें आणि घाट सुरू झाला. दोन इंजिनांच्या मदतीनें आगगाडी वर चढूं लागली आणि माझ्या मनांतील चिंतेचे व विवंचनेचे ढग कोठल्या कोठें वितळून गेले. माझा आवडता २४ नंबरचा बोगदा केव्हां येतो, म्हणून मी उत्कंठेनें वाट पाहूं लागलों, कारण त्याच्या आसपासच तो मोठा धबधबा आणि ती प्रचंड दरी आहे. शेकडों वेळां मीं तो धबधबा पाहिला असेल, पण अजूनही मनाची तृप्ति झालेली नाहीं. तीन टप्प्यांनीं पडणारा तो धबधबा उन्हाळ्यांत अदृश्य होऊन जातो, पण त्या वेळींही मला त्याच्या अस्तित्वाचा भास होत असतो. तें ठिकाण यायला अजून बराच अवकाश होता, म्हणून मी जरा बेफिकीरपणेंच बाहेरचें हिरवें सौंदर्य न्याहाळीत होतों. इतक्यांत उजवीकडच्या डोंगराकडे माझें लक्ष गेलें. अरे, ह्या तर दुधाच्या सहस्र धारा! उन्हाळ्यांत ह्या डोंगरावर झुडूपही दिसत नाहीं नि आतां हिरव्यागार झाडांझुडपांतून शिवाशिवीचा खेळ खेळत ह्या पांढऱ्या शुभ्र जलधारा वेगानें खालीं उड्या घेत होत्या. मी मोजूं लागलों, एक, दोन, तीन, चार, पांच...आणि आकाशांतील चांदण्या मोजतांना त्या जशा एकमेकांत मिसळून जातात, तसें माझें झालें. त्या डोंगरालाच मीं नांव दिलें सहस्रधारा! हृषिकेशजवळ सहस्रधारा नांवाचें एक स्थान आहे. तेथें एका मोठ्या कड्यांतून हजारों थेंब पाणी ठिबकत असतें. क्वचित् एखादी धारही दिसते तेथें, पण खऱ्या अर्थानें सहस्रधारा ह्या खंडाळ्याच्या डोंगरावरच प्रथम पाहायला मिळाल्या. ह्या वेळीं १७ नंबरच्या बोगद्यापर्यंत आलों होतों मी. माझ्या मनांत विचार येत होता, ह्या सगळ्या धारारूपी गवळणी कड्यावरून उड्या घेत,

इतक्या घाईनें कोठें बरें चालल्या आहेत ? ह्यांना इतकी कसली घाई झालीय ?

## घाटांतील राजाराणीचा संसार

अरे, पण दोन डोंगराच्या मध्यें अगदीं कोपऱ्यांत ते प्रचंड धबधबे कोठून आले ? हे तर कधींच दिसले नव्हते इथें. अडीचशें-तीनशें फूट उंचीवरून खोल दरींत कोसळणारे ते धबधबे, म्हणजे निसर्गाची एक अद्भुत कारागिरीच होती. वस्तुतः एरव्हींही तेथून पाणी पडत असलें पाहिजे, परंतु ती जागा कोपऱ्यांत असल्यामुळें गाडींतून जातांना दिसत नसावी. आज तें पाणी आपला नेहमींचा धोपटमार्ग सोडून २०-२५ फूट पुढें आलें होतें. त्याचा घेरही चांगला पंचवीस-तीस फूट असावा. जणूं चकचकीत चांदीचा एक प्रचंड खांबच उभा करण्यांत आलेला असावा, असें वाटे. दूर अंतरामुळें पाण्याची तीव्र गति भासमान होत नव्हती किंवा सयामांतला पांढरा शुभ्र हत्ती आपली सोंड किंचित् हलवीत उभा असावा, असा भास होत होता आणि मग मागील डोंगराच्या ठिकाणीं एक प्रचंड हत्तीच मला दिसूं लागला. गिरसप्पा किंवा जोग येथील धबधब्यामध्यें ( म्हैसूर राज्य ) राजा सर्वांत मोठा धबधबा आहे. त्याची आठवण मला झाली आणि खंडाळ्यांतील ह्या सर्वांत मोठ्या धबधब्याला मीं 'राजा' नांव दिलें. अर्थात् राजा कधीं एकटा असूं शकत नाहीं. त्याच्या शेजारीं राणी हवीच. माझी अडचण निसर्गानें आधींच हेरली होती आणि त्यानें राजाजवळ एक राणीही तयार करून ठेवली होती. ह्या राणीची धार थोडी कृश असली — आणि कृशता तर स्त्रीच्या सौंदर्याचें लक्षण आहे ! — तरी तिचें लावण्य कांहीं कमी नव्हतें. राजापुढें ती फिकी पडत नव्हती.

## नेहमीं दावा साधणारें धुकें

अगदीं फडतूस डोंगरावर जर निसर्गानें आपल्या देणगीची पखरण इतकी मुक्तहस्तानें केली आहे, तर आपल्या नेहमींच्या धबधब्याची

शान कांहीं औरच असणार, ह्याबद्दल माझ्या मनांत शंका नव्हती. म्हणून मी अधिकच उत्कंठेनें त्या ठिकाणांची प्रतीक्षा करूं लागलों. अखेर बावीस नंबरचा बोगदा आला आणि ती प्रचंड दरी डावीकडे दिसूं लागली, पण हें काय ? सारी दरी दाट पांढऱ्या धुक्यानें भरून गेली आहे ! हें धुकें बेटें नेहमींच ऐन वेळीं असा दगा देत असतें. मला त्याचा भयंकर राग आला. मागें एकदा लोणावळ्याला टायगरस्लिप पाहातांना ह्या धुक्यानें असाच घोटाळा केला होता. जगन्नाथपुरीला समुद्रांतून वर येणारा सूर्य पाहातांना आणि कन्याकुमारीचा सूर्यास्त पाहातांना ढगांनीं जसा विरस केला होता, तसाच विरस आज ह्या धुक्यानें केला. एकदा वाटलें, एखाद्या आयुधाच्या साहाय्यानें ह्या धुक्याचा नाश करतां आला, तर किती बरें होईल ! पण लगेच माझ्या मनांत दुसरा विचार आला, धुक्याच्या ह्या समुद्रांत बुडी मारून डुंबतां येईल, तर किती बरें होईल ? किंवा पिसासारखें हलकें होऊन, हवेवर तरंगत तरंगत ह्या धुक्यासह इकडे तिकडे भटकण्यांत किती मजा येईल आणि मग धुक्याविषयींचा माझा राग कोठल्याकोठें मावळून गेला. माझ्या ह्या हृदयपरिवर्तनाचा सुगावा बहुधा धुक्याला लागला असावा. त्यानें आपलें आक्रमक धोरण तावडतोब बदललें आणि चोवीस नंबरच्या बोगद्यापर्यंत मी जाऊन पोंचतों तोंच माझ्या त्या ठराविक चार मजली धबधब्याच्या आसपासचें धुकें विरळ झालें असल्याचें मला दिसून आलें. झिरझिरीत बुरख्यांतून दिसणाऱ्या मोहक मुखड्याप्रमाणें, तो प्रपात मला वाटला. एरव्हीं मी त्या धबधब्याच्या त्या सौंदर्यावर फिदा होऊन गेलों असतों, पण कांहीं मिनिटांपूर्वीं पाहिलेला ' राजा ' माझ्या डोळ्यांसमोर दिमाखानें मिरवीत होता. त्याच्यापुढें मला नेहमींचा हा स्वर्गातून येऊन पाताळांत प्रवेश करणारा धबधबा अगदींच सामान्य वाटला. अर्थात् तो राजा कांहीं नेहमीं दिसणार नाहीं, सदैव दृष्टीला सुखविण्याचें काम तर हा छोटा प्रपातच करणार आहे, ह्याचा विसर मला पडलेला नव्हता.

## स्वागतार्थ उभे असलेले धबधबे

दरी संपली, बोगदे संपले आणि साधे डोंगर सुरू झाले, तरी रस्त्याच्या कडेला स्वागतार्थ उभे असलेले धबधबे कांहीं संपले नाहींत. घाटांतून येतांना कित्येक धबधबे गाडीच्या इतक्या जवळ लागले, कीं डब्याच्या दारांत उभ्या असलेल्या माझ्या अंगावर त्यांचे तुषार उडत होते. त्या तुषारांच्या स्पर्शानें शरीर पुलकित होत होतें. एक वेगळीच मस्ती चढत होती. मला पुनः पुनः वाटत होतें, गाडी जरा वेळ इथें थांबेल, तर काय मौज होईल! मी झट्दिशीं जाऊन त्या धांदरट धबधब्यांखालीं एक मिनिटच उभा राहीन नि लगेच परत येईन! पण गाडी थांबतच नव्हती. धीम्या गतीनें ती कालप्रवाहाप्रमाणें पुढें पुढेंच जात होती. एरव्हीं घरीं पोंचायची घाई असते, त्या वेळीं नको नको म्हणत असतां गाडी थांबते. कधीं मजुरांना वाटेंत उतरायचें असतें म्हणून! तर कधीं गाडीची लहर लागली म्हणून! पण आज कांहीं ती एक मिनिटभरही थांबली नाहीं. एकदा तर मला असेंही वाटलें, कीं घाटांतली एखादी प्रचंड शिळा रेल्वेरस्त्यावर कोसळून पडावी आणि चांगलें तास-दीड-तास आपल्याला येथें थांबायला मिळावें! त्यांत अशक्य असें कांहींच नव्हतें. पावसाळ्याच्या दिवसांत खंडाळ्याच्या घाटांत दरड कोसळल्याच्या व त्यामुळें गाड्या 'लेट' झाल्याच्या बातम्या आपण वर्तमानपत्रांत वाचीत असतोंच, पण आज दरडच काय, पण साधा लहानसा दगडही खालीं कोसळायला तयार नव्हता. अहोरात्र पावसाचा मारा चालू असल्यामुळें बहुधा तो थंडीला भिऊन आपली जागा सोडायला तयार नसावा!

## पण खिडकीबाहेर पाहिलें तर ना?

जगाला दाखविण्यासारख्या इतर कांहीं गोष्टी महाराष्ट्राजवळ असोत किंवा नसोत, पण खंडाळ्याच्या घाटांतील हें नैसर्गिक सौंदर्यमात्र कोणालाही वेड लावील असें आहे. ह्याचें वैशिष्ट्य असें, कीं तें वर्षांतून

फार थोडा वेळ पाहायला मिळतें. ह्या जुलै महिन्यांतच ! ह्यामुळें त्याचा उपयोग करून, एखादा विजेचा कारखाना काढण्याची कल्पना लोभी मानवाच्या मनांत उद्भवली, तरी तें शक्य होणार नाहीं. हें वैभव निसर्गाच्या ताब्यांत आहे. तें लुटून नष्ट करणें मानवाच्या हातीं नाहीं. त्याचा आनंद उपभोगायला मात्र कोणालाच मनाई नाहीं. इतकें विपुल सौंदर्य-भांडार आपल्या देशांत आहे, ह्याचा अभिमान कोणाला वाटणार नाहीं ? पण लक्षांत ठेवा, पुणें-मुंबईच्या प्रवासांत कर्जत ते लोणावळा स्टेशनांच्या दरम्यान तुम्हीं खिडकीबाहेर डोकावून पाहिलें पाहिजे, नाहीं तर पुस्तकांत डोकें खुपसून बसाल किंवा गुलगुल गोष्टी करण्यांत दंग होऊन जाल किंवा सुस्तपणें डुलक्या काढीत राहाल, तर खात्रीनें पस्तावाल !

इतक्या वर्षांनंतर खंडाळ्याच्या घाटांत एक अद्भुत दृश्य आज पाहायला मिळालें. आयुष्यांत प्रथमच दिसलेला निसर्गाचा चमत्कार. तुमच्यापैकीं फार थोड्यांना हा चमत्कार पाहायचें भाग्य लाभलें असेल. कोणता तो चमत्कार ? इंद्रधनुष्याचा ! तुम्ही म्हणाल, " हात्तिच्या ! इंद्रधनुष्यं तर आम्हीं शेकड्यांनीं पाहिलीं आहेत. त्यांत कसला घेऊन बसलां आहांत चमत्कार ? " पण थांबा ! असे उतावळे होऊं नका. तुम्हीं इंद्रधनुष्यें खूप पाहिलीं असतील, पण नालाच्या आकाराचें, दोन टोकें जमिनीला टेकलेलें इंद्रधनुष्य तुम्हीं कधीं पाहिलें आहे काय ? कां ? गप्पसे बसलांत ? आहे कीं नाहीं चमत्कार ? हा चमत्कार मीं आज पाहिला. खंडाळ्याच्या घाटांतून गाडी चालली होती. झिमझिम बरसात होत होती. इतक्यांत त्या धबधब्यांच्या समोर अकस्मात इंद्रधनुष्य दिसूं लागलें. अल्लाउद्दिनाच्या जादूनें गुहा उघडावी, तसा तो सृष्टीचा रत्नजडित अलंकार अचानक प्रगट झाला. सारी गाडी विस्मित होऊन तिकडे टक लावून पाहूं लागली. दोन्ही टोकें जमिनीला टेकलेलीं असल्यामुळें वस्तुतः तें धनुष्य न बनतां, तो शंभर नंबरी सोन्याचा गळ्यांतला हार बनला होता. गळ्यांत घातलेल्या हाराची मागील बाजू

आपल्याला दिसत नाहीं. वर्तुळाचा तीनचतुर्थांश भागच दिसतो. त्याप्रमाणें त्या इंद्रधनुष्याचा तीनचतुर्थांश भाग आम्हांला दिसत होता. सामान्यतः दिसणारें इंद्रधनुष्य क्षितिजावर टेकलेलें असतें, पण हें अद्भुत धनुष्य जमिनीला लागलेलें होतें आणि जमीन तरी किती जवळ! गाडी थांबली असती, तर आम्हीं पटकन् जाऊन त्याला हात लावला असता! किंवा आम्हांला पंख असते, तर आम्हीं त्या धनुष्यांतून एक फेरी मारली असती. लहान मुलांना तर तें शिडीसारखेंच वाटत होतें.

निसर्गाला आपलें हें कौतुक जणूं अपुरें वाटलें आणि त्यानें आम्हांला आश्चर्याचा आणखी एक धक्का देण्याचें ठरविलें. त्या धनुष्यावर आणखी एक धनुष्य त्यानें चढवून दिलें. दुहेरी इंद्रधनुष्य! सर्वांच्या तोंडून केवळ आश्चर्योद्गारच बाहेर पडत होते. 'अहाहा!' 'अय्या, किती छान आहे!', 'वंडरफुल!', 'वह्वाह! ......'

पण आमची गाडी अगदींच अरसिक! तिचें जणूं ह्या साऱ्या दृश्याकडे लक्षच नव्हतें, किंवा सुंदर स्त्रीची तारीफ पुरुष मंडळी करूं लागली, कीं कुरूप स्त्री जशी फणकाऱ्यानें तेथून निघून जाते व आपल्याबरोबर आपल्या 'माणसाला'ही घेऊन जाते, तसें आमच्या आगगाडीबाईचें झालें. आमच्या आनंदांत सहभागी होण्याऐवजीं ती आम्हांला फरफटत ओढून घेऊन गेली आणि तें अलौकिक दृश्य आमच्या नजरेआड झालें.

## ही कोठली जादू?

मी पाहातच राहिलों. माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. मनाशीं म्हटलें, 'मी स्वप्नांत तर नाहीं ना? कीं जगाची कांहीं उलटापालट झालीय? मी मुंबईहून पुण्यालाच चाललोंय ना? मग खंडाळ्याच्या घाटांतले हे खेळकर, अल्लड धबधबे इथें डाव्या बाजूच्या डोंगरांत कसे? नजरबंदी तर केली नाहीं कुणीं?' पण तें सारें खरें होतें. मुंबईहून पुण्याला जातांना कामशेतच्या अलीकडे व पलीकडे उजव्या

बाजूला जे डोंगर आहेत, त्यांच्याकडे मीं आजवर कधीं ढुंकूनही पाहिलें नव्हतें. वैराण, उघडे-बोडके डोंगर कोण पाहाणार? पण आज अचानक त्या डोंगरांनीं आपल्याजवळचें सुप्त सौंदर्य-भांडार माझ्यासमोर उघडें केलें. अगदीं खंडाळ्याच्या घाटांत दिसतात तसेच पांढरे शुभ्र, दुधाचे किंवा हिमाचे धबधबे आज त्या डोंगरांवरून बागडतांना दिसले आणि मला हळहळ वाटली, कीं ह्यापूर्वीं आपण पावसाळ्यांत ह्या डोंगरांकडे कां पाहिलें नाहीं? कीं ज्या ज्या वेळीं मीं प्रवास केला, त्या त्या वेळीं इतका पाऊस नसल्यामुळें, हे धबधबे तयार झाले नव्हते? तसेंही असेल, पण ह्यापुढें मात्र केवळ खंडाळ्याकडे डोळे लावून न बसतां इतरत्र असलेलीं सौंदर्यस्थळें टिपण्याचाही आपण प्रयत्न केला पाहिजे, हेंच खरें.

## अज्ञाताचा साक्षात्कार

खंडाळा ओलांडला आणि डाव्या हाताला असणारी दरी घनदाट धुक्यानें भरून गेल्याचें दृश्य नजरेसमोर उभें राहिलें. एरव्हीं ही खोल दरी वरून पाहायला फारच छान दिसते. हिरवीगार, टवटवीत. पण आज ती पांढऱ्या शुभ्र पिंजलेल्या कापसानें गच्च भरून गेली होती. मी डोळे फाडफाडून तिच्यांतून आरपार पाहाण्याचा प्रयत्न करूं लागलों, पण एका हातावरचेंही दिसेना. लोकांच्या तोंडून उद्गार निघाले, "अबब! काय हें धुकं! छेः धुकं नव्हे, धुक्याचा समुद्रच!"

क्षणभर मला वाटलें, ह्या समुद्रांत वरून सूर मारला, तर काय मजा येईल! किंवा अणिमा, गरिमा, वगैरेसारख्या सिद्धींच्या साह्यानें पिसासारखें हलकें बनतां येईल, तर ह्या धुक्यावर तरंगण्यांत किती गंमत येईल!

पण दुसऱ्याच क्षणीं मी अंतर्मुख झालों. माझ्या मनांत विचार आला, योग्यांना ज्याचा साक्षात्कार होतो, तें अवर्णनीय ब्रह्म असेंच तर नसेल? ज्ञाताच्या कुंपणावरून पलीकडे जाऊन ज्या अज्ञाताच्या

साम्राज्यांत विहार करण्याची आकांक्षा कविगण बाळगतात, तें अज्ञात हेंच तर नसेल? प्राणी जेव्हां हें जग सोडून, दुसऱ्या जगांत जाऊं लागतो, तेव्हां त्याला त्या मध्यंतरामध्यें अशाच अज्ञातांतून प्रवास करावा लागत असेल काय? इहलोकाचा निरोप घेतांना, माणसाच्या डोळ्यांसमोर असेंच दाट धुकें पसरत असेल काय? वस्तुतः त्या धुक्यांतून कांहींच दिसत नव्हतें, पण कां कोण जाणे, त्याच्याकडे टक लावून पाहात राहावें, तासन् तास त्याचेंच ध्यान करावें, अशी विचित्र इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. धुकीं तर आपण नेहमींच पाहातों, पण तीं लगेच विरून जातात. आज पाहिलेलें धुकें मात्र स्मरणांतून कधींच विरून जाणार नाहीं!

# घारापुरीचें त्रिमूर्ति लेणें

## मुंबईतील आनंदाची सहल

नाहीं म्हटलें, तरी मुंबईला निदान शंभर वेळां तरी मी सहज गेलों असेन, परंतु जगांतील लोक 'जिवाची मुंबई' करायला जेथें येत असतात, ती मुंबई आहे तरी कशी, हें पाहाण्याची इच्छाच कधीं झाली नाहीं. कल्याण स्टेशन सोडल्यापासून अंगाला ज्या घामाच्या धारा लागतात, त्यामुळें मी इतका बेजार होऊन जातों, कीं केव्हां एकदा कामें संपतात व आपण पुण्याच्या मोकळ्या हवेंत परत जातों, असें मला होऊन जातें. यंदा मात्र दिवाळीच्या निमित्तानें मुंबईला राहावें लागलें आणि नाइलाजानें मुलांना मुंबई दाखवावी लागली. हवा त्यांतल्या त्यांत बरी होती. पुण्याला दिवाळीच्या दिवसांत पावसानें झोडून काढलें, पण मुंबईला पावसाचें टिपूसही पडलें नाहीं. त्यामुळें

घरांत बसून राहाण्याला कांहीं सबबही मिळाली नाही. मुंबईच्या मुक्कामांतील सर्वांत आनंदाची सहल, म्हणजे घारापुरीची सफर ठरली.

घारापुरी बेट मुंबईपासून आग्नेय दिशेस सुमारें सहा मैल दूर आहे. तेथें जाण्यासाठीं दर रविवारीं बोट असते. परंतु आम्हांला रविवारीं सवड नव्हती, म्हणून शनिवारीं सकाळीं भल्या पहाटे उठून, मध्यरेल्वेच्या मशीदबंदर स्टेशनवर आलों आणि व्हिक्टोरियांत बसून, जवळच असलेल्या भाऊच्या धक्क्यावर जाऊन पोंचलों. आम्ही केवळ दैवावर हवाला ठेवूनच बाहेर पडलों होतों. मिळाली बोट किंवा लॉंच, तर जायचें, नाहींतर परत यायचें, अशी तयारी ठेवलेली होती. आम्ही आठ-दहा जण होतों. स्पेशल लॉंच करायची, तर सत्तावीस माणसें हवींत. तिचें भाडें कमींत कमी ५४ रुपये होतें. म्हणून शिडाच्या साहाय्यानें चालणाऱ्या पडावाची चौकशी केली. पडाववाला ३२ रुपयांत येण्यास तयार झाला. आमच्यासारखे दैवावर हवाला टाकणारे आणखी कोणी वेडेपीर भेटतात कीं काय, म्हणून आम्ही पाहूं लागलों. तेव्हां लवकरच आमच्या दैवानें आम्हांला हात दिला आणि चार-पांच गुजराती लोक आम्हांला भेटले. थोड्याच वेळांत आणखी पांच-सहा दुसरे मराठी लोक आले. अशा प्रकारें आमचा हा ‘द्विभाषिक’ पडाव सकाळीं ८ वाजतां धक्का सोडून घारापुरीच्या दिशेनें निघाला. गुजराती मंडळी स्वभावानें फार चांगली होती, त्यामुळें ती लवकरच आमच्यांत मिसळून गेली आणि भडोचला आम्ही जाऊं, तेव्हां त्यांच्याकडे उतरण्याचें कबूल करण्यापर्यंत आमच्या मैत्रीची मजल जाऊन पोंचली.

## पडावाचा मालक पोहून आला

धक्का सोडून आमचा मचवा जरा पुढें गेला. गुंडाळलेलें शीड खोलण्यांत आलें. त्यांत वारा भरून, मचवा वेगानें समुद्राच्या दिशेनें जाऊं लागला. इतक्यांत समोरून उरणची एक लॉंच बंदरांत शिरली. त्या लॉंच अथवा वाफोरावरील एका माणसाचें आमच्या पडावांतील

दोन खलाशांशीं कोकणींतून कांहींतरी संभाषण झालें आणि लागलीच त्यानें कपडे काढून समुद्रांत उडी टाकली. त्याबरोबर आमचा पडाव मागें वळविण्यांत आला. पाण्यांत पडलेला माणूस एका हातांत कोरडे कपडे घेऊन, तो हात तसाच पाण्याच्या वर धरून, एका हातानें पोहत आमच्या पडावावर चढला. मग आम्हांला कळलें, कीं तो आमच्या पडावाचा मालक बुध्या आहे. तो उरणचा राहाणारा असून, बंदराकडे चालला होता. डोक्याला फडकें गुंडाळून बसण्याची व दोन्ही हात जोडून नमस्कार करण्याची त्याची लकब हुबेहूब साईबाबांसारखी आहे, असें आमच्यापैकीं कांहीं तज्ज्ञ मंडळींचें मत पडलें. त्यामुळें त्याला बुध्या ह्या गद्य नांवापेक्षां बुध्याबाबा ह्या आदरार्थी नांवानेंच संबोधण्यास त्यांनीं सुरुवात केली. बुध्याबाबा मोठा कणखर आणि धीराचा होता. थोड्याच वेळांत त्याच्या अस्तित्वाचें महत्त्व आम्हांला जाणवलें.

## पाहा, समोर घारापुरी दिसत आहे

आम्ही सकाळीं ८ वाजतां निघालों होतों. ६ मैलांचें अंतर कापण्यास सुमारें दीड तास लागेल, जास्तींत जास्त दोन तास लागतील, कारण बोटीनें व लॉंचनें एक तास लागतो, अशी आमची अपेक्षा होती, पण दहा वाजून गेले, तरी आमचा पडाव निम्म्या अंतरावरही गेला नव्हता. वारा चांगला होता, ह्यामुळें पडावाला वेग चांगलाच मिळाला होता. निदान ताशीं दहा मैल तरी वेग असावा. मग असें कसें घडत होतें ? ह्याचें कारण वारा उलटा होता. आम्ही घारापुरीच्या अगदीं उलट दिशेला चाललों होतों. मधलें दारूगोळ्याचें बेट (माजी) आणि उमेदवारांना खलाशी बनण्याचें शिक्षण देणारी डफरीन बोट, ह्यांच्या डाव्या बाजूनें जाण्याऐवजीं उजव्या बाजूनें जाऊन, आम्ही उरणपर्यंत गेलों ! उरणच्या बागा, घरें, झोपड्याही आम्हांला अगदीं स्पष्ट दिसूं लागल्या. ऊन तापूं लागलें, लहान मुलांचीं मुखकमलें कोमेजलीं आणि मोठीं माणसें हवालदिल झालीं. पण बुध्याबाबा शांतपणें सांगत होता, " अहो, घाबरूं नका. ती पाहा समोर घारापुरी

दिसते आहे. आत्तां पांच मिनिटांत नेऊन पोंचवतों तुम्हांला!" त्याचीं तीं पांच मिनिटें बारा वाजतां पुरीं झालीं! आतां आम्ही सुटकेचा निःश्वास टाकून, घारापुरीच्या धक्क्यावर उतरलों. उशीर झाल्याबद्दल कांहींजण कुरकुरत होते, तर माझ्यासारखे इतर कांहींजण तेवढ्याच पैशांत चार तासांचा फेरफटका करायला मिळाला, म्हणून खूष होते!

## गार वाऱ्यानें केलेलें स्वागत

घारापुरीचीं लेणीं एका टेकडीवर आहेत. ही टेकडी साधारणपणें पर्वतीइतकी उंच आहे, तिच्याहून थोडी कमीच! धक्का संपतांच पायऱ्या सुरू होतात. उत्कृष्टपणें बांधलेल्या काळ्या दगडाच्या पायऱ्या असून, त्यांच्या दोहों बाजूंस, चिंचेचीं, वगैरे झाडें आहेत. त्यामुळें उन्हाच्या वेळीं पायऱ्यांवर सावली असते. पायऱ्या चढूं लागतांच गार वाऱ्याची झुळूक आली आणि पडावांत बसून झालेल्या श्रमांचा जणूं परिहार झाला. आम्ही अधिक हुषार होऊन, वर चढून गेलों. मागें वळून पाहिलें, तों मुंबई किती जवळ दिसत होती! टीचभर अंतर कापायला चार तास लागले असतील, हें आमचें आम्हांलाच खरें वाटेना. लेणीं पाहाण्यासाठीं माणशीं चार आण्यांचें तिकीट पडतें. (लहान मुलांस अर्धा दर!) तें घेऊन आम्हीं आवारांत प्रवेश केला. समोरच मुशाफिरांसाठीं जेवण्या-बसण्याची सोय आहे. परंतु पाणी लेण्याच्या आवारांत आहे, त्यामुळें पाण्याच्या जवळपास फराळ करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होते. नंबर १ च्या लेण्यांत पाण्याचें सुंदर कुंड आहे. त्यांतील मधुर, थंडगार, स्वच्छ, निळसर पाणी पाहूनच मन आल्हादित होतें. आम्हीं हात-पाय धुवून मनसोक्त पाणी पिऊन घेतलें आणि फराळावर ताव मारला.

## इंग्रजी नांव 'एलेफंटा केव्हज्'

घारापुरीच्या लेण्यांना इंग्रजीमध्यें 'एलेफंटा केव्हज्' म्हणजे 'हत्तीचीं लेणीं' असें म्हणतात. कारण पूर्वीं घारापुरीच्या जुन्या

धक्क्याजवळ एक भला मोठा – खऱ्या हत्तीच्या आकाराएवढा – दगडी हत्ती होता. तो पाहून पोर्तुगीजांनीं ह्या लेण्यांना हें नांव दिलें. हल्लीं हा हत्ती मुंबईला राणीच्या बागेंत प्रवेशद्वाराजवळील वस्तुसंग्रहालयाबाहेर उभा असलेला आपल्याला पाहायला मिळतो.

## प्रेक्षणीय ' गणेश गुंफा ' लेणीं

घारापुरी बेटाचें प्राचीन नांव श्रीपुरी असून, त्याचा घेर सुमारें पांच मैलांचा आहे. एके काळीं हें स्थान चांगलें भरभराटीला आलेलें असावें असें वाटतें. त्यावर दोन टेकड्या आहेत. पायथ्याशीं थोडी वस्तीही आहे. ह्यांतील एका टेकडीवर लेणीं आहेत. एकूण लेण्यांची संख्या चार-पांच असली, तरी त्यांतील प्रेक्षणीय असें एकच आहे. त्याला नंबर १ ची गुंफा किंवा ' गणेश गुंफा ' म्हणतात. ह्या गुंफेंतच सुप्रसिद्ध त्रिमूर्तींचें लेणें आहे. ह्या गुंफेची लांबी १३० फूट व रुंदी १२९ फूट आहे. ही गुंफा व येथील लेणीं आठव्या शतकांतील असून, ब्राह्मणी किंवा शैव पद्धतीचीं आहेत. गुंफेंत प्रवेश करतांच एका प्रशस्त मंडपांत आपण पोंचतों. ह्या मंडपाचे खांब चांगले भक्कम आहेत, परंतु त्यांवर नक्षी मात्र फारशी दिसत नाहीं. येथील आदर्श स्वच्छतेमुळें मन कसें प्रसन्न होऊन जातें ! आम्ही गेलों होतों त्याच्या दुसऱ्याच दिवशीं आशियाई समाजवादी परिषदेचे लोक हीं लेणीं पाहायला जायचे होते. त्यामुळें फरशी, वगैरे ब्रशानें स्वच्छ झाडून काढण्याचा कार्यक्रम चाललेला होता. त्यामुळें कदाचित् अगदीं साहेबी पद्धतीची स्वच्छता आम्हांला तेथें दिसली असावी किंवा कदाचित् मुंबई जवळ असल्यामुळें स्वच्छतेवर विशेष लक्ष पुरविण्यांत येत असावें.

## महेशाची सुंदर, मोहक त्रिमूर्ति

मंडपांत प्रवेश करतांच नाकासमोर पाहिलें, कीं आपली नजर जगप्रसिद्ध त्रिमूर्तीच्या लेण्यावर पडते. ही सारी गुंफा आणि ह्यांतील सारीं लेणीं डोंगरांत कोरलेलीं म्हणजे प्रचंड खडकांतील आहेत, त्यामुळें

तीं अखंड आहेत, हें सांगायला नकोच. त्रिमूर्तीचें लेणें ब्रह्मा-विष्णु-महेश ह्यांचें आहे, असें कांहीं लोक मानतात, तर ह्या लेण्यांतील तिन्ही तोंडें शंकराचीं—महेशाचीं—आहेत व तो उत्पत्ति, स्थिति व लय करणारा शिव आहे, असें इतरांचें मत आहे. डाव्या बाजूचा चेहरा क्रोधयुक्त आहे, तर समोरचा व उजव्या बाजूचा शांत व सौम्य आहे. तिन्ही चेहरे एकमेकांना जोडलेले असल्यामुळें त्यांचे मुगूटही जोडलेले आहेत. त्यांपैकीं समोरच्या मूर्तीचा मुगूट अत्यंत कलाकुसरयुक्त व सुंदर आहे. ह्या मूर्तीचें शिल्प साऱ्या हिंदुस्थानांत अप्रतिम समजलें जातें. ह्या गुंफेंतील इतर बहुतेक मूर्तींची मोडतोड झालेली आहे, परंतु ह्या मुख्य त्रिमूर्तीची मात्र त्या मानानें मुळींच मोडतोड झालेली नाहीं. महेशाची ही मूर्ति संपूर्ण नसून फक्त छातीपर्यंतच आहे. गळ्यांतील, कानांतील, वगैरे अलंकारही मोठे मोहक वाटतात. ह्या मूर्तीची उंची १९ फूट असून, रुंदी सुमारें १५ फूट आहे. भव्यता आणि मोहकता ह्यांमुळें तिच्याकडे पाहातच राहावें असें वाटतें.

## शिव-पार्वती विवाहाचें लेणें

मुख्य त्रिमूर्तीच्या उजव्या बाजूस गंगाधर—डोक्यावर गंगेला धारण करणारा—शिव असून त्याच्या डाव्या बाजूस पार्वती ऐटबाज उभी आहे. त्याच्यापलीकडे शिव-पार्वती विवाहाचें लेणें आहे. ह्याला कल्याणसुंदरमूर्ति शिव असें नांव आहे. पार्वती व शंकर उभीं असून, शंकरानें आपला उजवा पाय डाव्या पायावर आडवा धरला आहे. त्यामुळें त्याच्या शरिराला सुंदर बाक आला आहे. पार्वतीनें आपला हात शंकराच्या हातांत दिलेला असला पाहिजे, परंतु तिचे दोन्ही हात भग्न स्थितींत आहेत. त्रिमूर्तीच्या डाव्या बाजूस अर्धनारीनटेश्वराचें किंवा अर्धनारीश्वर शिवाचें लेणें आहे. ह्यांतील शिवाचा उजवा अर्धा भाग पुरुषाचा असून, डावा अर्धा भाग पार्वतीचा आहे. मागील बाजूस नंदी असून, शंकर त्याला टेकून उभा आहे. त्यामुळें त्याच्या शरिराला मजेदार बाक आलेला आहे. ह्या लेण्याच्या समोरच्या बाजूस

शिव-पार्वतीसह कैलास पर्वत उचलून नेऊं पाहाणाऱ्या रावणाचें (कैलासोद्धारण) लेणें आहे. मंडपांत प्रवेश करतांच उजव्या हाताला नटराज शिवाचें लेणें आहे. ह्यांतील शिवाचे हात-पाय तुटलेले असले, तरी शाबूत असलेल्या भागांवरून तो तांडवनृत्य करीत आहे, हें सहज लक्षांत येतें. त्याच्या सभोवतीं पार्वती, ब्रह्मदेव, गणपति, कार्तिकेय, वगैरे मंडळी आहेत. तांडवनृत्यासंबंधीं ह्या ठिकाणीं असें लिहिलेलें आहे, कीं "तंडु नांवाचा एक संगीतज्ञ शंकराचा शिष्य व भारताचा नृत्यकलेंतील गुरु होऊन गेला. त्याच्यावरून ह्या नृत्यप्रकाराला तांडवनृत्य असें म्हणतात." ह्यांत ऐतिहासिक तथ्य कितपत आहे, तें पंडितांनाच टाऊक !

ह्याच्याच समोर म्हणजे डाव्या बाजूस, योगेश्वर किंवा यतीश्वर शिवाचें लेणें असून, त्यांत तो पद्मासन घालून ध्यान करीत आहे. ह्याच्या वर्णनांत 'लकुलीश' हा शब्द आलेला आहे, त्याचा अर्थ मात्र लागला नाहीं. ह्यांच्याखेरीज मानिनी पार्वती, अंधकासुर, संहारमूर्ति शिव, वगैरे इतरही लेणीं आहेत. उजव्या बाजूस महादेवाचें अवाढव्य लिंग असलेलें छोटेंसें देऊळ मंडपांतच आहे. ह्या देवळाच्या चारी बाजूंस जवळ जवळ दोन पुरुष उंचीचे धिप्पाड द्वारपाल आहेत. ह्या द्वारपालांची ऐट मोठी पाहाण्यासारखी आहे.

ह्या मुख्य गुंफेंतच सर्व कांहीं पाहाण्यासारखें आहे. इतर गुंफा मोकळ्याच आहेत.

## विमानविरोधी तोफ

इतकी धावपळ करून आल्यानंतर फक्त एकच गुंफा पाहून संतोष मानायचा हें कांहीं मनाला पटेना, म्हणून आणखी कांहीं पाहाण्यासारखें आहे कीं काय, ह्याची चौकशी सुरू केली. तेव्हां टेकडीच्या माथ्यावर एक मोठी तोफ असल्याचें कळलें, म्हणून तेथें जाण्याचें ठरविलें. ह्या ठिकाणीं नुकत्याच तोडलेल्या, हातांत धरायच्या जंगली काठ्या विकत मिळतात. २, ४, ६ व ८ आणे किंमतीच्या त्या काठ्या मजेशीर

दिसतात आणि घारापुरीच्या सफरीची आठवण म्हणून लोक हटकून त्या विकत घेतात. आम्हींही एक काठी विकत घेतली आणि उन्हाच्या माऱ्याला न जुमानतां, टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोंचलों. तेथें एखादी शिवकालीन पुराणी तोफ असेल, असें आम्हांस वाटलें होतें. परंतु प्रत्यक्ष पाहिलें, तों एक भली जंगी विमान-विरोधी तोफ तेथें दिसली. दुसऱ्या महायुद्धांत शत्रुपक्षीय विमानहल्ल्याला तोंड देऊन, मुंबईचें संरक्षण करण्याची जबाबदारी ह्या तोफेवर पडली होती. परंतु बिचारीला आपलें कर्तृत्व दाखविण्याची संधिच न लाभल्यामुळें, तिची यंत्रसामग्री गंजून पडली आहे. ह्या ठिकाणाहून मुंबईचें दृश्य मोठें सुंदर दिसतें आणि सारी मुंबापुरी टप्प्यांत येते. मुंबईच्या संरक्षणाच्या दृष्टीनें ही टेकडी खरोखरच अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परंतु आम्हांला सध्या जागतिक शांततेची आणि ईजिप्तच्या संरक्षणाची इतकी काळजी लागून राहिलेली आहे, कीं आपल्या देशाच्या मोक्याच्या ठिकाणांकडे लक्ष देण्यासही सवड नाहीं किंवा सुचत नाहीं. ती दुर्दशाग्रस्त तोफ केविलवाणेपणानें आम्हांला जणूं हाच सवाल करीत होती, " मी अशीच धूळ खात पडणार काय ? "

## एका तासांत मुंबई गांठली

परंतु तोफेच्या सवालाला जबाब देण्याचें सामर्थ्य आमच्याजवळ नव्हतें आणि तिच्या दुःखाशीं समरस होऊन, घटकाभर तेथें थांबण्याइतकी सवडही आम्हांला नव्हती. आम्ही घाईघाईनें तिचा निरोप घेऊन, जवळपासच्या मोडक्या सैनिकी बराकींकडे ओझरता दृष्टिक्षेप करून, खालीं उतरलों आणि पडावांत येऊन बसलों. आतां वारें सुंदर सुटलें होतें. उन्हेंही कललीं होतीं. ह्यामुळें वाटेल तितका वेळ लागला, तरी आमची हरकत नव्हती. पण आमचा पडाव बोटीपेक्षांही अधिक वेगानें निघाला आणि तीरासारखा सरळ मुंबई बंदरात येऊन भाऊच्या धक्क्याला लागला. जें अंतर काटण्यास सकाळीं आम्हांला चार तास लागले, तेंच अंतर आम्हीं आतां एका तासांत कापलें व ह्या वेळीं

डफरीन बोटीच्या अगदीं जवळून आम्ही आलों. किनाऱ्यावर पाऊल ठेवून आम्हीं मागें पाहिलें आणि आमच्या तोंडून उद्गार निघाले, "अरे, ही इथें तर आहे घारापुरी ! किती जवळ ! पुढेंमागें तेथपर्यंत लोकलसुद्धा जाऊं शकेल ! "

ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ ꙮ

# कार्ल्याची कारागिरी

## चढणीचा अनपेक्षित त्रास

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं शाळेंत शिकत असतां पुण्याहून कांहीं मित्रांबरोबर मी सायकलवरून एका दमांत कार्ल्याला गेलों होतों व लेणीं पाहून लगेच परतलों होतों. त्या अतिश्रमाचें फळही त्या वेळीं भोगावें लागलें होतें, परंतु कां कोण जाणे, कार्ल्याच्या लेण्याच्या भव्यतेची छाप कांहीं त्या वेळीं तरी माझ्या मनावर पडली नाहीं. त्यामुळें पुण्याला अनेक वर्षें राहात असूनही व पुणें-मुंबई मार्गानें शेकडों वेळां प्रवास करण्याचे प्रसंग आले असतांही, वाटेंत उतरून कार्ल्याचीं लेणीं पाहाण्याची इच्छा मला कधीं झाली नाहीं. त्यानंतर एका सरकारी अधिकाऱ्यांना तेथें घेऊन जाण्याचा प्रसंग माझ्यावर नुकताच आला आणि त्या निमित्तानें तेथील लेण्यांचें दर्शन पुनः एकदा घडलें. पंचवीस वर्षांनंतरही तेथील दृश्यांत कांहीं बदल झाल्याचें आढळलें नाहीं, परंतु प्राचीन शिल्पकलेकडे पाहाण्याची दृष्टि कांहींशी विकसित झाल्यामुळें, भव्यतेंतील जें सौंदर्य पूर्वीं दिसूं शकलें नव्हतें, तें ह्या खेपेला थोड्याफार प्रमाणांत दिसलें. त्यामुळें त्या सरकारी अधिकाऱ्यांचे मीं मनःपूर्वक आभार मानले. कारण ते आले नसते, तर मीं पुनः कार्ल्याचीं लेणीं बहुधा पाहिलीं नसतीं व मग हा लेखही लिहिला गेला नसता !

एका बाबतींत मात्र अनपेक्षितपणें त्रास झाला, तो म्हणजे चढणीचा! आमच्याजवळ स्वतःची मोटार असल्यामुळें, आम्हांला मळवली किंवा लोणावळा स्टेशनवर उतरून पायपीट करावी लागली नाहीं. आम्ही अगदीं थेट डोंगराच्या पायथ्याशीं जाऊन पोंचलों आणि एक वाटाड्या बरोबर घेऊन, डोंगर चढूं लागलों. तसें पाहिल्यास पायथ्यासून लेण्यांपर्यंत फक्त ५०० फुटांचाच चढ आहे आणि हा चढ अत्यंत सोपा आहे, अशी मनावर एक छाप होती, परंतु जेव्हां प्रत्यक्ष चढण चढायला सुरुवात केली, तेव्हां लवकरच तिच्या सोपेपणाविषयींचा भ्रम नाहींसा झाला आणि ती चढण हसत-खेळत चढून जाण्याऐवजीं धापा टाकीत, विश्रांति घेत, कसें-बसें स्वतःचें अवजड (वाटणारें) शरीर वर चढवावें लागलें. ह्याचें मुख्य कारण लहानपणचें हलकें शरीर, चपळाई व डोंगर चढण्याची सवय, ह्यांच्या जागीं अवजड शरीर, सुस्तपणा व गिर्यारोहणाच्या सवयीचा अभाव, ह्या गोष्टी आलेल्या होत्या, हेंच असलें पाहिजे. दुसरेंही एक कारण होतें. तें असें, कीं मिष्टान्नावर यथास्थित हात मारून, आम्ही मुंबईहून निघालों होतों आणि दुपारीं ऐन बारा-एक वाजण्याच्या सुमारास कार्ल्याचा डोंगर चढूं लागलों होतों. वस्तुतः त्या वेळीं आमच्या सुखवस्तु व सुखासीन शरिरांना भरपूर वामकुक्षीची जरूर होती. त्याऐवजीं आम्हीं त्यांना उन्हातान्हांत फरफटायला लावलें होतें. त्यामुळें नाठाळ घोड्यांप्रमाणें तीं पदोपदीं पुढें जाण्याचें नाकारीत होतीं, ह्यांत आश्चर्य तें कसलें?

## भव्य व सुंदर चैत्य

कार्ल्यांचीं बौद्धधर्मीय लेणीं हीं भारतांतील अत्यंत प्राचीन लेण्यांपैकीं समजलीं जातात. इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकांत तीं कोरलेलीं आहेत. त्यांची रचना व कलाकौशल्य अप्रतिम आहे. हें कलाकौशल्य सर्व लेण्यांमध्यें नसून, एकाच मुख्य लेण्यामध्यें पाहायला मिळतें. हें लेणें म्हणजे चैत्य असलेला मधला सुशोभित दिवाणखाना

होय. ह्या लेण्याच्या वरच्या बाजूस डोंगरांतही बरींच लेणीं आहेत, पण तीं मुख्यतः लहान-मोठ्या गुंफांच्या आकारांचीं असल्यामुळें त्यांत पाहाण्यासारखें फारसें नाहीं. चैत्याचें लेणें पाहिलें, कीं त्यांत सर्व लेणीं येऊन जातात. येथील चैत्य अत्यंत भव्य व सुंदर असून, भारतांतील सर्वांत मोटें चैत्यगृह बनण्याचें भाग्य ह्या चैत्याला लाभलें आहे. बौद्धांच्या हीनयान संप्रदायाचें हें चैत्यगृह १४५ फूट लांब, ४५ फूट रुंद व ४६ फूट उंच आहे. चैत्यगृहाच्या प्रवेशद्वारांत एक विशाल सिंहस्तंभ असून, तेथून चैत्यगृहाबाहेरील शिल्पकलेची झलक दृष्टीस पडते. उजव्या बाजूस डोंगराच्या भिंतींत कोरलेले प्रचंड हत्ती (त्यांची सोंड व पुढचे पाय एवढेच भाग आपल्याला दिसतात.) असून, त्यांच्यावर तीन-चार मजलेपर्यंत सुंदर मूर्ति कोरलेल्या आहेत. चैत्यगृहांत प्रवेश करण्यास तीन मार्ग असून, मधला मार्ग धर्मगुरूंसाठीं व बाजूचे दोन मार्ग सर्वसामान्य भक्तांसाठीं आहेत.

## चैत्य म्हणजे काय ?

बौद्धधर्मीय लोकांनीं, आपल्या उपासनेसाठीं कोरलेल्या लेण्यांपैकीं जें मोठें दालन, त्याला चैत्य किंवा चैत्यगृह असें म्हणतात. चैत्य ह्याचे 'उपासनागृह', 'वटवृक्षाचा पार', 'पिंपळाचें झाड', 'स्मारक', 'मंदिर', 'प्रतिबिंब', वगैरे अर्थही आहेत. परंतु ज्यामध्यें स्तूप आहे, अशा लेण्यालाच मुख्यतः चैत्य असें म्हटलें जातें. चैत्याचें खिश्चन लोकांच्या चर्चशीं पुष्कळच साम्य असतें. आंत प्रवेश केल्यानंतर दालनाच्या दुसऱ्या टोकास असलेल्या स्तूपावरच आपली नजर जाते.

## स्तूप म्हणजे काय ?

स्तूप ह्याचा शब्दशः अर्थ 'ढीग', 'ढिगारा', 'मातीची किंवा दगडांची भिंत' किंवा 'चिता' असा आहे. त्याचा आकार भल्या मोठ्या घंटेसारखा, घुमटासारखा, घागरीसारखा, भात्याणाच्या (पेंढ्याच्या) गंजीसारखा, कमळासारखा, वगैरे असतो. परंतु

सर्वसामान्य स्तूप हे घुमटाच्या आकाराचेच असतात. निम्या भागापर्यंत सरळ उभी गोल भिंत, तिच्यावर अर्धगोलाकृति घुमट व त्याच्यावर छत्र, असें कार्ल्याच्या चैत्यांतील स्तूपाचें स्वरूप आहे. बुद्धपूर्व काळीं आर्य लोकांमध्यें चक्रवर्ती राजांचें स्मारक म्हणून अशा प्रकारचे स्तूप उभारले जात असत, परंतु गौतम बुद्धांनीं ह्या स्तूपांना एक नवीन अर्थ प्रदान केला. भगवान् बुद्ध आपला पट्टशिष्य आनंद ह्याला म्हणतात, "ते लोक चक्रवर्ती सम्राटांच्या अवशेषांना जो मान देतात, तोच त्यांनीं तथागताच्या अवशेषांना द्यावा. चौरस्त्यावर (चौकांत) तथागतासाठीं त्यांनीं एक डॅगोबा (स्तूप) उभा करावा. तेथें जो कोणी फुलांच्या माळा वाहील, धूप-दीप लावील, त्याला रंग देईल किंवा तेथें प्रार्थना करील अथवा शांत हृदयानें नतमस्तक होईल, त्याला सुख व आनंद लाभेल." अशा प्रकारें जो स्तूप एके काळीं वीरपूजेचें प्रतीक होता, तोच तथागतांच्या ज्योतिर्मय आत्म्यांच्या निवासाचें प्रतीक बनला. कांहीं स्तूपांमध्यें पणत्या ठेवण्याचीही सोय केलेली असे. ह्या पणत्या जेव्हां पाजळल्या जात, तेव्हां तो स्तूप म्हणजे एक मोठा प्रकाशपुंजच आहे, असा भास होई. ह्या स्तूपाला सिंहली भाषेंत 'डॅगोबा' व ब्रह्मी भाषेंत 'पॅगोडा' असें म्हणतात. संस्कृत 'धातुगर्भ' हा शब्दही स्तूपासाठीं वापरण्यांत येतो. कारण त्या स्तूपाच्या पोटांत 'धातु' म्हणजे तथागताचे (बुद्धाचे) अवशेष ठेवलेले असतात. त्या 'धातुगर्भ' शब्दावरून 'डॅगोबा' व त्यावरून 'पॅगोडा' असे शब्द बनले असणें अगदींच अशक्य नाहीं.

स्तूपाचा अर्थ सांगतांना अनगारिक ब्रह्मचारी गोविंद हे बौद्ध विद्वान 'स्तूपाच्या प्रतीकवादांतील कांहीं दृष्टिकोण' ह्या लेखांत म्हणतात, "स्तूपाचा घुमटासारखा मुख्य भाग हें अनंत आकाशाचें प्रतीक आहे. आकाश हें विनाश व निर्मिति, मृत्यु व जन्म ह्या सर्वांना आपल्या पोटांत स्थान देतें. हीच गोष्ट, स्तूपाच्या कळसाची पाण्यावरील बुडबुड्याशीं आणि अंड्याशीं तुलना करून जुने बौद्ध विद्वान स्पष्ट

करीत असत. (बुडबुडा हें विनाशाचें व अंडें हें नवनिर्मितीचें प्रतीक समजलें जातें.) त्याच्यावरील बलिवेदीच्या आकाराची हर्मिका म्हणजे जन्म-मृत्यूच्या पलीकडे असलेलें स्थान होय. हें प्रतीकही निरर्थक म्हणतां येणार नाहीं. कारण पवित्र पुरुष हा इतर प्राण्यांचा बळी देण्याऐवजीं जगाच्या बलिवेदीवर स्वतःचेंच बलिदान करतो.'' विहार हे जितके साधे असतात, तितकेच चैत्य हे कलाकुसरीनें नटलेले असतात. चैत्याच्या आंतील कमानींचें खोदकाम लाकडी कामासारखें कोरीव असतें. अत्याधुनिक पद्धतींच्या स्थापत्यांमध्यें अशा प्रकारच्या कमानी पाहायला मिळतात. त्यावरून त्यांचें कलामूल्य लक्षांत येऊं शकेल.

## कार्ल्याच्या कमानींची कमनीयता

कमानींचें हें सौंदर्य कार्ल्याच्या चैत्यगृहांतही पाहायला मिळतें. मोहक व मजबूत अशा ३७ खांबांवरील एका रेषेंत असणाऱ्या त्या कमानी मनांत त्या भव्य शिल्पाबद्दल आदर निर्माण करतात. त्या खांबांवर (माथ्यांवर) ज्या आकृति कोरलेल्या आहेत, त्यांत वैचित्र्य व वैविध्य असूनही त्या सर्वांमध्यें एक प्रकारची एकतानता आहे. कांहीं खांबांवर गुडघे टेकलेले दोन-दोन हत्ती असून, त्यांवर प्रत्येकीं एक स्त्री व एक पुरुष बसलेले आहेत. कांहीं खांबांवर घोडे आहेत.

## झरोक्यांचें वैशिष्ट्य

एवढ्या मोठ्या दालनामध्यें प्रकाश येण्याची कांहीं सोय नसती, तर आंतील सारी कलाकुसर व्यर्थच गेली असती, परंतु आंत भरपूर उजेड येण्याची सोय करण्यांत आलेली आहे. हा उजेड वरच्या बाजूच्या झरोक्यांतून येतो. त्याचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांत प्रखरपणा मुळींच नाहीं. त्याचे किरण तिरपे आल्यामुळें हा प्रकाश अत्यंत सौम्य व डोळ्यांना आल्हाददायक वाटतो. त्याच्यामुळें अगदीं आंतल्या बाजूस असलेला स्तूपही स्पष्ट दिसतो. ह्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकाश-योजनेमुळें

चैत्यगृहांत एक प्रकारचें धार्मिक वातावरण भरून राहिल्याचा भास होतो.

## टाक्याचें शीत-मधुर जल

चैत्यगृहांतील कारागिरी पाहून आमचीं मनें अगदीं तृप्त झालीं. त्यामुळें वरच्या बाजूस असलेल्या गुंफा पाहाण्याची इच्छा उरली नाहीं. आम्ही जरा इकडे-तिकडे हिंडून पुनः एकवार चैत्यगृहाचें बाहेरून दर्शन घेतलें आणि जवळच असलेल्या टाक्यांतील थंडगार व अमृतमधुर पाणी पिऊन कार्ल्याचा निरोप घेतला. बहुतेक सर्वच लेण्यांमध्यें अशा प्रकारचीं पाण्याचीं टाकीं असतात, कारण तेथें विद्याध्ययन किंवा ध्यान-धारणा करणाऱ्यांना त्यांची आवश्यकताच असते, परंतु इतकें स्वच्छ व गोड पाणी फार थोड्या ठिकाणीं आढळतें. (घारापुरीच्या लेण्यांत असेंच गोड पाणी प्यायला मिळालें होतें.) अलीकडे ह्या लेण्यांमध्यें व त्यांच्या आसपास स्वच्छताही पुष्कळ ठेवलेली आढळते. त्यामुळें तेथें जातांच मन अत्यंत प्रसन्न होतें आणि बाह्य उपाधींचा क्षणकाल विसर पडतो. आम्ही चैत्य व स्तूप ह्यांच्या दर्शनानें इतके भारावून गेलों होतों, कीं आपण डोंगर उतरून खालीं केव्हां आलों, हेंच आम्हांला कळलें नाहीं.

# मराठ्यांची पहिली राजधानी : रायगड

## शिवाजीमहाराजांची कर्मभूमि

आपल्याकडे एक म्हण आहे : "काशीस जावें, नित्य वदावें." अर्थात् नुसतें 'वदत' राहिल्यानें कांही काशीयात्रा घडत नाहीं, पण त्यायोगें आपल्या संकल्पाचें स्मरण आपल्याला सतत राहातें आणि

योग्य संधि मिळतांच आपण तो संकल्प पूर्ण करून टाकतो. जरी कांहीं कारणामुळें तशी संधि मिळूं शकली नाहीं, तरी चिंतनानें व निदिध्यासानेंही पुण्यप्राप्ति होतेच कीं ! ह्या संकल्पाच्या बाबतींत आणखी एक म्हण आपल्याकडे प्रचारांत आहे : "सत्य संकल्पाचा दाता भगवान." तिचा अर्थही हाच आहे, कीं चांगला संकल्प मनाशीं बाळगला, कीं ईश्वर त्याची पूर्ति करतो. म्हणूनच समर्थांनींही मनाला उपदेश करतांना म्हटलें आहे, कीं 'मना सत्य संकल्प जीवीं धरावा।'

लहानपणीं इतिहास शिकतांना रायगडचा उल्लेख अनेकवार आलेला होता. चंद्रराव मोऱ्यांचा पराभव करून शिवाजीमहाराजांनीं इ. स. १६५६ सालीं हा किल्ला जिंकून घेतला; पुढें पांच-सहा वर्षांनीं (इ. स. १६६२-६३ सालीं) ह्याच किल्ल्यावर राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांना शिवाजीमहाराजांनीं कैदेंत ठेवलें होतें; तेथेंच ६ जून, १६७४ रोजीं गागाभट्टाकडून राज्याभिषेक करवून घेऊन शिवाजीमहाराज 'छत्रपति' बनले आणि ३ एप्रिल, १६८० रोजीं शिवाजीमहाराजांचें दुःखद देहावसान झालें, तेंही ह्याच किल्ल्यावर, वगैरे घटना लहानपणीं इतिहास शिकतांना तोंडपाठ कराव्या लागल्या होत्या. त्या वेळीं मराठी साम्राज्याची पहिली राजधानी बनण्याचा मान मिळालेल्या ह्या किल्ल्याचें दर्शन आपण घेतलेंच पाहिजे, असा संकल्प मनांत उत्पन्न होणें साहजिक होतें. जवळ जवळ पंचवीस वर्षांनीं तो संकल्प पुरा झाला; तो पुरा झाल्यावरच, असा संकल्प आपण केला होता, ह्याचें स्मरण मला झालें.

## किल्ल्यांचें महत्त्व

महाडला जातांना रायगडचा कार्यक्रम हा कांहीं प्रमुख नव्हता. श्री. त्रिकमभाईंच्या महाडला जायचें आहे, श्री. सुंदरभाईंचा पाहुणचार घ्यायचा आहे आणि शेजारच्या पालेगांवाजवळचीं तीन मजले उंचीचीं, ४७ खोल्या, पाण्याचीं सात टाकीं आणि मुख्य सभामंडपांत स्तूप असलेलीं बौद्धकालीन लेणीं पाहायचीं आहेत, हीच मुख्य कल्पना होती.

जमल्यास रायगडही पाहून घ्यावा, असें ठरवलें होतें, कारण लहानपणीं किल्ल्यांसंबंधीं जी दृष्टि होती, ती आतां उरलेली नाहीं. त्या वेळीं शिवाजीमहाराजांच्या किल्ल्यांचें दर्शन घेणें, म्हणजे राष्ट्रप्रेमाची, देशभक्तीची, स्वार्थत्यागाची दीक्षा घेणें होतें. किल्ल्यांचे तट, तेथील गंजलेल्या तोफा-बंदुका आणि भग्नावशेष पाहून पारतंत्र्याची जाणीव उत्कटतेनें होई आणि इंग्रजांच्या गुलामगिरींतून भारतमातेला सोडवायचा संकल्प अधिक दृढ होई. देशासाठीं प्राणार्पणही करण्याची स्फूर्ति किल्ल्यांच्या दर्शनानें प्राप्त होई. अशा प्रकारें किल्ले हे आमचे स्फूर्तिदाते होते आणि त्या स्फूर्तीच्या बळावरच आम्ही लहान मुलें पुण्याहून चालत सिंहगडला जात असूं.

आतां तो काळ बदलला आहे. आतां किल्ले पाहून जुना इतिहास डोळ्यांसमोर तरळून जातो, पण त्यायोगें जोष, आवेश, स्फूर्ति जागृत होत नाहीं. मनांत विचार येतो, युद्धाच्या अत्याधुनिक तंत्रामुळें किल्ल्यांना आतां कांहींच महत्त्व उरलेलें नाहीं. थंड हवेचीं ठिकाणें— श्रीमंतांना चैनींत राहातां यावें आणि गरिबांना मोलमजुरी मिळावी, म्हणून बनविण्यांत आलेलीं हवा खाण्याचीं ठिकाणें — ह्यापेक्षां त्यांना अधिक महत्त्व उरलेलें नाहीं. ह्या सत्य स्थितीच्या जाणिवेनें अंतःकरणांत खोल कोठेंतरी कळ उठते, क्षणभर मन बावरल्यासारखें होतें. 'छेः छेः! असें असतां कामा नये,' असें तें ओरडून सांगूं इच्छितें, पण त्याचा आवाज बाहेर येत नाहीं, तो आंतल्या आंतच गुदमरून जातो.

मन शहाणपणाचा आव आणून आपलीच समजूत घालूं लागतें, 'अरे, इतिहासाची कुबडी तुला कशाला हवी? तूं आतां स्वतंत्र आहेस, चांगला धडधाकट आहेस. तूं मागें वळून पाहातोस कशाला? पुढें पाहा — सुदूर भविष्यांत डोकावून पाहा. तुझें भवितव्य तुझ्या हातांत आहे. तें नीट घडव, बनव. आतां तो जुना इतिहास रामायण-महाभारताप्रमाणें पुराणांत जमा झाला. फावल्या वेळीं त्याचें मनन-

अध्ययन करावं आणि मिळाल्यास मनःशांति मिळवावी. मार्गदर्शनासाठीं त्याच्याकडे पाहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं ...'

## पाचाडचें रत्नखचित नीलाकाश

असें असलें, तरी रायगड पाहून आल्यानंतर आपला वेळ वायां गेला, असें मात्र वाटलें नाहीं. उलट तो वेळ सार्थकीं लागला, आपल्याला पुष्कळच कांहींतरी मिळालें, असें समाधान मनाला लाभलें. कदाचित् बालपणींचा तो संकल्प पुरा झाल्याचें तें समाधान असेल किंवा रायगडावरून निसर्गाचें जें भव्य दृश्य पाहायला मिळालें, त्यामुळें लाभलेली ती कृतार्थता असेल. कदाचित् दोन्ही गोष्टी त्यांत असतील !

रायगडला जाण्यासाठीं आम्ही एस्. टी. नें दुपारीं ३ वाजतां निघालों. कोकणांतल्या गाड्यांना नेहमींच भयंकर गर्दी असायची, त्याप्रमाणें ती आजही होती. ह्या भागांतले शेतकरी फार मोठ्या प्रमाणावर सैन्यांत भरती होतात. त्यांचें आणि मुंबईच्या गिरण्यांतून काम करणाऱ्या मजुरांचें जाणें-येणें सारखें चालू असतें. त्या मानानें गाड्यांची सोय मात्र पुरेशी नसते. आगाऊ 'रिझर्व्हेशन' करून ठेवल्यामुळें आम्हांला जागा मिळण्यास अडचण पडली नाहीं. पण शेवटीं गर्दी इतकी झाली, कीं त्या रिझर्व्हेशनचा फायदा असा कांहींच मिळाला नाहीं. गर्दीमुळें गाडीला सुटायला उशीरही खूप झाला. ३ वाजतां सुटायची गाडी ४-३० ला सुटली आणि १२ मैलांचें अंतर कापून ती कोंझरला पोंचली, तेव्हां ६ वाजून गेले होते. लवकर पोंचलों असतों, तर रायगडावर रात्र काढतां आली असती, पण ...

कोंझरपासून पाचाडपर्यंत तीन मैल चालावें लागतें. हा रस्ता चढणीचाच आहे. वस्तुतः कोंझरपासूनच रायगडची चढण सुरू होते, असें म्हणायला हरकत नाहीं. पाचाड हें रायगडच्या अगदीं पायथ्याशीं आहे. तेथील धर्मशाळेंत आम्हीं मुक्काम ठोकला होता. जवळच

पाण्याचा झरा होता. त्यामुळें अंधार पडण्यापूर्वी बरोबर आणलेल्या खाद्य पदार्थांचा व्यवस्थित समाचार घेतां आला.

डिसेंबरचे दिवस, पण थंडी अजिबात नव्हती. उलट आजूबाजूच्या डोंगरांनीं आणि टेकड्यांनीं वारें अडवल्यामुळें उकडतच होतें. आम्ही थंडीपासून बचाव करायला मारे मोठमोठीं ब्लँकेटें आणि घोंगड्या बरोबर नेल्या होत्या, पण त्यांचा उपयोग पांघरण्याऐवजीं अंथरण्यासाठींच करावा लागला. पाचाडला आणि गडावर उन्हाळ्यांत चांगलाच गारठा असतो, असें तेथील अनुभवी मंडळींनीं सांगितलें. हाही एक निसर्गाचा चमत्कारच म्हणायचा ! अर्थात् त्याचें कारण शोधून काढणें कांहीं अवघड नाहीं. जोंपर्यंत शेतें, रानें, झाडें हिरवींगार आहेत, पाणी भरपूर आहे, तोंपर्यंत हवेंत दमटपणा राहाणार व त्या दमटपणामुळें थोडासा उकाडा होणार, हें उघडच आहे.

रात्रीं तेथील निरभ्र आकाश हें आम्हांला मोठें आकर्षण वाटलें. डोंगरांनीं वेढलें गेल्यामुळें तें आकाश अगदीं छोटेंसें वाटत होतें. निळ्याभोर आकाशांतील चांदण्या एखाद्या चांदव्याला लावलेल्या रत्नांसारख्या भासत होत्या. कृष्ण द्वादशी असल्यामुळें चंद्राचा किंवा चांदण्याचा प्रश्नच नव्हता, पण आकाशांतील असंख्य चांदण्यांमुळें तो काळोख उजळून निघाल्यासारखा दिसत होता. धर्मशाळेच्या पडवींत पडल्या पडल्या कितीतरी वेळपर्यंत ताऱ्यांचें तें मूक संगीत मी ऐकत होतों. त्या तंद्रींत केव्हां झोप लागली, तेंच कळलें नाहीं.

## सुबत्ता आणि मग्रुरी

सकाळीं सात वाजतां गड चढण्यास सुरुवात केली. चि. मायाला घेण्यासाठीं एक आणि सामानासाठीं एक, असे दोन गडी करावे लागले. त्यांना पांच रुपये द्यावे लागले. कोंझरहून पाचाडला जाईपर्यंतही गड्यांना दोन रुपये द्यावे लागले होते. इतकी मजुरी सहसा पडत नाहीं, पण मजुरीपेक्षांही मजुरांची मग्रुरी विशेष खटकली. ते अशा प्रकारें बोलत आणि वागत होते, कीं जणूं त्यांना कांहीं जरूरच

नव्हती. विशेष चौकशी केल्यावर कळलें, कीं यंदां पीकपाणी भरपूर झालें असल्यामुळें, तेथील लोकांना पैशाची पर्वा वाटत नाहीं. सुबत्तेमुळें आलेली ती मग्रुरी पाहून गंमत वाटली.

## दमछाक करणारी चढाई

अनेक वेळां एका दमांत सिंहगड चढून गेलेला मी. त्यामुळें एक प्रकारच्या आत्मविश्वासानें किंबहुना गुर्मीतच मीं रायगड चढायला सुरुवात केली, पण लवकरच लक्षांत आलें, कीं रायगड म्हणजे सिंहगड नव्हे. रायगडच्या दुर्गमपणामुळेंच शिवाजीमहाराजांनीं तेथं आपली राजधानी बनवली असली पाहिजे आणि त्याच्यासभोवतीं असणाऱ्या निसर्गनिर्मित उभ्या कड्यांमुळेंच इंग्रजांनीं त्याला ‘पूर्वेकडील जिब्राल्टर’ म्हटलें असलें पाहिजे. अधूनमधून कच्च्या पायऱ्याही आहेत. परंतु पायऱ्यांमुळें चढण कांहीं कमी होत नाहीं.

पहिल्या झपाट्यासरशीं ‘खूबलढा बुरुज’ पर्यंत आम्ही जाऊन पोंचलों. परंतु नंतर मात्र वेग खूपच कमी झाला. आतां जरा आसमंतांत दृष्टि फिरवूं लागलों. आसमंतांत म्हणजे डाव्या बाजूला. कारण उजव्या बाजूला किल्ल्याचा डोंगरच होता. त्याच्या कडेकडेनेंच रस्ता आहे. डाव्या बाजूचें गांधारी नदीचें विस्तृत खोरें, ती खोल दरी आणि क्षितिजापर्यंत पसरलेलीं शेतें, ह्यांचें दृश्य मोठें मोहक दिसत होतें. त्यामुळें पुष्कळच श्रमपरिहार होत होता, वर चढण्यास नवा हुरूप मिळत होता.

## ‘हिरकणी बुरूज’

नंतर दिसूं लागतो ‘हिरकणी बुरूज.’ गडावर कोजागिरीच्या दिवशीं दूध विकण्यासाठीं गेलेल्या हिरकणी नांवाच्या गवळणीची ती चिरपरिचित कथा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहाते. इतक्या अवघड बुरुजावरून कशी उडी मारली असेल तिनें ? पण वात्सल्याचें सामर्थ्य काय करूं शकणार नाहीं ? महाराजांची गुणग्राहकताही त्याच तोडीची.

त्यांनीं ह्या बुरुजाला ' हिरकणी ' चें नांव देऊन, तिचें मातृत्व अमर करून ठेवलें.

## ' गंगासागर ' च्या कांठची धर्मशाळा

अखेर बसत-उठत, रखडत-रखडत महादरवाजाच्या बत्तीस पायऱ्या चढून आम्हीं आंत प्रवेश केला आणि ' गंगासागर तलावा ' कांठच्या लोकलबोर्डाच्या धर्मशाळेंत शिरलों, तेव्हां दहा वाजून गेले होते. म्हणजे सुमारें तीन-चार मैलांच्या ह्या चढणीला तीन तास लागले होते. ' हुश्श ' करून, धर्मशाळेच्या पडवींत बसून, आम्हीं समोरच्या दरीकडे पाहिलें आणि ती पाहाण्यांतच गुंग होऊन गेलों ! आतां आम्ही समुद्रसपाटीपासून २,८५१ फूट उंचीवर आलों होतों. ती हिरवीगार खोल दरी पाहातां पाहातां आमच्या श्रमांचा आम्हांला विसर पडला, पण तेथेंच पाहात बसून भागण्यासारखें नव्हतें. ऊन तापण्यापूर्वीं गडावरचीं प्रेक्षणीय स्थळें पाहून यायला हवें होतें. पोटांत कावळे ओरडूं लागले होते. त्यांनाही शांत करणें भाग होतें. म्हणून थोडी-फार न्याहारी करून, आम्ही गड पाहायला निघालों.

शेजारींच ३७५ फूट लांब व ३०० फूट रुंद असलेला ' गंगासागर तलाव ' होता. आज रायगडावर स्वच्छ व विपुल पाणी येथेंच मिळूं शकतें. तलाव कांठोकांठ पाण्यानें भरलेला होता. पाणी आम्हांला कडकडून भेटण्यासाठीं ( स्नानासाठीं ) बोलावीत होतें, पण एक तर त्या पाण्यांत आंघोळ करायची नसते, कारण तेंच पिण्याचें पाणी आहे आणि दुसरें म्हणजे, त्या वेळीं आम्ही स्नानांत गुंतलों ( किंवा गुंगलों ) असतों, तर गड पाहायचें काम रखरखीत उन्हांत करावें लागलें असतें. म्हणून ओंजळीनें पोटभर पाणी पिऊन, थोड्या वेळानें स्नानासाठीं परत येण्याचें त्या नाममात्र ' सागरा ' ला आश्वासन देऊन, आम्ही त्याच्या कांठीं असलेले मनोरे पाहायला पुढें निघून गेलों. मनोऱ्यावर चढून सभोवतालचें सृष्टिसौंदर्य निरखण्यांत एक अद्भुत आनंद असतो, ह्यांत शंका नाहीं. पूर्वीं ह्या मनोऱ्यांना पांच मजले होते. पण आतां फक्त

दोन मजले उरले आहेत. त्यांची उंची ४० फूट आहे. हे मनोरे गोल नसून बाराकोनी आहेत.

## प्रशस्त बाजारपेठ

बालेकिल्ला, पालखी दरवाजा, सात महाल, अंधारकोठड्या, राजवाडा, राण्यांची हवा ग्याण्याची जागा, कलुषाचा वाडा, वगैरे भग्नावशेष पाहून, होळीच्या माळावरून शिवछत्रपतींच्या समाधीकडे जात असतां, वाटेंत बाजारपेठ लागते. ह्या पेठेवरून ह्या डोंगरी किल्ल्यावरील राजधानीच्या व्यापाची कांहींशी कल्पना येते. मध्यें प्रशस्त रस्ता सोडून, रस्त्याच्या दुतर्फा लांबच लांब दुकानांची ओळ दिसते. आतां फक्त त्यांचीं जोतींच शिल्लक आहेत. घोड्यावर बसल्या बसल्या माल घेतां येईल, इतकी त्या जोत्यांची उंची असली पाहिजे. त्यांच्या संख्येवरून तेथें ४८ दुकानें असावींत, असें वाटतें. कदाचित् जास्तही असतील. ४८ किंवा ५० दुकानें जेथें भरभराटींत असतील, तेथील लोकवस्तीचें अनुमान इतिहासज्ञ सहज काढूं शकतील. आमचीं अनुमानें ५० हजारांपासून १ लाखापर्यंत धावलीं. दुकानांची बांधणी मात्र चांगली प्रशस्त व सोईची असली पाहिजे. ते भग्नावशेष पाहून मनांतून उद्गार निघाला, ‘ कालाय तस्मै नमः । ’

## काळा, तुझी ही कृति !

तेथून पुढें जाण्यापूर्वी दक्षिणेच्या बाजूला छत्रपति शिवाजीमहाराजांना जेथें राज्याभिषेक करण्यांत आलेला होता, ती सिंहासनाची जागा पाहिली. ती इमारत सगळी उध्वस्त झालेली असून, चोहोंबाजूंना पडक्या भिंती उभ्या आहेत. ज्या स्थानीं बसून शिवरायांनीं हिंदवी स्वराज्याचीं सूत्रें हलविलीं, जेथें येऊन गोरे व्यापारी उदीयमान साम्राज्याच्या त्या बालरवीला तीन वेळां झुकून कुर्निसात करीत होते, त्या सिंहासनाची ती दुर्दशा पाहून रडूं कोसळलें. ‘ रायगड स्मारक-

मंडळा ’ नें तेथें थोडी साफसफाई केलेली असल्यामुळें, थोडा वेळ त्याच्याकडे पाहावतें तरी, पण तरीही जुन्या वैभवाचीं काल्पनिक चित्रें डोळ्यांसमोर उभीं राहून, आमच्या हलगर्जीपणाचा जगूं तीं धिःकार करीत आहेत, असें वाटतें.

## दोन सुबक समाध्या

तेथून पुढें गेलें, कीं जगदीश्वराचें म्हणजे महादेवाचें देऊळ लागतें आणि त्या देवळासमोरच शिवछत्रपतींची व त्यांच्या इमानी कुत्र्याची, अशा दोन सुबक चिरेबंदी समाध्या आहेत. कुत्र्याची प्रतिमा अत्यंत कलापूर्ण असून, ती अगदीं सजीव वाटते. उजव्या हाताला बारा टाकीं असून, त्यांच्या पलीकडे दारूच्या कोठारांचे भग्नावशेष दिसतात. समोरच्या बाजूला ‘ भवानी ’ बुरूज आहे.

परत येतांना ‘ शिरकाई ’ ( शिर्क्यांची देवता — भवानी ) ह्या अष्टभुजा असुरमर्दिनी देवीचें छोटेंसें देऊळ लागतें. तें वस्तुतः आमच्या धर्मशाळेच्या मागल्या बाजूलाच होतें, पण तें आधीं न पाहातां आम्हीं शेवटीं पाहिलें.

## स्नानाचा अपूर्व आनंद

एव्हांना बारा वाजून गेले होते. अंगांतून घामाच्या धारा लागल्या होत्या. त्यामुळें स्नान हीच एकमेव गोष्ट सुचण्यासारखी होती. आम्ही कपडे काढून, तडक गंगासागर तलावावर गेलों आणि मनसोक्त स्नान केलें. डुंबायला मिळालें नाहीं, तरी कांठावर बसून भरपूर पाणी घेतां आलें. आतां वर तळपणाऱ्या सूर्याची आणि त्याच्या कडक उन्हाची आम्हांला पर्वा नव्हती, पण पोटांत भडकलेल्या आगीची मात्र उपेक्षा करून चालण्यासारखें नव्हतें. म्हणून इतरांना लवकर आटपायचा आग्रह करीत, पण स्वतः मात्र रेंगाळत, आम्हीं तो स्नानाचा कार्यक्रम कसाबसा संपवला आणि बरोबरच्या महिलांनीं तयार केलेल्या ऊन-ऊन भात-आमटीवर ताव मारला.

## ' टकमक ' बुरूज

भरपूर विश्रांति घेऊन आम्ही उठलों, चहा-कॉफी घेतली आणि गडाचा निरोप घेण्यापूर्वीं कांहीं उरलेल्या गोष्टी पाहून घेतल्या. त्यांपैकीं ' टकमक टोक ' किंवा ' टकमक बुरूज ' ही एक महत्त्वाची गोष्ट होती. ह्या बुरुजापर्यंत जाण्यास एक अरुंद पायवाट असून, त्या वाटेच्या दोन्ही बाजूंना डोळे फिरतील अशा भयंकर खोल दऱ्या आहेत. ह्या वेळीं वारें इतकें जोरांत सुटलें होतें, कीं त्या तुटलेल्या कड्यावर जाणें भयंकरच धोक्याचें होतें. ( नंतर कळलें, कीं दुपारनंतर येथें भयंकर वारें सुटतें, म्हणून हें टोक सकाळींच पाहून घ्यायला हवें. ) तरी पण पुष्कळच जवळ जाऊन, तें टोक पाहून आलों. पूर्वींच्या काळीं गुन्हेगारांना येथून कडेलोटाची शिक्षा देत असत. ही शिक्षा देतांना लोक टकमक बघत राहात, म्हणून त्याला ' टकमक टोक ' हें नांव मिळालें. ह्याच्याच खालच्या बाजूला रायनाक ह्या महार वीराचें थडगें आहे.*

---

* **रायनाक महार** : इ. स. १८१८ सालीं इंग्रजांनीं रायगडास वेढा घालून मारा सुरू केला, पण मारा लागू पडेना. तेव्हां वालसूरच्या खोतांनीं फितुरी करून माऱ्याच्या जागा व तोफा डागण्यास किती अंशाचा कोन केला पाहिजे, वगैरे माहिती सांगितली. त्यामुळें इंग्रजांना रायगड सर करतां आला. पुढें वालसूरच्या खोतांविरुद्ध लोकमत भडकूं लागलें, तेव्हां पाचाडच्या महारांवर त्यांनीं आळ घेतला व ' आम्हीं फितुरी केली नाहीं, पाचाडच्या महारांनीं केली ' ( ह्यांतच रायनाक आला ) असें लोकांना भासविलें, पण पुढें डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कांहीं कागद उपलब्ध झाले, त्यांत रायनाक निर्दोषी आहे, इतकेंच नव्हे, तर त्यानें रायगड वेढ्याच्या वेळीं मराठ्यांच्या बाजूनें जी कामगिरी केली, तिच्यामुळें चिडून, इंग्रजांनीं रायनाकला फाशीं दिलें, असें आढळून आलें. डॉ. आंबेडकरांचे हे पुराव्याचे कागद कोठें प्रसिद्ध झालेले नाहींत अगर कोणा पाहिलेले नाहींत. परंतु रायनाकाचा टाक इकडील पोतनीस ( श्री. गोपीनाथपंत पोतनीस ह्यांचें घराणें ) व टिपणीस ( आमदार सुरबा टिपणीस ह्यांचें घराणें ) ह्या घराण्यांच्या पूजेंत आहे. ह्यावरून तो देशभक्तच असला पाहिजे, असें सिद्ध होतें.

## पुन्हा पाचाडला वस्ती

संध्याकाळीं पांच वाजतां आम्हीं गड उतरायला सुरुवात केली आणि सहा-तीसला पाचाडच्या धर्मशाळेंत पोंचलों. जातांना जेवढा वेळ लागला होता, त्याच्या बरोबर निम्म्या वेळांत आम्ही खालीं उतरलों. ह्यापेक्षांही लवकर उतरलों असतों, पण कसलीच घाई नसल्यामुळें रमत-गमत उतरलों. रात्रीं पाचाडच्या धर्मशाळेंतच वस्ती केली.

## राजमाता जिजाबाईंची समाधि

सकाळीं परत कोंझरला येतांना वाटेंत पाचाड गांवाजवळ असलेली जिजाबाईंची समाधि, विहीर आणि महाल पाहिला. महाल म्हणजे महालाचें फक्त जोतें. उतारवयांत जिजाबाईंना किल्ल्यावरील सोसाट्याचा वारा सहन होईना, म्हणून त्या पायथ्याशीं बांधलेल्या ह्या वाड्यांत राहात. शिवाजीमहाराज येथेंच त्यांच्या दर्शनाला येत. आज तो महाल कांटेरी झाडाझुडुपांत अदृश्य झालेला आहे.

नऊ वाजतांच्या गाडीनें निघून दहाला महाडला पोंचलों. त्या वेळीं गाडींत आम्ही सर्व मंडळी अगदीं शांत होतों. गडबड नाहीं, बडबड नाहीं, कीं हसणें-खिदळणें नाहीं. काल आणि आज जें कांहीं आम्हीं पाहिलें होतें, त्यानें आमचीं मनें जणूं अगदीं भारावून गेलीं होतीं !

ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ

# प्र ता प ग ड

## ‘ प्रतापगड जिजाबाईचा ’

“महाराष्ट्र प्रदेशाचं वैशिष्ट्य कोणतं ?” असें जर मला कोणीं विचारलें, तर मी सांगेन, “डोंगरी किल्ले हें ह्या प्रदेशाचं वैशिष्ट्य आहे.”

महाराष्ट्रामध्यें इतक्या वेगवेगळ्या प्रकारांचे डोंगरी किल्ले आहेत, कीं त्यांचें अध्ययन हा एक खास विषय होऊं शकेल. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीसंबंधीं लिहितांना ग्रँट डफनें म्हटलें होतें, कीं महाराष्ट्राइतका युद्धदृष्ट्या निसर्गतःच विकट व बळकट प्रदेश जगाच्या पाठीवर दुसरा सापडणें कठीण! तसेंच बोअर युद्धानंतर त्यांतील कांहीं राजकीय कैद्यांना ब्रिटिशांनीं साताऱ्यास आणून ठेविलें होतें. त्या वेळीं त्या कैद्यांनीं हा सारा डोंगरी भाग पाहून असे उद्गार काढले होते, कीं असा प्रदेश जर आमच्या ताब्यांत असता, तर अखेरचा स्वातंत्र्य-वीर जिवंत असेपर्यंत आम्ही ब्रिटिशांशीं झुंजलों असतों!

प्रतापगडचा किल्ला पाहिल्यानंतर हे दोन्ही उद्गार शब्दशः खरे असल्याबद्दल आपली खात्री पटते.

जावळीच्या स्वराज्यद्रोही चंद्रराव मोऱ्याचा शिरच्छेद शिवाजी-महाराजांना नाइलाजानें करावा लागला. तो प्रदेश स्वराज्यांत सामील झाला, तेव्हां त्या भागाचा नीट बंदोबस्त ठेवण्यासाठीं, रडतोंडीच्या घाटावर एक उत्कृष्ट व मजबूत किल्ला बांधण्याची गरज महाराजांना भासूं लागली. जावळीच्या जवळच तीन मैलांवर एक दणकट डोंगर उभा होता, त्याचें नांव भोरप्या किंवा ढोरप्या. अत्यंत मोक्याची अशी ती जागा होती. त्यावर मोरोपंत पिंगळ्यांनीं आपलें सारें लष्करी ज्ञान व कसब पणाला लावून, अत्यंत बळकट असा किल्ला बांधला, तोच हा प्रतापगड. जिजाबाईला हा गड फारच आवडला आणि म्हणूनच तुळशीदास व अज्ञानदास ह्या शाहिरांनीं म्हटलें आहे, 'राजगड राजाचा, प्रतापगड जिजाबाईचा!' गडावर चढून आसपासचें दृश्य पाहिलें, कीं मन कसें प्रसन्न होतें आणि असा हा गड जिजाबाईला आवडला, ह्यांत मुळींच आश्चर्य वाटत नाहीं.

## डोंगरी फूल कीं फूलपांखरूं ?

आजकाल प्रतापगडावर जाणें अगदीं सोपें झालें आहे... अगदीं पुण्याच्या पर्वतीवर चढण्यापेक्षांही सोपें! कारण अगदीं वरपर्यंत मोटार

जाते. वाई-पांचगणी-महाबळेश्वरवरून महाडला जातांना आपण रडतोंडीचा घाट उतरलों आणि पोलादपूरचा घाट उतरूं लागलों, कीं डाव्या हाताला असलेला इवलासा सुबक प्रतापगड आपल्याला खुणावूं लागतो. कांहीं लोकांना तो फूलपांखरासारखा दिसतो. पण मला मात्र तो एखाद्या दणकट डोंगरी फुलासारखाच दिसला. आम्ही महाड-रायगडला गेलों, तेव्हांच वस्तुतः प्रतापगडला जायचें, पण त्या वेळीं तें जमलें नाहीं आणि त्या वेळीं तें जमलें नाहीं, तेंच बरें झालें, असें नंतर वाटूं लागलें. कारण त्या वेळीं आम्ही गेलों असतों, तर तेथें आम्हांला शिवाजीमहाराज दिसले नसते, कदाचित् इतकी व्यवस्था निटापटीपही दिसली नसती आणि थोडी-फार चढणही चढावी लागली असती. कारण त्या वेळीं गडाच्या वरपर्यंत मोटार-रस्ता झालेला नव्हता. पुढें प्रतापगडावर छत्रपतींचा पुतळा उभारण्याची कल्पना डॉक्टर हरेकृष्ण मेहताबनीं मांडली व तिला लवकरच मूर्तस्वरूपही आलें. त्या पुतळ्याच्या उद्‌घाटनासाठीं पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आले. शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकासाठीं काशीहून गागाभट्टांना आणावें लागलें होतें, त्यांच्या पुतळ्याच्या उद्‌घाटनाला काश्मिरी पंडित लाभले, हा एक मजेदार योगायोगच ! पंडितजींमुळें चांगला रस्ता तयार झाला. त्यानंतर थोड्याच दिवसांत मध्यवर्ती सरकारांतील समाजविकास खात्याचे एक अधिकारी ह्या भागांत आले असतां, त्यांना प्रतापगड दाखविण्याच्या निमित्तानें मला तेथें खाजगी मोटारींतून जातां आलें. त्यामुळें ज्याच्यासाठीं किमान एखादा दिवस तरी घालवावा लागला असता, तें काम कांहीं तासांतच उरकलें. आम्ही न्याहारी करून, महाबळेश्वरहून निघालों आणि जेवायला परत महाबळेश्वरला हजर झालों. आम्ही जरी तीन-चार तासांत सगळा कार्यक्रम उरकला, तरी रडतोंडीचा घाट उतरतांना व चढतांना पूर्वीच्या काळीं, हा राजरस्ता नसेल तेव्हां, चढणें-उतरणें किती अवघड असेल, जावळीच्या खोऱ्यांत कोंडल्या गेलेल्या अफझलखानाच्या

सैन्याचा फन्ना उडविणें किती सोपें गेलें असेल, ह्याची कल्पना आम्हांला सहज आली.

## छोटेखानी किल्ला

मला वाटतें, प्रतापगड हा महाराष्ट्रांतील एक अत्यंत छोटा किल्ला असावा. ४०० यार्ड लांब व २०० यार्ड रुंद! त्यामुळेंच पंडितजींची आमसभा गडावर घेतां आली नव्हती. ह्या गडाचें खरें महत्त्व मात्र त्याच्या मोक्याच्या स्थानामध्यें आहे. आसपासच्या घाटांची व डोंगरांची नाकेबंदी केली, तर ह्या किल्ल्यापर्यंत पोंचण्याची ताकद त्या काळीं तरी कोणाला झाली नसती.

## अफझल बुरूज

गडावर जाण्यापूर्वी अफझलखानाची कबर लागते. परंतु आपल्याला गडावरचा शिवाजीमहाराजांचा पुतळा पाहाण्याची घाई असल्यामुळें, आपण ती कबर परत येतांना पाहायचें ठरवून, पुढें जातों. किल्ल्याच्या दरवाजाजवळ जाईपर्यंत आपल्याला तो दरवाजा दिसत नाहीं, त्यामुळें एकदम किल्ल्याच्या दारांत आमची गाडी उभी राहिली, तेव्हां एखाद्या अल्लाउद्दिनाच्या जादूनें तर हा दरवाजा निर्माण केला नसेल ना, अशी मजेदार कल्पना मनाला चाटून गेली.

मोजक्याच पायऱ्या चढून, आपण गडाच्या माथ्यावर प्रवेश करतों आणि सभोवतालची भव्य वनश्री पाहून आनंदानें बेहोष होतों. त्यामुळें तटबंदीच्या शेवटीं असलेल्या एका मोठ्या झोकदार बुरुजाकडे आपलें लक्ष जात नाहीं. परंतु आपल्या बरोबरचा मावळा वाटाड्या आपलें लक्ष तिकडे वेधतो, कारण त्याला सभोवारच्या सृष्टिसौंदर्यापेक्षां ऐतिहासिक घटनांचेंच कौतुक असतें. त्या घटना घडविणाऱ्या शूर मावळ्यांचा तो वंशज असतो ना! तो आपल्याला सांगूं लागतो, "साहेब, हा अफझल बुरूज. संभाजी कावजीनें कापून आणलेलं अफझलखानाचं मस्तक महाराजांनीं ह्या बुरुजांत पुरलं होतं." लगेच आपल्या

डोळ्यांसमोर तो रोमहर्षक भीषण प्रसंग सजीव होऊन उभा राहातो. ज्या दिवशीं ही घटना घडली, त्या दिवशीं ह्या गडावर आणि साऱ्या महाराष्ट्रांत किती आनंदीआनंद पसरला असेल! अफझलखानानें शिवाजीमहाराजांशीं दगलबाजी करण्याचा प्रयत्न केला नसता, तर कदाचित् त्याला प्राणांस मुकावें लागलें नसतें, ही गोष्ट आपल्याला माहीत असल्यामुळें, जें कांहीं घडलें, तें अपरिहार्यच होतें, असें म्हणावें लागतें.

## भवानीची सुंदर मूर्ति

प्रतापगडावरील भवानीचें मंदिर चांगलें प्रशस्त आहे. अलीकडेच त्याचा जीर्णोद्धार झाला आहे. तेथील व्यवस्थाही चांगली दिसली. आमच्या बंगाली पाहुण्यांना देवीच्या मूर्तीविषयीं विशेष उत्सुकता व आदर, कारण ते स्वतः कालीपूजक होते. त्यांना मूळ मूर्ति पाहायची होती, म्हणून त्यांनीं पुजाऱ्याला बोलावून मूर्ति दाखविण्याची विनंती केली. त्याप्रमाणें त्यानें पूजा उतरविली. मग अंगणांत एका माणसानें आरसा धरून, मूर्तीवर कवडसा पाडला. त्यामुळें मूर्ति अगदीं स्वच्छ, स्पष्ट दिसली. अफझलखानाच्या वधानंतर महाराजांनीं नेपाळांतील उत्कृष्ट कारागिरांकडून ही मूर्ति बनविली होती. चंद्र, सूर्य, सिंह, चक्र, आदि युद्धायुधांनीं सुसज्ज होऊन, अष्टभुजा भवानी महिषासुरास मारीत आहे, असें त्या मूर्तीचें ध्यान आहे. आमच्या मित्रांना ती मूर्ति खूपच आवडली. त्यांनीं देवीच्या पूजेसाठीं व पुजाऱ्यानें घेतलेल्या तसदीबद्दल भरपूर बक्षिशी दिली.

मूर्तीच्या शेजारींच एक सुंदर स्फटिकाचें शिवलिंग आहे, तेंही प्रेक्षणीय आहे.

## शिवाजीमहाराजांचा पुतळा

ह्या छोट्याशा किल्ल्यावर एक छोटेखानी बालेकिल्ला आहे. त्यालाही तटबंदी, दरवाजा व रेखीव बुरूज आहेत. ह्या बालेकिल्ल्यांत महाराजांचा

राजवाडा होता. त्याच जागीं आतां शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा आहे. उजव्या हातानें तलवार उगारलेली असून, डाव्या हातानें त्यांनीं घोड्याचा लगाम खेचलेला आहे. महाराजांच्या चेहऱ्यावर शौर्य व तेज व्यक्त करण्यांत शिल्पकाराला अपूर्व यश मिळालेलें आहे. घोडाही मोठा पाणीदार व देखणा आहे. ह्या पुतळ्याच्या प्रस्थापनेनें प्रतापगडच्या जीवनांत एक नवीन चैतन्य संचारलें असावें, असा भास आपल्याला तो पुतळा पाहात असतां पदोपदीं होतो.

## श्रेष्ठ समाधि कोणाची ?

गडाच्या पायथ्याशीं असलेली अफझलखानाची कबर अनेक दृष्टींनीं प्रेक्षणीय आहे. तेथील व्यवस्था, स्वच्छता, टापटीप, हंड्या-झुंबरें, चंदनाचीं दारें, रेशमी गलेफ, लखलखीत दिवे, धूप व चंदनाचा सतत दरवळणारा सुगंध, दोन अवाढव्य कबरींवर घालण्यांत आलेल्या फुलांच्या माळा, कुराणांतील वचनें व अफझलखानाचीं स्तुतिस्तोत्रें लिहिलेल्या सुबक तसबिरी आणि ह्या सर्वांवर कळसाप्रमाणें शोभणारी कमालीची शांतता, ह्या गोष्टी हिंदूंनीं अवश्य पाहाण्यासारख्या व धडा घेण्यासारख्या आहेत.

माझ्या मनांत मात्र वेगळाच प्रश्न होता. आजपर्यंत अनेक मुस्लिम सरदार व राजे, बादशहा ह्या भारतांत मरण पावले, कांहीं धारातीर्थीं पतन पावून गाजीही ( धर्मयोद्धे ) बनले, पण विजापूरसारख्या एका क्षुद्र संस्थानिकाच्या अफझलखानासारख्या एका मामुली सरदाराची समाधि बांधण्याची इच्छा मुसलमानांना कां झाली ? त्याच्या समाधीवर होणाऱ्या उरुसाला हजारों यात्रेकरू कां जमतात ? प्रथम प्रथम मला वाटे, कीं ह्याच्या मुळाशीं मुसलमानांचा हिंदु-द्वेष आहे. आपल्या एका बलाढ्य प्रतिनिधीला शिवाजीसारख्या दुबळ्या मराठ्यानें हां हां म्हणतां नेस्तनाबूद करावें, ह्याबद्दलची ती चीड आहे; परंतु ह्या घटनेमागें असलेलें धर्मवेड धर्मप्रेम कसें बनूं शकत असेल, ह्याविषयीं मला शंका वाटत होती, म्हणून ह्या बाबतींत चौकशी करण्याचें मीं ठरविलें होतें.

## सैयद् बन्दे ह्यांची समाधि

योगायोगानें आम्ही गेलों त्या वेळीं तेथें लखनौचे श्री. नैयर नांवाचे एक यूनानी वैद्य (तबीब) आलेले होते. त्यांनीं आम्हांला कबरीचें दार उघडून आंत नेलें व सगळी माहिती सांगितली. आंत जवळ जवळ पुरुष-सव्वा-पुरुष उंचीचें एक थडगें असून, त्यापेक्षां जरा लहान असें आणखी एक थडगें आहे. श्री. नैयर सांगूं लागले, "हें मोठं थडगं अफझलखानाचं नि हें छोटं सैयद् बन्देशहा ह्यांचं!" मला तें नांव अपरिचित होतें. मीं इतिहासांत असें वाचलें होतें, कीं करारांत ठरलें नसतांही अफझलखानानं शिवाजीमहाराजांच्या भेटीस जातांना सैयद् बंडा नांवाचा एक अत्यंत शूर व धिप्पाड शरीररक्षक आपल्याजवळ ठेवला होता. परंतु महाराजांच्या वकिलाच्या विनंतीवरून त्यानें सैयद् बंडाला शामियान्याच्या बाहेर पाठविलें. शामियान्यांत खान-महाराज झटापट झाल्यानंतर, जेव्हां खानाचीं आंतडीं बाहेर आलीं व खानानें प्राणांतिक आरोळी ठोकली, तेव्हां खानाच्या मदतीसाठीं सैयद् बंडा आंत धावला. त्याबरोबर महाराजांचा शरीररक्षक जिवा महाल्या ह्यानें त्याला ठार केलें.

त्याच सैयद् बंडाची ही छोटी समाधि होती. परंतु श्री. नैयर त्या नांवाचा उच्चार सैयद् बन्दे असा करून, शिवाय सत्पुरुषांना लावण्यांत येणारी 'शहा' ही पदवी त्याला बहाल करीत होते. त्यामुळें मला जरा आश्चर्य वाटलें. मीं त्यांना विचारलें, "नैयरसाहेब, सैयद् बन्दे हा अफझलखानाचा साधा शरीररक्षक! त्याची समाधि इतक्या इतमामांत कशाला बांधलीय इथें?" त्यावर नैयर हसून म्हणाले, "हेंच तर इथल्या लोकांत अज्ञान आहे. वस्तुतः सैयद् बन्दे हे एक फार मोठे सत्पुरुष (वली) होते. अफझलखान हा त्यांचा शिष्य. त्याच्या विनंतीवरून ते ह्या मुलाखतीस हजर होते. इथें कांहीं दगाफटका होईल, अशी त्यांना शंकाही नव्हती."

"पण मग त्यांची समाधि अफझलखानाच्या समाधीपेक्षां लहान कशी? ती तर मोठी असायला हवी होती, नाहीं का?" मीं विचारलें.

"हो ना! पण लोकांच्या अडाणीपणापुढें कुणाचं काय चालणार? त्यांनीं आपली अक्कल चालवली नि अशा उलटसुलट समाध्या बांधल्या. लांबलांबचे लोक दर्शनाला येतात, ते कांहीं अफझलखानाच्या समाधीच्या दर्शनाला नव्हे; तर सैयद बन्देसाहेबांच्या समाधीच्या दर्शनाला." नैयरनीं सांगितलें.

"आपण त्याचसाठीं आलां होतां काय?"

"अगदीं त्याच कारणासाठीं नव्हे, पण तें एक कारण त्यांत होतं. मला कुणीतरी सांगितलं, कीं ह्या भागांत एक फार महत्त्वाची जडीबुट्टी आहे. ती मिळाली तर पाहावी, हा माझा मुख्य उद्देश होता."

"मग त्यांत कितपत यश मिळालं?" मीं पृच्छा केली.

"कांहीं फारसं नाहीं. मला हव्या होत्या त्या वनस्पति कांहीं इथें मिळाल्या नाहींत."

अशा प्रकारें अफझलखानाच्या समाधीचें कोडें आपल्याला उलगडलें, ह्या समाधानांत मी तेथून परतलों. ह्या समाधींच्या मुळाशीं एखादी धार्मिक भावना असल्याखेरीज, त्यांची जनमानसावर इतकी पकड बसणें शक्य नाहीं, ही माझी कल्पना खरी ठरली होती.

## अफझलशहा की दरगाह?

त्यानंतर थोड्याच दिवसांत माझ्या ह्या कल्पनेलाही धक्का बसला. मी सौराष्ट्राचा दौरा आटोपून परत येत होतों. गाडींत सुलतान नसीम नांवाचे मुंबईस राहाणारे एक लखनवी ज्योतिषी व मंत्रज्ञ भेटले. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करतांना असें कळलें, कीं ते वर्षांतून एक-दोनदा प्रतापगडला अखझलखानाच्या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं जात असतात. मीं त्यांना प्रश्न केला, "अफझलखानाच्या कीं सैयद बन्देशहाच्या?" ते म्हणाले, "सैयद बन्दे हा खानसाहेबांचा

शागीर्द होता. त्याच्या समाधीला कांहीं महत्त्व नाहीं, खरी समाधि अफझलशहांचीच."

"पण अफझलखान हा तर एक साधा सरदार होता!"

"सरदारकी हें त्यांचं बाह्य जीवन. प्रत्येकाला हें भौतिक जीवन स्वीकारावंच लागतं. त्यामुळेंच त्यांना शिवाजीवर स्वारी करावी लागली. त्यांचं आत्मिक साक्षात्कारी जीवन मात्र फार मोठं होतं. ते एक महान् सत्पुरुष होते, त्यांच्या समाधीचं दर्शन हें मोठं पुण्यकर समजलं जातं."

मीं त्यांना नैयरसाहेबांचें भाष्य सांगितलें. परंतु तें बरोबर नसल्याचें नसीमभाईंनीं सांगितलें आणि जी समस्या सुटली असें मला वाटत होतें, ती तशीच कायम आहे, असें मला वाटूं लागलें.

खरा सत्पुरुष व महात्मा कोण? अफझलखान कीं सैयद बंडा?

꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳ ꙳

## जगांतील सर्वांत उंच दगडी बांध असलेला

# भं डा र द रा

## जगांतील सर्वांत उंच दगडी धरण

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोला तालुक्यांत, अकोल्यापासून सुमारें २५ मैलांवर असलेल्या, भंडारदरा तलावाचें नांव आपल्यापैकीं बहुतेकांनीं ऐकलेलें असतें. तसें तें मींही ऐकलेलें होतें, परंतु तलावाकरितां, प्रवरा नदीचें पाणी अडविण्यासाठीं, जो दगडी बांध बांधण्यांत आलेला आहे, तो जगांतील सर्वांत उंच बांध आहे, ह्याची कल्पना मात्र मला, प्रत्यक्ष तें धरण पाहीपर्यंत नव्हती. अलीकडे भाखडा-नांगलसारखीं खूप उंचीचीं सिमेंट-कॉंक्रीटचीं धरणें आपल्या देशांत तयार झालीं आहेत

व होत आहेत. त्यामुळें भंडारदऱ्याची उंची ही विशेष कुतूहलाची बाब उरलेली नसली, तरी हीं कॉंक्रीटचीं नवीं धरणें तयार होण्यापूर्वी, भंडारदरा हें भारतांतील सर्व प्रकारच्या धरणांतील सर्वांत उंच धरण होतें. आजही दगड व चुना ह्यांचीं जीं धरणें जगांत आहेत, त्यांमध्यें भंडारदऱ्याचें धरण सर्वांत उंच आहे आणि सीमेंट-कॉंक्रीटचा वाढता प्रचार लक्षांत घेतां, ह्यापुढें एवढें प्रचंड दगडी धरण कोणी बांधील, असें वाटत नाहीं. ह्यामुळें भंडारदऱ्याचा जागतिक उंचीचा विक्रम सदैव टिकून राहील, असें समजायला हरकत नाहीं.

## आणखी एक आश्चर्य

ह्या धरणाच्या बाबतींत जागतिक दृष्टीचें आणखी एक आश्चर्य आहे, तें असें, कीं जमिनीवर २७० फूट उंच उभ्या असलेल्या दगडी भिंतीला फक्त ८ फूट पाया घेतलेला आहे. इतक्या उंच भिंतीला इतका कमी पाया घेतला जाणें, हें जगांतील एक आश्चर्यच समजलें जातें. ह्या धरणाचे इंजीनियर श्री. आर्थर हिल ह्यांच्या कल्पकतेबद्दल व हुशारीबद्दल कोणालाही कौतुकच वाटेल आणि त्यामुळेंच ह्या तलावाला 'सर आर्थर हिल लेक' (सरोवर) असें नांव दिल्याबद्दल कोणाला वैषम्य वाटणार नाहीं.

## मूळ हेतु दुष्काळ-निवारण

४७ चौरस मैल क्षेत्रफळ व ११,०८६ दशलक्ष घनफूट पाण्याची क्षमता असलेल्या ह्या तलावाचा मूळ हेतु, नगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागाला मदत करून, त्याला दुष्काळाच्या तावडींतून कायमचें सोडविणें, हा होता. ह्या तलावाचें बांधकाम १९१० सालीं सुरू होऊन, १९२६ सालीं संपलें. म्हणजे जवळ जवळ एक पिढी ह्या धरणाच्या कामावर लहानाची मोठी झाली. ह्या भागांत सुमारें २०० इंच पाऊस पडत असल्यामुळें, वर्षांतील चार-पांच महिने तरी काम बंद ठेवावें लागत असे. त्या दृष्टीनें पाहिल्यास, हा सोळा वर्षांचा कालावधि फार

मोठा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. ह्यामुळेंच १६ वर्षें काम चालूनही धरणाला फक्त ८५ लाख ( ८४,१४,१८८ ) रुपये खर्च आला.

## आतां उपयोग पैशाचें पीक काढण्यासाठीं

ह्या धरणाचा मूळ उद्देश दुष्काळनिवारण व अन्नधान्याचें उत्पादन हा असला, तरी नंतर मात्र त्याच्या पाण्यावर ऊस हें पैशाचें पीकच मुख्यतः काढण्यांत येऊं लागलें. कोपरगांव, वेलापूर, राहुरी, वगैरे भागांतील साखर-कारखाने ह्याच धरणाच्या पाण्यावर उभारलेले आहेत. ज्या अकोला तालुक्यांत हें धरण आहे, त्याला मात्र त्याच्या पाण्याचा कांहींच फायदा होत नाहीं. पारिजातकाचें झाड रुक्मिणीच्या दारांत आणि फुलें मात्र सत्यभामेच्या दारांत, अशी ह्या धरणाची स्थिति आहे ! ह्या धरणामुळें २,२९,००० एकर जमिनीला पाणी मिळतें.

## अत्यंत खोल पाणी

दोन डोंगरांना जोडणारी भिंत बांधून हा तलाव तयार करण्यांत आलेला आहे. ही भिंत १७०० फूट लांब असून, तिची तळाशीं लांबी फक्त ६० फूट आहे. त्यावरून ज्या खिंडींत हें धरण बांधलेलें आहे, ती किती चिंचोळी व अरुंद होती, ह्याची कल्पना येईल. धरणाची रुंदी पायाजवळ २५० फूट आहे. धरणाजवळचें पाणी अत्यंत खोल असल्यामुळें, तेथें मासे जगत नाहींत. धरणापासून दूर अंतरावर, कमी खोलीच्या पाण्यांत, दरवर्षी चांगले चांगले मासे आणून सोडण्यांत येतात. त्यामुळें ह्या तलावांत माशांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होतें.

४७ चौरस मैल क्षेत्रफळाचा तलाव म्हटला, कीं आपल्या डोळ्यांसमोर एक अफाट विस्ताराचा जलाशय उभा राहातो. परंतु प्रत्यक्षांत मात्र टीचभर लांबी-रुंदीचें तळेंच दिसतें. कारण धरणाच्या समोरच डोंगराचा एक फाटा तलावांत घुसलेला आहे. ह्या डोंगराच्या मागें व आजूबाजूलाही डोंगरच डोंगर आहेत आणि त्या डोंगरांच्या फटींतून

जेथें जेथें प्रवेश मिळाला, तेथें तेथें पाणी शिरलेलें आहे. त्यामुळें सबंध तलावाचें दृश्य एकसमयावच्छेदेंकरून डोळ्यांसमोर उभें राहात नाहीं.

अर्थात् ह्यांतही एक वेगळें सौंदर्य आहे. आपण तलावांत होडींतून संचार करूं लागलों, किंवा तलावाच्या कांठाकांठानें जाऊं लागलों, कीं चित्रमंजूषे ( अलबम ) मधील चित्रें आपल्या नजरेसमोर एकामागून एक यावींत, तशीं एकाहून एक सुंदर दृश्यें आपल्या दृष्टीसमोर उलगडत जातात आणि ठरीव ठशाचें एकत्र तळें दिसण्याऐवजीं वेगवेगळ्या वृक्षराजींनीं व डोंगर-पर्वतांनीं वेढलेलीं व नटलेलीं अनेक लहान-मोठीं तळीं आपल्याला दिसतात.

## गिरिविहार व विश्रामधाम

मुंबईपासून १०२ मैल व नाशिकपासून ४४ मैल दूर असलेल्या ह्या रमणीय सरोवराच्या कांठीं बंगले बांधून, ह्या स्थानाचा 'गिरिविहार' ( Hill Station ) व विश्रामधाम ( Holiday Resort ) म्हणून विकास करण्याची कल्पना फार दिवसांपासून लोकांच्या मनांत घोळत होती, परंतु तिला मूर्त स्वरूप येण्यास बराच काळ लागला. आतां ह्या स्थानाचा लवकरच कायापालट होईल व हौशी प्रवाशांच्या आगमनानें तें गजबजलेलें दिसूं लागेल, अशी आशा निर्माण झालेली आहे. भंडारदरा धरणाच्या मागें, तलावांत भूशिरासारखी घुसलेली, समुद्रसपाटीपासून २७०० फूट उंच असलेली, जी मनोहर टेकडी दिसते, त्या टेकडीवर १०२ प्लॉट पाडून, ते लोकांना विकण्यांत आलेले आहेत. येथें प्लॉट घेण्याची मुंबईच्या धनिकांमध्यें अहमहमिका लागल्यामुळें, तलावाच्या दुसऱ्या बाजूला कांठालगत आणखी कांहीं प्लॉट तयार करून, ते विकण्यांत येणार आहेत. विजेच्या दिव्यांनीं लखलखणारे बंगले तयार झाल्यानंतर, ह्या तलावाची शोभा वाढेल, कीं कमी होईल, हा जरी वादग्रस्त प्रश्न असला, तरी लोकांना त्यामुळें आनंद होईल, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

## सह्याद्रीचें सर्वोच्च शिखर : कळसूबाई

जगांतील ह्या सर्वांत उंच दगडी धरणाला, सह्याद्रीच्या सर्वांत उंच शिखराची पार्श्वभूमि लाभावी, हा खरोखरी मोठा योगायोगच नव्हे काय? कळसूबाई हें सह्याद्रीचें ५,४२७ फूट उंचीचें सर्वोच्च शिखर भंडारदऱ्यापासून अवघें दीड-दोन मैल दूर आहे. ह्या बाजूनें त्याची चढण इतकी अवघड आहे, कीं येथील ठाकर जातीचे आदिवासीच (किंवा गो. नी. दांडेकरांसारखे काटक साहित्यिक!) ती चढूं शकतात. एखाद्या भिंतीवर पालीनें किंवा घोरपडीनें चढावें, तशी ही भयंकर चढाई आहे. अर्थात् १०-१२ मैलांचा फेरा घालून मोटार-रस्त्यानें त्या डोंगराच्या पायथ्याशीं जातां येतें व तेथून चढाई थोडी सोपी जाते, हें खरें, परंतु तेंही येरा गबाळाचें काम नोहे! तेथें पाहिजे जातीचें, हेंच खरें.

त्या शिखराचा आकार डोक्यावरील पगडीसारखा दिसतो. एखादा पुराण-पुरुष डोक्यावर भली मोठी पगडी किंवा चक्री पागोटें घालून, स्थितप्रज्ञाप्रमाणें ध्यान लावून बसला असावा, असा भास होतो आणि त्याच्या सान्निध्यामुळें भंडारदरा तलावाची विशालता, सखोलता व गांभीर्य विशेषच खुलून दिसतें. कळसूबाईकडे पाहातांना हिमालयाचें सर्वोच्च शिखर एव्हरेस्ट आपल्या नजरेसमोर तरळूं लागतें. महाराष्ट्र आणि मराठी माणसें म्हणजे सह्याद्रीचीं लेकरें. त्यांना सह्याद्रीबद्दल किती अभिमान वाटतो. अशा ह्या सह्याद्रीचें अत्युच्च शिखर पाहातांना त्यांच्या मनांत कोणते भाव उठत असतील, हें काय सांगायला हवें? तें कळण्यासाठीं महाराष्ट्राच्या कुशींतच जन्म घ्यायला हवा.

## मोऱ्यांचे धबधबे

ज्या शेतकऱ्यांची जमीन ह्या धरणाच्या पाण्यानें भिजते, त्यांना पाण्याची जरूर लागली, कीं धरणांतून पाणी सोडण्यांत येतें. त्यासाठीं ५०, १००, १५० व २०० फूट उंचीवर बांधामध्यें दोन-दोन

मोऱ्या ( Sluices ) ठेवलेल्या आहेत. पाणी जसजसें खालीं जात जाईल, तसतशा खालच्या मोऱ्या सोडल्या जातात. आम्ही गेलों त्या वेळीं तलाव तुडुंब भरलेला होता. नको असलेलें पाणी वाहून जाण्यासाठीं जो “ वेस्ट-वेअर ” ( Waste-ware ) नांवाचा बांध ठेवलेला आहे, त्यावरून पाणी वाहात होतें. त्यामुळें २०० व १५० फुटांवर असलेल्या मोऱ्या सोडण्यांत आलेल्या होत्या. त्यांपैकीं २०० फुटांवरील मोऱ्यांखालीं पुढें आलेला हत्तीसारखा एक काळाकभिन्न खडक आहे. त्या खडकावर मोऱ्यांतील पाणी आदळतें व तें सुमारें दोनशें फुटांवरून खालीं कोसळतें. त्यायोगें तेथें एक सुंदर नैसर्गिक धबधबा तयार झालेला आहे. हा खडक इतका पुढें आलेला आहे, कीं त्याच्या मागें लपलेल्या त्या मोऱ्या दिसतच नाहींत. त्यामुळें कडेकपारींतून पाणी कोसळून बनणाऱ्या धबधब्यासारखेंच त्याचें दृश्य दिसतें. ह्या धबधब्याचें पाणी एका धारेनें न पडतां, तें विखरून पडतें. त्यामुळें त्याचा जोर पुष्कळच कमी होतो. तरीही जेथें पाणी जमिनीवर आपटतें, तेथें आपण जाऊं शकत नाहीं. ह्या धबधब्याखालीं स्नान करतांना, आम्ही खूप दूर राहून, अल्प प्रमाणांत येणाऱ्या विरळ धारांचा वर्षाव अंगावर घेतला. तोच इतका जोरदार होता, कीं लिंबाएवढ्या टपोऱ्या गाराच कोणी पाठीवर जोरानें मारीत आहे, असा आम्हांला भास होऊं लागला. तो मारा फार वेळ सहन करणें शक्य झालें नाहीं, तरी अंग रगडल्याचें सुख मात्र आम्हांला त्या धबधब्यापासून अवश्य मिळालें आणि प्रवासानें शिणलेलीं आमचीं शरिरें तार्जातवानीं झालीं.

ह्या धबधब्याला माझे मित्र श्री० रा० वि० पाटणकर ह्यांनीं दिलेलें ‘ आकाशगंगा ’ हें नांव अगदीं सार्थ असल्याबद्दल माझी खात्री पटली. ही गंगा कोठून येते, तें आपल्याला दिसत नाहीं. जो आवाज कोठून येतो, तें आपल्याला कळत नाहीं, त्याला जसें आपण ‘ आकाशवाणी ’ म्हणतों, तसें ह्या प्रवाहाला ‘ आकाशगंगा ’ म्हणणेंच योग्य नव्हे काय ?

## महाभयंकर रुद्र

दीडशें फुटांवरील मोऱ्यांचें दृश्य त्याहून कांहीं वेगळेंच होतें. मोऱ्यांतून बाहेर पडणाऱ्या पाण्याला इतका भयंकर वेग होता, कीं जवळ जवळ १२ फुटांपर्यंत पाण्याचा झोत जमिनीला स्पर्शच करीत नव्हता. ह्या मोऱ्यांच्या तोंडाशीं एक मजेदार चमत्कार दिसत होता. मोरींतून बाहेर पडणारें पाणी तोंडाशीं थोडें रुंद दिसत होतें, तरी नंतर तें आवळलें जाऊन, त्याचा घेर कमी झाल्यासारखा वाटत होता आणि त्यानंतर तर चवरी ढाळल्याप्रमाणें दिसणाऱ्या त्या पाण्याच्या पिसाऱ्याचा डमरूसारखा आकार फारच बहारीचा दिसत होता.

ह्या मोऱ्यांचें दृश्य त्यांच्यावर बांधलेल्या गेट ( जाळीचा दरवाजा ) मधून पाहातां आलें आणि जमिनीवरूनही पाहातां आलें. गेटमधून पाहातांनाच पाण्याच्या प्रचंड वेगाची नीट कल्पना येते. येथून जणूं पाणी बाहेर पडत नसून, नुसता शुभ्र धूर किंवा पिंजलेला पांढरा कापूसच बाहेर पडतो आहे असें भासतें, परंतु त्या प्रवाहांत दगड टाकला, कीं तो सटदिशीं दूर भिरकावला जातो आणि त्यावरूनच त्याचा उद्दाम वेग प्रत्ययास येतो. ह्या जलकणांमध्यें जेव्हां रंगीबेरंगी इंद्रधनुष्यें दिसूं लागतात, तेव्हांच तो कापूस नसून पाणी आहे, ह्याची खात्री आपल्या डोळ्यांना पटते.

खालीं उतरून त्याचे जलबिंदु अंगावर घेण्याचा प्रयत्न करूं लागलों, तों सर्वांत शेवटीं पडणाऱ्या तुषारांपासून आम्ही एक फूटही आंत जाऊं शकलों नाहीं, इतका त्यांचा जोर भयंकर होता. धबधब्याच्या गर्जनेनें तर आमच्या कानठळ्याच बसल्या. तो भयप्रद आवाज ऐकतांना वाटे, हा बांध कांहीं आतां टिकणार नाहीं आणि जर पाण्याच्या रेट्यानें ही भिंत कोसळली, तर आपली व तेथें जमलेल्या अनेक आबालवृद्ध स्त्री-पुरुषांची काय स्थिति होईल, ह्या कल्पनेनें अंगावर कांटा उभा राही. ह्या धबधब्याला मीं नांव दिलें ‘ रुद्र ’! आकाशगंगा उंचावरून पडत असली, तरी शंकराच्या जटेतून

पडणाऱ्या गंगेप्रमाणें ती नाजूक वाटते, पण रुद्र हा नांवाप्रमाणें खरोखरच भयंकर वाटतो. अर्थात् उन्हाळ्यांत किंवा पाणी कमी झाल्यानंतर हें दृश्य दिसत नसणार, हें उघड आहे. मित्रांनीं असें सांगितलें, कीं पाणी आटलें, म्हणजे रुद्रमहाराज नळांतून पडणाऱ्या पाण्यासारखे मिळमिळीत व दुर्बळ वाटतात.

## लोकांना सूचना मिळाली पाहिजे

ह्या मोऱ्या म्हणजे भंडारदऱ्याचें अर्ध्याहून अधिक सौंदर्य. त्या बंद असतील, तर येथें पाहाण्यासारखें फारच थोडें असणार आणि मोऱ्या सोडायच्या किंवा नाहीं, हें शेतकऱ्यांना पाण्याची जरूर आहे किंवा नाहीं, ह्यावर अवलंबून असणार. त्यामुळें येथें येणाऱ्या लोकांचा अनेक वेळां विरस होण्याचीच शक्यता असते, म्हणून मोऱ्या चालू असण्याचे दिवस पुण्या-मुंबईच्या वृत्तपत्रांतून आधीं जाहीर करण्यांत आले, तर भंडारदरा पाहायला केव्हां जायचें तें ठरविणें, लोकांना सोपें जाईल.

## म्हातारे तरुण मिस्टर फॉक्स

भंडारदऱ्याला गेल्यानंतर पाहाण्यासारखी ( किंवा भेटण्यासारखी ) आणखी एक वस्तु आहे. ती सजीव असून, तिचें नांव मिस्टर फॉक्स असें आहे. मिस्टर फॉक्स हे आयरिश गृहस्थ असून, भारतीय रेल्वेमध्यें मोठ्या हुद्द्यावर होते. भंडारदऱ्याच्या वनश्रीनें त्यांना इतकें मोहित केलें, कीं त्यांनीं सेवानिवृत्तीनंतर आपल्या मातृभूमीला परत जाण्याऐवजीं येथेंच स्थायिक होण्याचें ठरविलें आणि गेलीं पंधरा वर्षें ते येथील आदिवासी लोकांमध्यें एकरूप होऊन, सामान्य शेतकऱ्याप्रमाणें राहात आहेत. त्यांच्याजवळ थोडीशी ( ८-१० एकर ) जमीन असून, स्थानिक लोकांना त्यांचा आर्थिक दृष्ट्या मोठा आधार वाटतो. ह्या भागांतील वृक्ष-वनस्पति व जनता ह्यांची जेवढी माहिती त्यांनीं मिळविली आहे, तेवढी खुद्द येथील लोकांना तरी असेल किंवा नाहीं, ह्याविषयीं शंका वाटते. भंडारदरा पाहायला येणाऱ्या लोकांशीं ते

अत्यंत आपुलकीनें व सौजन्यानें वागतात आणि आपल्या घेड्गुजरी (किंवा अँग्लो-मराठी) भाषेंत अस्खलितपणें बोलतात. जीवनाविषयींची त्यांची आसक्ति व उत्साह हीं कोणालाही हेवा वाटेल, अशींच आहेत.

## वाटेंतील रंधा धबधबा

भंडारदऱ्याहून राजूरला परत येतांना, चार मैलांवर, वाटेंत एक धबधबा लागतो. त्याचें नांव रंधा धबधबा. काळ्याभोर खडकांच्या पात्रांतून वाहाणाऱ्या प्रवरा नदीचाच हा धबधबा आहे. ह्याची एकूण उंची १५० फूट असून, तो चार टप्प्यांनीं खालीं पडतो. पहिला टप्पा सुमारें १० फुटांचा आहे. तेथून जरा खालीं जाऊन २० फुटांवरून तो खालीं पडतो. तिसरा टप्पा ५-६ फुटांचा लहानसाच आहे. चौथा टप्पा मात्र सुमारें १२० फुटांचा आहे. प्रेक्षणीय भाग हा चौथा टप्पाच होय. हत्तीच्या सोंडेप्रमाणें सरळ धारेंत पडणारें पाणी, उसळी घेऊन जेव्हां वर उठतें, तेव्हां तुपारांची दाटी होते आणि पाणीच फेसाळून वर येत आहे, असें वाटतें. पाण्याचा प्रवाह कृश असल्यामुळें धबधब्याचा आवाज मात्र फारसा कानांत भरत नाहीं. ह्याच्या उलट साध्या प्रवाहांतून उत्पन्न होणारा पाण्याचा खळखळाटच जास्त जोरदार वाटतो आणि त्यापुढें धबधब्याचा आवाज लुप्त होतो. ह्या धबधब्यामध्यें पौरुषापेक्षां नखरेलपणाच अधिक दिसतो. अवाढव्यपणापेक्षां चपलताच अधिक नजरेंत भरते. ह्यामुळें मीं त्याला नांव दिलें, 'बिजली!' विजेचा रेखीवपणा नि चपळाई हेंच ह्या धबधब्याचें वैशिष्ट्य. भंडारदऱ्यांतून पाटबंधाऱ्याकरितां सोडल्या जाणाऱ्या पाण्यावर हा धबधबा अवलंबून असल्यामुळें तो कधींच सुकत नाहीं. उलट उन्हाळ्यांत ज्या वेळीं इतर सगळे धबधबे कोरडे पडतात, त्या वेळीं ही बिजली डौलानें ठुमकत असते. ह्या धबधब्यावर आणि भंडारदऱ्यांतून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर खूप मोठ्या प्रमाणावर वीज उत्पन्न होण्याची शक्यता आहे. ह्या भागांतील जनतेच्या प्रतिनिधींनीं योग्य धडपड केल्यास येथें उत्पन्न होणारी वीज ह्या भागांतील जनतेचें

जीवन अत्यंत समृद्ध करील, ह्यांत शंका नाहीं आणि मग अकोला तालुक्यांतून वाहाणारी जी प्रवरा अकोल्याला कंगाल ठेवून, इतर भागांना संपन्न बनवीत आहे, तीच प्रवरा अकोल्यांतील गरीब जनतेलाही सुखाचा मार्ग दाखवील.

# पांच नद्यांच्या उगमावर

## महाबळेश्वरचें जगावेगळें आकर्षण

साऱ्या देशभर हिंडलेला मी, पुण्यापासून दोन-तीन तासांच्या अंतरावर असलेल्या महाबळेश्वरला परवां-परवांपर्यंत गेलों नव्हतों, ह्यावर माझीं प्रवासवर्णनें वाचणाऱ्या वाचकांचा विश्वासही बसणार नाहीं. परंतु ती वस्तुस्थिति आहे. ह्याचें एक कारण असें, कीं कांहीं विशेष काम किंवा कारण नसतां, केवळ एखादें प्रेक्षणीय स्थान पाहाण्यासाठीं जाण्याची माझी वृत्ति नाहीं आणि तसें करणें आर्थिक दृष्ट्या परवडणाऱ्या वर्गांतीलही मी नाहीं. मीं पाहिलेलीं बहुतेक ठिकाणें कांहीं ना कांहीं कामाच्या निमित्तानें त्या भागांत गेल्यानंतर पाहिलेलीं आहेत. अर्थात् ह्या दृष्टीनें पाहिलें, तरी मीं ह्यापूर्वीं महाबळेश्वरला भेट द्यायला हवी होती; कारण चार-पांच वर्षांपूर्वीं महाड-रायगडला गेलों असतां, मी महाबळेश्वरवरूनच गेलों-आलों होतों. परंतु कां कोण जाणें, त्या वेळीं वाटेंत उतरून महाबळेश्वर पाहाण्याची इच्छा मला झाली नाहीं. मला वाटतें, थंड हवेचीं ठिकाणें पाहाण्याचा व तेथें राहाण्याचा श्रीमंती षोक माझ्या प्रवृत्तीशीं जुळत नसावा. त्यामुळें महाबळेश्वरसंबंधीं मला आकर्षण वाटलें नसावें. परंतु साहेब लोकांच्या महाबळेश्वरसंबंधीं जरी मला आकर्षण वाटलें नाहीं, तरी जुन्या महाबळेश्वरविषयीं आणि

विशेषतः तेथील कृष्णेच्या उगमाविषयीं मला नकळत ओढ लागलेली होती. कधींतरी मनांत विचार येई, आपल्या आवडत्या कृष्णामाईचा उगम आपण केव्हां तरी अवश्य पाहिला पाहिजे. पण ती इच्छा फलद्रूप होईपर्यंत वयाचीं जवळ-जवळ चाळीस वर्षें उलटावीं लागलीं. त्यांतही एक मजेदार योगायोग घडून आला. मध्यवर्ती सरकारच्या एका अधिकाऱ्यांना खाजगी गाडींतून महाराष्ट्रांत हिंडविण्याची कामगिरी माझ्यावर सोपविण्यांत आली होती. ती पार पाडीत असतां मला थंडीच्या दिवसांतच महाबळेश्वरला जावें लागलें आणि अशा प्रकारें महाबळेश्वरची सफर घडली. अर्थात् माझ्या दृष्टीनें कृष्णेचा उगम ही एकच गोष्ट महाबळेश्वरांत पाहाण्यासारखी असल्यामुळें थंडीचा मोसम माझ्या आनंदांत किंवा समाधानांत बाध आणूं शकत नव्हता. परंतु माझा कार्यक्रम ठरविण्यास मी स्वतंत्र नव्हतों. त्यामुळें पाहुण्यांसाठीं प्रेक्षणीय स्थानांचे कार्यक्रम आखून, त्यांतून उरलेल्या वेळांत मला कृष्णेचा उगम पाहावा लागला. अर्थात् त्यामुळें इतर सृष्टिसौंदर्य सहजासहजीं पाहातां आलें, हा लाभ त्यांत होताच.

## बिगरमोसमांत जाण्यापासून फायदे

महाबळेश्वर गांवांत प्रवेश करतांनाच आपण बिगरमोसमाच्या वेळीं आलों आहोंत, ह्याची आम्हांला जाणीव झाली. बहुतेक थंड हवेच्या ठिकाणीं जाणाऱ्यांना तीर्थक्षेत्रांच्या यात्राकरासारखा एक कर भरावा लागतो. तेथील डांबरी रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता, पाण्याची सोय, वगैरेसाठीं तेथील नगरपालिकेला जो खर्च करावा लागतो, त्याचें ओझें गांवच्या रहिवाशांवर न पडतां, मुख्यतः ज्या हौशी प्रवाशांसाठीं तो खर्च करावा लागतो, त्यांच्याकडून कररूपानें तो गोळा केला गेल्यास, त्यांत कांहीं वावगें आहे, असें म्हणतां येणार नाहीं. किंबहुना, आर्थिक समतेच्या दृष्टीनें तसें करणें आवश्यक आहे, असें म्हणावें लागेल. जिवाची चैन करायला येणाऱ्या लोकांना माणशीं रुपया-दोन-रुपये कर द्यावा लागला, तर त्यांत कांहीं अवघडही वाटूं नये.

ह्या करांतून पायीं येणारे बहुधा वगळले जातात. कारण असे लोक आसपासच्या खेड्यांतलेच असतात. भाड्याच्या मोटारीनें येणाऱ्यांना जेवढा कर द्यावा लागतो, त्यापेक्षां खासगी गाड्यांतून येणाऱ्यांना जास्त द्यावा लागतो, शिवाय त्या गाड्यांनाही कर द्यावा लागतो. एप्रिल-मे व ऑक्टोबर हे महाबळेश्वरचे सीझनचे महिने. ह्या महिन्यांत माणशीं जेवढा कर पडतो, त्याच्या निम्म्यानें बिगरमोसमांत येणाऱ्यांना द्यावा लागतो आणि अमूक मुदतीच्या आंत परत गेल्यास त्या करांतील निम्मी रक्कम परत मिळते, ह्याचें ज्ञान आम्हांला वेशींतच झालें.

महाबळेश्वरचीं खास फळें म्हणजे स्ट्रॉबेरी (ग्रामीण नांव इष्टापुरी) व गूजबेरी. परंतु त्यांचा सीझन नसल्यामुळें कसल्या तरी भिकार स्ट्रॉबेरी घेऊन वेशींतील विक्रेत्यानें आमचें स्वागत केलें. त्या फळांकडे पाहिल्यावरही आपण अवेळीं येथें आलों आहोंत, ह्याची कल्पना आम्हांला आली.

पुढें आम्ही जेव्हां हॉटेलें शोधूं लागलों, तेव्हां बहुतेक हॉटेलें पूर्णपणें रिकामींच असल्याचें आम्हांला आढळून आलें. अर्थात् त्यांत आमचा एक फायदा होता. ह्या दिवसांत राहाण्या-जेवण्याचे दर किंचित् कमी झालेले असतात. एरव्हीं ज्या हॉटेलांत एका दिवसाला १० रुपये द्यावे लागतात, त्याच हॉटेलांत ७-८ रुपयांमध्यें आरामांत राहातां येतें. त्या वेळींही आपण बिगरमोसमांत आल्याची जाणीव आम्हांला झाली.

## मुंबईचा सूर्यास्त महाबळेश्वरवरून

आम्ही सूर्यास्ताच्या सुमारास महाबळेश्वरांत पोंचलों होतों आणि दुसऱ्या दिवशीं दुपारींच तेथून परतणार होतों. ह्यामुळें आपल्या हाताशीं असलेला एकमेव सूर्यास्त वाया घालवायचा नाहीं, असें आम्हीं ठरविलें आणि इतर गोष्टींत वेळ न घालवितां सरळ 'बॉंबे पॉइंट' (मुंबई टोक) किंवा 'सनसेट पॉइंट' (सूर्यास्त टोक) पाहाण्यास गेलों. अगदीं ऐन वेळीं आम्ही जाऊन पोंचलों. दिवसभराच्या

वाटचालीनें दमला-भागलेला सूर्य मुंबईच्या समुद्रांत बुडी मारण्याच्या अगदीं बेतांत होता. तेथें समुद्र असेल, अशी प्रथम दर्शनीं कल्पना आली नाहीं. परंतु बराच वेळ टक लावून पाहिल्यानंतर तेथें समुद्र दिसूं लागला – (कीं समुद्राचा भास होऊं लागला ?) इतकेंच नव्हे, तर समुद्रांत बुडणाऱ्या सूर्याचें प्रतिबिंब जसें पाण्यावर हेलकावे खातांना दिसतें, तसें तें आम्हांला दिसूं लागलें. सूर्योदय आणि सूर्यास्त कितीही वेळां आणि कितीही ठिकाणांवरून पाहिले, तरी त्यांचा कंटाळा येत नाहीं. उलट दर खेपेस त्यांत एक निराळेंच सौंदर्य अनुभवाला येतें.

त्या दिवशींही असेंच झालें. समोर पसरलेली सखोल व विशाल दरी आणि क्षितिजाला दोलायमान करणारा अरबी समुद्र, ह्यांमुळें त्या सूर्यास्ताला एक खास भव्यता प्राप्त झालेली होती. तें दृश्य पाहाण्यास अगदीं मोजकीं माणसें होतीं. तींही गडबड-बडबड न करणारीं, उत्सुकतेनें सूर्यास्ताचें सौंदर्य लुटण्यांत दंग झालेलीं! ह्यामुळें एक विशेष वातावरण तेथें तयार झालें होतें. त्या दृश्यानें व त्या वातावरणानें आम्ही इतके भारावून गेलों, कीं तेथून हलावें असें आम्हांला वाटेना.

## थंडीनें गारठलेला मुंबईकर

परंतु त्या अपरिचित निर्जन प्रदेशांत काळोख पडल्यानंतर थांबणें बिनधोक नव्हतें, म्हणून आम्ही इतर कांहीं पाहाण्यांत वेळ न घालवितां सरळ हॉटेलांत गेलों. मध्यमवर्गीयांना परवडेल असें एक गुजराती शाकाहारी हॉटेल आम्हीं पसंत केलें होतें. तेथें जाऊन आम्हीं हात-पाय धुतले आणि जरा विश्रांति घेऊं लागलों, इतक्यांत कसलातरी गलबला ऐकूं आला. म्हणून उठून पाहिलें, तो एक मुंबईकर गुजराती तरुण गरम पाण्यानें स्नान करूनही गारठला होता आणि कडकड दांत वाजवीत आपल्या दुर्दशेचें प्रदर्शन करीत होता. वस्तुतः थंडीच्या दिवसांत महाबळेश्वरसारख्या ठिकाणीं सकाळींही स्नान केलें नाहीं, तरी चालण्यासारखें असतें. मग रात्रीं स्नान करणें तर अगदींच मूर्खपणाचें

म्हटलें पाहिजे. मुंबईपासून महाबळेश्वरपर्यंत डांबरी सडक असल्यामुळें धुरळ्याचाही विशेष त्रास होत नाहीं. परंतु पुष्कळ मुंबईकर मंडळींना नेहमींच सकाळ-संध्याकाळ गार पाण्यानें स्नान करण्याची सवय असल्यामुळें, त्या तरुणाला महाबळेश्वरांतही स्नानाशिवाय चैन पडलें नसावें. अर्थात् स्नान केल्यानंतर उघड्या हवेंत बाहेर न पडण्याचें पथ्य जरी त्यानें पाळलें असतें, तरी त्याला गारठून जावें लागलें नसतें. अखेर आम्हीं त्याला स्वयंपाकघरांत जाऊन पेटलेल्या चुलीजवळ बसण्याचा सल्ला दिला आणि त्याप्रमाणें तो स्वयंपाकघरांत जाऊन ' गरम ' झाला, तेव्हांच त्याचें शरीर व डोकें ठिकाणावर आलें आणि आपल्याला हिंवताप आलेला नव्हता, ह्याविषयीं त्याची खात्री पटली.

## पांच नद्यांच्या उगमावर !

महाबळेश्वरांतील सर्वांत उंच (४,७१० फूट) ठिकाण विल्सन पॉइंट, किंवा ज्याला हल्लीं कोयना टोक म्हणतात तो आर्थर पॉइंट (उंची ४,४२१ फूट) – कीं जेथून खालीं वाकून पाहिलें असतां आपण पाताळांत डोकावत असल्याचा भास होतो, जेथील नैसर्गिक ' खिडकी 'तून फेकलेला रुमाल किंवा गवताची हॅट वाऱ्याच्या जोरामुळें गुरुत्वाकर्षणाला दाद न देतां फेकणाऱ्याकडे परत येते आणि जेथून खालचीं माणसें परीकथेंतल्या अंगठ्याएवढ्या माणसांसारखीं, घरें खेळांतल्या घरकुलांसारखीं व जनावरें छोट्याशा खेळण्यांसारखीं दिसतात, असें म्हणतात. एल्फिन्स्टन, सावित्री, मार्जोरी, कॅसलरॉक, लॉडविक, सिडने, कारनॅक, हेलेन, गौळण, वगैरे देशी-विदेशी नांवें असलेलीं टोकें पाहाण्याच्या भरीस आम्ही पडलों नाहीं. कारण आम्हांला प्रतापगडचें आकर्षण त्या सर्वांत अधिक होतें आणि येतांना कृष्णेचा उगम पाहायचा होता. दुसरें एक कारण असें, कीं एक-दोन टोकें पाहिल्यानंतर त्यांतील नावीन्य संपतें आणि नुसती पायपीटच जमेच्या बाजूस शिल्लक राहाते. परंतु ' तुम्ही एवढे महाबळेश्वरला गेलांत नि तो अमकातमका पॉइंट कसा पाहिला नाहींत ? अहो तो तर सर्वांत

महत्त्वाचा पॉइंट!' असें पूर्वी जाऊन आलेल्या लोकांनीं आपल्याला म्हणूं नये, ह्यासाठीं आपण पायपीट करतों किंवा सायकलवरून रखडतों किंवा ऐपत असल्यास टॅक्सीपायीं पैसा नासतों. (अर्थात् आमच्या बाबतींत तो प्रश्न नव्हता. आमची अडचण फक्त वेळेची होती!)

सांगायचें तात्पर्य काय, कीं आम्ही वेगवेगळीं टोकें पाहाण्यांत किंवा वेशीवरल्या मनोहर सरोवरांत नौकाविहार करण्यांत वेळ न घालवितां, सरळ प्रतापगडला गेलों आणि ऊन्ह होण्यापूर्वीं प्रतापगड पाहून परतलों. येतांना नव्या महाबळेश्वरच्या बाजारपेठेपासून तीन मैलांवर असलेल्या जुन्या महाबळेश्वरांत किंवा मूळ महाबळेश्वरांत आम्ही गेलों आणि तेथील देवळें पाहाण्याआधीं आम्ही पंचनद्यांचा उगम पाहाण्यास गेलों.

मध्यप्रदेशांतील मूळतापी ह्या आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांच्या गांवीं कांहीं वर्षांपूर्वीं त्यांच्याबरोबर गेलों असतां, मीं तेथें तापीचा उगम पाहिला होता. एका डबक्यासारख्या तळ्यांतून तेथें तापीचा उगम होतो. खानदेशांत व गुजरातेंत एखाद्या महानदीचें रूप धारण करणाऱ्या तापीचा तो उगम पाहून, माझा त्या वेळीं विरस झाला होता. कारण नदीचा उगम एखाद्या डोंगराळ, खडकाळ झऱ्यांत असला पाहिजे, अशी माझी अपेक्षा. त्या दृष्टीनें पाहिल्यास तापीचा उगम अगदींच गद्यमय जागेंत झालेला आहे. परंतु महाबळेश्वरसारख्या डोंगरांत कृष्णेचा उगम झालेला असल्यामुळें, तो तरी माझा अपेक्षाभंग करणार नाहीं, असें मला वाटत होतें.

## मानवानें हिरावून घेतलेलें उगमाचें सौंदर्य

परंतु कृष्णेचा म्हणून दाखविण्यांत येणारा उगम, तेथील देऊळ, पाण्याचें कुंड, वगैरे पाहून माझा खूपच विरस झाला. मूळ उगमाचा झरा अडवून तेथें एक मजबूत भिंत बांधलेली आहे. तिच्या मागें झऱ्याचें पाणी खेळवून तें पांच किंवा सात मुखांनीं बाहेर सोडलें आहे. ह्या सात नद्या म्हणजे कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री, सावित्री,

भागीरथी व सरस्वती ह्या होत. ( त्यांची नांवेंच तेथें लिहिलेलीं आहेत, त्यामुळें ओळखण्यास अडचण पडत नाहीं. ) ह्यांपैकीं डावीकडील भागीरथीचा प्रवाह दर बारा वर्षांनीं म्हणजे कन्यागतीं वाहूं लागतो व उजवीकडील सरस्वतीचा प्रवाह दर साठ वर्षांनीं कपिलाषष्ठीचा योग येतो, तेव्हां वाहातो, असें सांगण्यांत येतें. परंतु ते प्रवाह केव्हां वाहावेत हें परमेश्वराऐवजीं बहुधा तेथील भटजींच्याच हातीं असावें, असें तेथील एकूण देखावा पाहून वाटतें. 'माझी तीर्थयात्रा' ह्या पुस्तकांचे कट्टर सनातनी लेखक श्री. गोविंद हरि फडके ह्यांनाही ह्याविषयीं शंका आली होती आणि तीस वर्षांपूर्वीच्या आपल्या पुस्तकांत त्यांनीं ती पुढील शब्दांत व्यक्तही केली होती : "या दृश्य प्रवाहांचे भिंतीचे मागें दुसरी एक भिंत आहे व तींतून हे प्रवाह येत आहेत. तेथें जाण्याकरितां दीड फूट लांबी-रुंदीचा एक कोनाडा आहे. त्यास दगडी दार आहे. तें बहुधा लागलेलें असतें. त्या कोनाड्यांतून दिवा घेऊन आंत गेलें असतां, मूळ प्रवाह दिसतात. आंत गेल्यावर गुडुप अंधार आहे. दिव्याशिवाय कांहीं दिसत नाहीं. तेथेंही असेच कोनाडे आहेत. **त्यापलीकडे एक प्रवाह असून त्या प्रवाहाचे हे सात प्रवाह उत्पन्न केले असून, जसजसा काळ येईल त्याप्रमाणें हे प्रवाह पुजारी लोक सुरू करीत असावेत असें वाटतें. वस्तुतः हा फक्त कृष्णेचाच उगम आहे.**" ( महाराष्ट्रांतील प्रवास : पृष्ठ २२५ )

ह्या सात ( किंवा पांच ) नद्यांच्या उगमांतून येणारें पाणी एका गायमुखांतून एका कुंडांत सोडलेलें आहे. त्याला ब्रह्मकुंड असें म्हणतात. भाविक लोक येथें स्नान करतात. परंतु उन्हाळ्यांतही हें पाणी इतकें भयंकर गार असतें, कीं कसेंबसें तांब्यानें तें पाणी अंगावर घेणाऱ्या धर्मभोळ्या लोकांची आपल्याला कींवच येते. हें पाणी दुसऱ्या एका कुंडांत सोडलेलें आहे. तेथें लोक कपडे धुतात. ह्या दोन कुंडांवरील भाग मोकळा ठेवून सभोवतीं ओवऱ्या व देऊळ

बांधलेलें आहे. त्यामुळें आंत भरपूर प्रकाश खेळतो आणि जीव गुदमरत नाहीं. ह्याबद्दल देऊळ बांधणाऱ्यांचे आभार मानले पाहिजेत.

## कृष्णेचा खरा उगम कोठें आहे?

वस्तुतः कृष्णा, वेण्णा, कोयना व सावित्री ह्या नद्यांचे उगम ह्या महाबळेश्वरच्या डोंगरांत वेगवेगळ्या ठिकाणीं आहेत, हें ह्या नद्यांच्या स्थानांवरून सहज लक्षांत येतें. परंतु लोकांच्या धार्मिक भावनांचा गैरफायदा घेऊन पुण्याचा बाजार मांडणाऱ्या लोकांनीं तें पांच किंवा सात नद्यांच्या उगमाचें थोतांड निर्माण केलेलें आहे. त्या ठिकाणीं कृष्णेचा तरी उगम आहे किंवा नाहीं, ह्याविषयीं मला शंकाच वाटते. कारण त्या दोन कुंडांतून बाहेर पडणारें पाणी देवळांतून बाहेर पडल्यावर रस्त्याकडच्या गटारांत गडप होतें. अधिक चौकशी करितां कृष्णेचा खरा उगम गांवाबाहेर एका शेतांत असून, तेथेंही देऊळ असल्याचें कळलें. म्हणून वाटाड्याला बरोबर घेऊन आम्ही तो उगम पाहायला गेलों. तेथें कृष्णेचें एक मोडकळीस आलेलें लहानसें देऊळ होतें व एका गोमुखांतून पडणारें पाणी एका कुंडांत जमा होत होतें. त्या कुंडांत कोणीतरी अ-मराठी संन्यासी आपली कफनी धूत होता. त्या देवळांत फारसें कोणी जात नसावें. परंतु त्या दोन देवळांपैकीं मला तर हें दुसरें एकाकी, उपेक्षित देऊळच कृष्णेच्या खऱ्या उगमावरील देऊळ असावें, असें वाटलें. कारण त्या कुंडांतील पाणी समोरच्या दरींत पडतांना आम्हांला दिसतच होतें आणि तेथूनच कृष्णेचा प्रवाह सुरू झाला असला पाहिजे, असें आम्हांला वाटलें. मनांत विचार आला, नद्यांच्या उगमांवर कृत्रिम देवळें बांधण्याऐवजीं ते तसेच ठेवण्यांत येतील, तर किती चांगलें होईल! निदान एक निसर्गरमणीय दृश्य तरी पाहायला मिळेल!

## दोन असुरांची कथा

पुराणें असें सांगतात, कीं सृष्टि उत्पन्न करण्याकरितां ब्रह्मा, विष्णु व महेश ह्यांनीं ह्या सह्य शिखरावर मोठी तपश्चर्या केली. पुढें विश्व

निर्माण झाल्यानंतर तपाच्या सांगतेकरितां ब्रह्मदेवानें येथील ब्रह्मारण्यांत मोठा यज्ञ केला. त्या वेळीं पुण्याहवाचनासाठीं ब्रह्मदेवाची थोरली पत्नी सावित्री ही वेळेवर आली नाहीं, म्हणून ब्रह्मदेवानें आपली धाकटी पत्नी गायत्री हिला बरोबर घेऊन यज्ञ करण्यास सुरुवात केली. ( अजमेरजवळील 'पुष्कर' सरोवराच्या उत्पत्तींतही हीच कथा आहे. फरक एवढाच, कीं त्या ठिकाणीं ब्रह्मानें आयत्या वेळीं एका गायीलाच स्त्रीचें रूप देऊन, आपल्या धर्मपत्नीच्या जागीं तिची नियुक्ति केली होती, असें सांगण्यांत येतें. ) पुढें थोड्याच वेळांत सावित्री तेथें आली आणि एकूण प्रकार पाहून क्रुद्ध झाली. तिनें त्या सर्वांना असा शाप दिला, कीं तुम्ही येथें जलरूपानें संचार कराल. अर्थात् मग त्यांनींही तिला तोच शाप दिला. त्याप्रमाणें विष्णूची कृष्णा, शिवाची वेण्णा ( किंवा वेण्या ), ब्रह्माची ककुत्मती ऊर्फ कोयना आणि गायत्री व सावित्री अशा पांच नद्या तेथून वाहूं लागल्या.

हा यज्ञ असुरांच्या नाशासाठीं आहे हें ओळखून, तेथील महाबळ व अतिबळ ह्या दैत्यांनीं त्यांत विघ्न आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हां विष्णूंनीं अतिबळाचा नाश केला. परंतु महाबळाचा पराभव होईना, म्हणून ते तिघे देव आदिमायेस शरण गेले. तेव्हां तिनें महाबळाला जेरीस आणलें. पुढें त्यानें देवांची प्रार्थना केली व त्यांना प्रसन्न करून घेऊन, त्यांच्याकडून असा वर मिळविला, कीं "ह्या आमच्या भूमींत देवांनीं आमच्याच नांवानें निवास करावा." त्याप्रमाणें महाबळेश्वर व अतिबळेश्वर ह्या नांवांनीं शंकरांनीं त्या भूमींत वास करण्यास सुरुवात केली.

त्यांपैकीं महाबळेश्वराचें देऊळ चांगलें प्रशस्त आहे. तेथील शंकराचें लिंग म्हणजे चार हात व्यासाचा वाटोळा व सरासरी एक वीतभर उंच आलेला असा एक ओबडधोबड खडक आहे. त्या खडकांत वाटीएवढ्या आकाराचे पांच-सात खळगे आहेत. त्यांतून नेहमीं पाण्याचा प्रवाह वाहात असल्यामुळें त्या वाट्या म्हणजेच कृष्णा, वेण्या, कोयना, सावित्री, गायत्री, वगैरे नद्यांचे उगम होत, असें समजलें जातें.

इतर क्षेत्रांच्या ठिकाणांप्रमाणें येथेंही भटजींचा फार उपद्रव होतो. आपल्या गांवांत येणारा प्रत्येक प्रवासी हा धर्मभोळा यात्रेकरूच आहे, अशा समजुतीनें ते येणाऱ्या लोकांचा इतका पाठपुरावा करतात, कीं निसर्गसौंदर्य अथवा प्राचीन शिल्प पाहाण्याच्या हेतूनें तेथें गेलेल्यांचा अगदीं कोंडमारा होतो. ज्यांना धार्मिक कृत्यें करायची इच्छा असेल, त्यांना ब्राह्मणांनीं पैसे घेऊन कां होईना, मदत केल्यास त्याबद्दल धर्मभीरु लोक त्यांना धन्यवादच देतील. परंतु ज्यांना धार्मिक कृत्यें करायचीं नाहींत, त्यांच्या मागें भटजींनीं लागावें व त्यांचा पिच्छा पुरवावा, ही खरोखरी गुन्हेगारी समजली गेली पाहिजे. त्या ब्राह्मणांची ती लाचारी व लोचटपणा पाहून मला त्यांचा राग आला, कांहींशी कींवही आली !

१८२८ सालपर्यंत महाबळेश्वरचा डोंगर सातारच्या छत्रपतींच्या मालकीचा होता. परंतु त्या वर्षी सातारच्या महाराजांनीं मुंबईचा गव्हर्नर सर जॉन मालकम ह्याला मे महिन्यांत विश्रांतीसाठीं महाबळेश्वरला बोलाविलें. त्या वेळीं मालकमसाहेबांवर ह्या स्थानाची मोहिनी पडून, त्यानें छत्रपतींना एक लहानसें खेडें देऊन, त्याच्या मोबदल्यांत महाबळेश्वर इंग्रजी राज्यास जोडून घेतलें. त्याच्या ह्या कृत्याबद्दल कांहीं देशाभिमानी लोक त्याला दोष देतात. परंतु महाबळेश्वरांतील आधुनिक सुखसोयी व उन्हाळ्यांतील त्याचें वैभव ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांच्या मनांत खात्रीनें असा विचार येत असेल, कीं मालकमसाहेबानें हा डोंगर आपल्या राज्यास जोडला नसता, तर येथें ही गंधर्वनगरी निर्माण झाली असती का ? निदान स्वराज्य येईपर्यंत तरी तसें कांहीं घडलें असतें, अशी आशा करण्यास फारशी जागा नाहीं !

# कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर

## कर्णमधुर ‘ दिगंबरा ! ’

मागें एकदा मी शांतिनिकेतन पाहायला निघालों असतां, पूज्य दादांनीं ( आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांनीं ) मला सांगितलें होतें, कीं “ शांतिनिकेतनमधली पहाट अनुभवायला चुकूं नका. पहाटे तिथें नानाप्रकारचे असंख्य चित्रविचित्र पक्षी येतात आणि आपल्या किलबिलाटानें सारं वातावरण भरून नि भारून टाकतात. त्या वेळीं आपल्या मनाला होणारा आनंद अगदीं अवर्णनीय असतो. ” पहाटेच्या निवान्त वेळीं कानीं पडणारें संगीत, मग तें मानवी कंठांतून निघालेलें असो, कीं पक्ष्यांच्या, मैफलींतील शास्त्रीय रागदारी असो, कीं आजीच्या मुखांतून निघालेली साधी भूपाळी असो, माणसाला मुग्ध केल्याशिवाय राहात नाहीं.

ह्या गोष्टीची प्रचीति किंवा पुनःप्रत्यय नृसिंहवाडी ( ऊर्फ नरसोबाची वाडी ) येथील मुक्कामांत पहिल्याच पहाटे आला. वस्तुतः वाडीस गेल्यानंतर पुजाऱ्याच्या घरीं बरोबरचें सामान टाकून, थेट कृष्णेवर जायचें आणि हातपाय धुवून, मनानें शुचिर्भूत होऊन, कांठावर असलेल्या श्रीदत्ताच्या पादुकांचें दर्शन घ्यायचें, हा सर्वसामान्य रिवाज. परंतु अपरात्रीं वाडीला पोंचल्यामुळें मला हा रिवाज पाळतां आला नाहीं. ( रात्रीं ९ च्या सुमारास दत्ताची आरती, वगैरे झाल्यानंतर मंदिराच्या आसपासची फरशी धुवून टाकतात. त्यानंतर कोणींही त्या घाटावर जायचें नाहीं, असा नियम आहे. ) परंतु पहाटे साडेतीन वाजतां दोन मधुर कंठांतून निघणाऱ्या नामोच्चारानें मी जागा झालों आणि त्या स्वरांनीं मला मुग्ध करून टाकलें. त्यांपैकीं

एक स्वर वृद्धाच्या कंठांतून येत होता आणि दुसरा एका तरुणाच्या कंठांतून येत होता. वृद्ध सांगत होता :

दिगंबरा दिगंबरा।
श्रीपादवल्लभ दिगंबरा॥

आणि तरुण सेवेकरी त्याचा पुनरुच्चार करीत होता. चारच (किंबहुना दोनच) शब्द! पण एखादें सुरेल संगीत ऐकत असल्याचा भास होत होता.

ह्या कार्यक्रमाला येथील लोक 'दिगंबरा' असेंच म्हणतात. 'दिगंबरा' होऊन गेला, कीं भक्तगण उठून, स्नान, वगैरेसाठीं कृष्णेकडे जाऊं लागतात. लोकांना जागें करण्याचें हें पुण्यकार्य जे सेवेकरी करतात, त्यांच्यापैकीं हे वृद्ध गृहस्थ गोव्याहून येथें येऊन राहिलेले कोणी सारस्वत आहेत, असें कळलें. माधुकरी मागून पोट भरायचें आणि देवाची सेवा-भक्ति करायची, एवढेंच त्यांचें जीवन-कार्य.

## वाडीला जाण्याचे मार्ग

नृसिंहवाडी किंवा नरसोबाची वाडी हिला इकडील लोक नुसतें 'वाडी' असेंच म्हणतात. कोल्हापूर-मिरज लोहमार्गावरील जयसिंगपूर ह्या स्टेशनपासून वाडी फक्त ९ मैल. तेथें जाण्यासाठीं दिवसभर गाड्या चालू असतात. वेळप्रसंगीं टांगेही मिळूं शकतात. कोल्हापूरहून थेट वाडीला जाण्याकरितां एस्. टी. च्या गाड्या आहेत. थेट गाडीनें गेल्यास थोडी दगदग वांचते, परंतु भाडें मात्र आठ आणे जास्त पडतें. जयसिंगपूरची हवा कोरडी असल्यामुळें, तेथें क्षयरोग्यांना आरोग्य लाभतें. पूर्वी जयसिंगपूरला शिरोळ रोड असें नांव होतें.

## क्रान्तिवीर कृष्णंभट्ट

बसस्टँडवर उतरतांच यात्रेकरूंसाठीं बांधलेल्या धर्मशाळेसारख्या ओवरीवर आपली दृष्टि पडते आणि तेथें लिहिलेल्या 'क्रान्तिवीर कृष्णंभट्ट (१८५७-१९५७) निवास' ह्या शब्दांकडे आपलें लक्ष

वेधतें. आपल्या गांवच्या क्रान्तिवीराचें स्मरण गांवांत येणाऱ्यांना प्रथमच घडविण्यांत वाडीकरांनीं औचित्य साधलें आहे, ह्यांत शंका नाहीं.

## छोटेंसें टुमदार गांव

तसें पाहिल्यास वाडी हें कांहीं स्वतंत्र गांव नव्हे. शेजारच्या कुरुंदवाड ह्या गांवची ती वाडी. वस्ती जेमतेम दोन-अडीच हजार. त्यांपैकीं निम्म्याहून अधिक ब्राह्मण. एक प्रकारें ही ब्राह्मणांचीच वाडी आहे, असें म्हटलें तरी चालेल. न्हावी, धोबी, हरिजन, मुसलमान, वगैरे शूद्र व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांचीं घरें येथें नाहींत. शिरोळ, औरवाड, कुरुंदवाड, वगैरे ठिकाणांहून न्हावी, धोबी रोज येथें येत असतात. नदीच्या कांठाकांठानें वसलेल्या तीन-चार गल्ल्या म्हणजे वाडी. ह्या गल्ल्यांचे रस्ते फरसबंदी आहेत. त्या अरुंद रस्त्यांवरून चालतांना काशींतील बोळांची आठवण होते. सोवळ्याच्या दृष्टीनें फरसबंदी रस्ते विशेष सोयीचे असले पाहिजेत. गांवाला ग्रामपंचायत असून, एक मराठी शाळा आहे. एक हायस्कूलही नुकतेंच सुरू करण्यांत आलेलें आहे. १९४८ सालीं गांधीजींच्या हत्येनंतर झालेल्या जाळपोळींत येथील जवळजवळ निम्मीं-शिम्मीं घरें आगीच्या भक्ष्यस्थानीं तरी पडलीं होतीं, किंवा लुटलीं तरी गेलीं होतीं. परंतु त्यामुळें येथील वस्तीवर कांहीं विशेष परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. जळलेलीं घरें पुनः बांधण्यांत आलीं असून जीवन पूर्ववत् चालू झालेलें आहे.

## कृष्णा आणि पंचगंगा ह्यांचा संगम

उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहाणारी कृष्णा आणि पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहाणारी पंचगंगा, ह्यांचा येथें संगम होतो आणि पंचगंगेला आपल्यामध्यें समाविष्ट करून घेऊन, कृष्णामाई पूर्वेकडे मार्गक्रमण करते. त्यांच्या ह्या संगमावर एक घाट आहे. ह्या घाटावर बसलें असतां, ह्या दोन भगिनींचा संगम मोठा मनोहर दिसतो. ह्या ठिकाणीं कृष्णेपेक्षां

पंचगंगेचा जोर अधिक असावा, असें वाटतें. परंतु पाण्यांचे गुणधर्म पाहून, संगमानंतरच्या पाण्यांत ज्या नदीच्या पाण्याचे गुणधर्म सापडतात, तिचें नांव पुढील प्रवाहाला दिलें जातें. त्यामुळें पुढील नदी पंचगंगा न होतां, कृष्णा राहिली आहे. संगमावरून कुरुंदवाड व औरवाड ह्या गांवांना जाण्यासाठीं सारख्या नावा चालू असतात. तो नौकाविहारही मोठा आनंददायक असतो.

## कृष्णेचा सखोल प्रवाह

प्रत्यक्ष दत्तमंदिरासमोर कृष्णेचा प्रवाह खूपच खोल असून, शेवटपर्यंत दगडी घाट आहे. समोरच्या बाजूस विस्तीर्ण वाळवंट आणि त्यापलीकडे पेरूच्या बागा व हिरवींगार शेतें ह्यांचें दृश्य मनाला मोहून टाकतें. नदींत स्नान करून किंवा हात-पाय धुवून, देवदर्शन घ्यायचें असा नियम आहे. कांठाजवळ पाणी विशेष खोल नसलें, तरी पाण्याला ओढ इतकी भयंकर आहे, कीं पोहायला येत नसलेल्या व्यक्तींनीं कंबरेहून अधिक खोल पाण्यांत जाणें धोक्याचें असतें. गांवचीं मुलें व मुली मात्र त्या पाण्यांत मोठ्या मजेंत लीलेनें डुंबत असतात.

## दत्ताचें छोटेखानी मंदिर

घाटावरचें दगडी दत्तमंदिर अगदींच छोटें, तीन खणांचें आहे. गाभारा तर इतका लहान आहे, कीं आंत एका माणसालाही नीट बसतां येत नाहीं. गाभाऱ्याचें प्रवेशद्वार म्हणजे छोटीशी खिडकीच आहे. गर्भगृहांत श्रीदत्ताच्या दगडी पादुका आहेत. ह्या सुट्या नसून, एका मोठ्या शिळेवर कोरलेल्या आहेत. सुमारें पांचशें वर्षांपूर्वी (शक १३८०, सन १४५८) श्रीनृसिंहसरस्वती ह्यांनीं बारा वर्षें येथें राहून तपश्चर्या केली होती व त्यांनींच ह्या पादुकांची स्थापना केली होती. श्रीनृसिंहसरस्वतींना श्रीपाद-श्रीवल्लभांचा म्हणजे दत्ताचा दुसरा अवतार मानतात. तेव्हांपासून आजपावेतों हें देवस्थान जागृत आहे, असें समजलें जातें. श्रीनृसिंहसरस्वतींनीं जे दैवी चमत्कार करून दाखविले, त्यांचें वर्णन गुरुचरित्रांत आलेलें आहे. त्यांवर विश्वास ठेवणारे व

गुरुचरित्राच्या पठणानें सारीं संकटें नाहींशीं होऊन, इष्टकामना सिद्ध होते, अशी श्रद्धा बाळगणारे हजारों लोक आज सुशिक्षितांमध्येंही आहेत.

## ब्राह्मणांचा देव

पंढरीचा विठोबा हा जसा बहुजनसमाजाचा देव आहे, तसा वाडीचा दत्त हा बहुजनसमाजाचा देव म्हणतां येणार नाहीं. त्याचें सोवळें फार कडक आहे. पूर्वीं नदींत स्नान करून, ओलेत्यानें तांब्या भरून घेऊन येणाऱ्या ब्राह्मणालाच देवळांत प्रवेश करून, पादुकांवर पाणी घालतां येत असे. परंतु मध्यंतरीं इतर लोकांनीं ( ब्राह्मणेतरांनीं व हरिजनांनीं ) देवाला पाणी घालण्याचा आग्रह धरल्यामुळें त्या वेळचे कोल्हापूरचे दत्तभक्त ब्राह्मण प्रशासक कॅप्टन नंजाप्पा ह्यांनीं असा हुकूम काढला, कीं हक्कदार पुजाऱ्यांशिवाय कोणीही देवळांत प्रवेश करायचा नाहीं व देवाला पाणी घालायचें नाहीं. अशा प्रकारें एका अन्यायाचें समर्थन करण्यासाठीं दुसरा अन्याय करण्यांत आला किंवा तोच अन्याय सार्वजनिक करण्यांत आला. आतां ज्यांची पाळी असते असे पुजारी व त्यांच्या विशेष मर्जींतील ब्राह्मण, हेच पादुकांना पाणी घालूं शकतात. अशा प्रकारें ह्या देवाचा भक्तगण मर्यादित आहे. त्यामुळें पुजाऱ्यांना प्राप्तिही फार थोडी होते. परिणामतः पुष्कळसे पुजारी शेतकरी बनले आहेत व बनत आहेत. एका दृष्टीनें हा एक चांगलाच परिणाम झाला आहे, असें म्हणतां येईल. दत्त दिगंबर हा संन्यासी देव. त्याला दागदागिने काय करायचे? त्यामुळें ह्या देवळांत चोरी होण्याची भीति कधींच नसते. इतर देवांच्या ( म्हणजे त्यांच्या संपत्तीच्या ) रक्षणासाठीं अहोरात्र शिपाई ठेवावे लागतात. त्यांची मात्र येथें मुळींच गरज भासत नाहीं.

## भुताखेतांचें प्रस्थ

भुतानें पछाडलेले स्त्री-पुरुष हें वाडीचें सर्वांत महत्त्वाचें वैशिष्ट्य एके काळीं होतें. असे लोक येथें येऊन राहात व श्रींची ( दत्ताची ) सेवा करून मुक्त होत. रात्रीं आरतीच्या व पालखीच्या वेळीं ह्या

लोकांच्या अंगांत भुताचा संचार होई आणि ते लोक तेथील मंडपाच्या खांबांना धरून 'सोडवा, सोडवा' असें ओरडत, डोकीं फोडून घेत, बेशुद्ध पडत किंवा किंकाळ्या फोडीत. अशा प्रकारें त्या अदृश्य पिशाचावर रोज सकाळ-संध्याकाळ मारा होत गेला, म्हणजे तें पिशाच तें झाड (मनुष्य) सोडी व त्यानंतर त्या मनुष्याची व पिशाचाचीही मुक्ति होई. ह्या बाबतींत कांहीं बुद्धिवादी वैज्ञानिकांनीं प्रयोग करून पिशाचयोनि निश्चितपणें असल्याबद्दल खात्री करून घेतली होती, असें येथील लोक सांगतात. परंतु अलीकडे मात्र असे लोक फारसे आढळत नाहींत. त्यासंबंधीं चौकशी करतां गोव्याची सरहद्द बंद झाल्यापासून अशा प्रकारच्या पछाडलेल्या लोकांची संख्या संपुष्टांत आलेली आहे, असें कळलें; कारण अशा प्रकारें भुतानें पछाडलेले लोक मुख्यतः गोव्यांतूनच येत असत. भुताखेतांचें प्रस्थ कोकणांत व गोव्यांतच विशेष कां असावें, हा एक संशोधनाचा विषय होण्यासारखा आहे.

कदाचित् शिक्षणाचा प्रसार हेंही पिशाच-पीडित लोकांच्या संख्येंत घट होण्याचें एक कारण असूं शकेल. पूर्वीं येथें येणारे भक्त पुजाऱ्यांकडे उतरून, एक-दोन दिवस राहून, दत्ताला नैवेद्य, पंचामृतपूजा, महापूजा, वगैरे करवीत. त्यामुळें येथील भटजींचा चरितार्थ उत्तम प्रकारें चाले. परंतु अलीकडे अशा लोकांची संख्या खूपच घटली आहे. बहुतेक भक्त लोक एका मोटारीनें येतात, सरळ घाटावर जाऊन स्नान करतात किंवा हात-पाय धुतात आणि दर्शन घेऊन दुसऱ्या मोटारीनें परत जातात. त्यामुळें बहुतेक ब्राह्मणांचीं तरुण मुलें शिक्षण घेऊन नोकरींत शिरलेलीं आहेत. देवकृत्यें करणारे तरुण आतां फारच थोडे राहिले आहेत.

## सत्पुरुषांच्या समाध्या

मंदिराच्या मागील बाजूस दगडी ओवऱ्या असून, सकाळच्या वेळीं भक्त लोक तेथें बसून, गुरुचरित्राचा पाठ करीत असतात. त्या वेळचें

तेथील वातावरण प्रसन्न व पवित्र वाटतें. आणखी कांहीं पायऱ्या चढून वर आलें, कीं वेगवेगळ्या सत्पुरुषांच्या व योग्यांच्या समाध्या आहेत. त्यांपैकीं रामचंद्र योगी ह्यांनीं जिवंत समाधि घेतली आहे. श्रीनृसिंहसरस्वती येथें येण्यापूर्वीपासूनच ते येथें वास करीत होते. ज्या वेळीं कृष्णेला पूर येऊन दत्तपादुका जलमग्न होतात व तेथें जाणें अशक्य होतें, त्या वेळीं नेमाचे सेवेकरी ह्या रामचंद्र योग्यांची सेवा करून, आपला नेम पुरा करतात.

त्याखेरीज श्रीवासुदेवानंदसरस्वती ( टेंबेमहाराज ), श्रीनारायणस्वामी, श्रीमौनीस्वामी, वगैरे सत्पुरुषांच्या समाध्या येथें आहेत.

## वाडीचे प्रसिद्ध पेढे व बर्फी

कृष्णाकांठच्या ह्या सुपीक प्रदेशांत दूध-दुभत्याची रेलचेल असल्यास नवल काय ? कृष्णाकांठचें दूध-तूप सकस असतें. त्यामुळें येथील पेढे फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. उत्कृष्ट फिका पेढा सव्वादोन रुपयांस शेर ह्या दरानें आम्हांला मिळाला. तसेंच येथील कवठाची बर्फीही चविष्ट म्हणून प्रसिद्ध आहे. वाडीचीं वांगीं तर साऱ्या दक्षिण महाराष्ट्रांत लोकप्रिय आहेत; तशींच येथील वाळकेंही ! ( लांब, हिरव्या सालीच्या काकड्या )

## कुरुंदवाडचें विष्णुमंदिर

नृसिंहवाडीपासून कुरुंदवाड एक मैल आहे. संस्थान विलीन झाल्यामुळें पूर्वीची शान तेथें राहिलेली नाहीं. गांवांतील गलिच्छपणाही थोडा वाढला आहे. परंतु बाहेरून तेथें जाणाऱ्यांना त्याच्याशीं काय करायचें ? त्यांनीं फक्त तेथील विष्णूचें मंदिर पाहून घ्यावें. सुमारें पावणे-दोनशें वर्षांपूर्वीं बांधलेलें हें देऊळ खरोखरीच प्रेक्षणीय आहे. साधा काळा दगड घेऊन, तो घोटून, गुळगुळीत बनविण्यांत आलेला आहे आणि बिब्ब्याच्या चिकाचा किंवा तसल्याच कसल्याशा रसायनाचा त्यावर लेप देण्यांत आलेला आहे. ह्यामुळें तो दगड शुद्ध काळ्या

संग-मरवरासारखा तुळतुळीत व चकचकीत दिसतो. असा दगड इकडे क्वचितच पाहायला मिळतो. गाभाऱ्याचे तीन दरवाजे शुभ्र संग-मरवरी दगडाचे आहेत. हे जाळीदार दरवाजेही फार छान दिसतात. देवाला प्रदक्षिणा घालतांना डोळे मिटून भिंतीवरून उलटीं बोटें फिरवावींत; दगडांच्या सांध्यांची जाणीवही बोटांना होणार नाहीं, इतके ते बेमालूम सांधलेले आहेत. जुन्या शिल्पकलेचें वैशिष्ट्य म्हणून ही गोष्ट सदैव स्मरणांत राहील.

## हनुमंतें येथील हनुमान-मंदिर

### पायीं प्रवासांत आलेले अनुभव

पुष्कळ वेळां आपण जगांतल्या विविध आश्चर्यांची माहिती गोळा करीत खूप दूरवर जाऊन पोंचतों, परंतु आपल्या घराशेजारीं एखादें आश्चर्य किंवा चमत्कार असेल, तर त्याचें महत्त्व मात्र आपल्याला वाटत नाहीं. जेव्हां बाहेरचा कोणी तज्ज्ञ माणूस येऊन आपल्याला त्याची माहिती सांगतो, तेव्हां आपण थक्क होऊन, त्या आश्चर्याकडे पाहूं लागतों, अथवा ‘ घर की मुर्गी दाल बराबर ’ ह्या म्हणीप्रमाणें तें आश्चर्य माहीत असलें, तरी त्याचें महत्त्व आपल्याला वाटत नाहीं. ‘ पिकतें तेथें विकत नाहीं ’ हा अनुभव सर्वांनाच असतो. प्रेक्षणीय स्थळांच्या बाबतींतही हा मजेदार अनुभव आपल्याला अनेकदा येतो.

हे विचार सुचण्याचें कारण, म्हणजे नुकतेंच पाहिलेलें हनुमंतें येथील हनुमानाचें मंदिर होय. कोल्हापूर जिल्ह्याचा दक्षिण-पश्चिम भाग व विशेषतः भुदरगड तालुका आणि रत्नागिरी जिल्ह्यापैकीं सावंतवाडी-वेंगुर्ला भाग ह्यांना जोडणाऱ्या हणमंता (किंवा हनुमंत्याच्या)

घाटाचें काम पंचवार्षिक योजनेंत घ्यावें, घेतलें आहे, घेतलें जाणार आहे, वगैरे बातम्या वृत्तपत्रांतून वाचल्यानंतर हा घाट आहे तरी कसा, ते पाहायला जाण्याचें आमच्या मुशाफीर मंडळानें ठरविलें. कोल्हापूरहून गारगोटी ३१ मैल, गारगोटीहून पाटगांव २१ मैल व पाटगांवपासून हनुमंत्याचा घाट ४ मैल २ फर्लांग! पाटगांवपर्यंत एस. टी. जाते. तेथून हनुमंत्यापर्यंत पक्का मोटार रस्ता आहे, परंतु पावसाळ्यापूर्वी तयार केलेला रस्ता एक-दोन ओढ्यांमुळें थोडासा वाहून गेला आहे. त्याचमुळें तेवढा भाग टाळण्यासाठीं अडीच मैलांचा फेरा घेऊन वाहनांना जावें लागतें. आमच्यापैकीं कांहीं मंडळी हनुमंत्याचा घाट उतरून सावंतवाडी-वेंगुर्ल्याला जाणार होती, ह्यामुळें त्यांच्याबरोबर बरेंच सामान होतें. तें सामान वाहून नेण्यासाठीं आम्हीं पाटगांवहून एक बैलगाडी भाड्यानें घेतली होती. तिच्यांत सामान व चालण्याची विशेष सवय नसलेली मंडळी ( महिला ) ह्यांची व्यवस्था झाली. बाकी आम्ही सर्वजण पायींच निघालों.

## कोकणांतून आतां माल येत नाहीं

शांत, निर्जन जंगलांतून पहाटेच्या थंड वेळीं रमत-गमत, गप्पा-गोष्टी, हास्य-विनोद करीत आम्ही चाललों होतों. वेळ केव्हां पसार झाला, तें आम्हांला कळलेंच नाहीं आणि लहानशा ओढ्यासारखी वेदगंगा नदी ओलांडून, आम्ही हनुमंतें गांवापासून जवळच असलेल्या मारुतीच्या देवळापाशीं जाऊन पोंचलों. (शिवाजीचा भाऊ व्यंकोजी उर्फ एकोजी हा तंजावरास राज्य करीत होता. त्याचा कारभार रयतेस सुखाचा व शांततेचा गेला. त्याचें तंजावरचें बस्तान बसविण्यांत त्याचा दिवाण रघुनाथपंत हणमंते हा प्रमुख होता. पुढें त्याचें वर्चस्व सहन न झाल्यामुळें, व्यंकोजीनें त्याला अधिकारपदावरून दूर केलें. तेव्हां तो शिवाजीला येऊन मिळाला आणि त्यानें दक्षिण-दिग्विजयामध्यें शिवाजीला खूप साहाय्य केलें. सदर हणमंते ह्या हनुमंतें किंवा हणमंतें गांवचा असण्याची शक्यता आहे.) ह्या देवळाच्या मागेंच

सुमारें ३ मैल लांबीचा हणमंता घाट सुरू होतो. एके काळीं ह्या घाटांतून बैलांच्या पाठींवरून फार मोठा व्यापार चालत असे, त्यामुळें हा रस्ता तसा विशेष चढणीचा किंवा अवघड नाहीं. हल्लीं मात्र ह्या घाटाचा उपयोग व्यापाराकरतां फारसा केला जात नाहीं. त्याचें कारण काय, ह्याची चौकशी केली असतां, असें समजतें, कीं नारळ, मीठ, आमसुलें, वगैरे जे पदार्थ कोकणांतून येत असत, ते आतां कोल्हापूरहून मागविणेंच अधिक फायदेशीर पडतें. सहा मैलांवरील घाटाखालच्या दुकानवाडीचा नारळ चवीला उत्कृष्ट असला, तरी साठ मैलांवरील कोल्हापूरला मिळणाऱ्या नारळापेक्षां तो महाग पडतो. ह्या नव्या व्यापारी अर्थशास्त्रामुळें ह्या घाटाचा उपयोग पुष्कळच घटला आहे. तरीही घाट फोडून मोटार-रस्ता तयार केला गेल्यास, पुनः एकदा व्यापारी दळणवळण सुरू होईल व लोकांचे हाल वांचतील, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

## हनुमान-मंदिर : एक चमत्कार

ह्या ठिकाणचें हनुमान-मंदिर हा एक चमत्कार आहे. मात्र त्यांत निसर्ग आणि मानव ह्या दोघांचाही सारखाच हिस्सा आहे. दुपाखी छप्पर असलेलें हें मंदिर अगदीं डोंगराच्या कडेला आहे. त्याचें तोंड उत्तरेकडे असून पाठ दक्षिणेला आहे. त्याच्यावर लोखंडी पत्र्यांचें छप्पर आहे. ह्या छप्पराचें वैशिष्ट्य असें, कीं त्याच्या दक्षिणेकडील पाख्यावर पडलेलें पाणी घाटांत पडून तें कोकणांत जातें आणि उत्तरेकडील पाख्यावर पडलेलें पाणी उतरत्या टेकडीवरून वाहात जवळच्या वेदगंगेला येऊन मिळतें. ही वेदगंगा पुढें पंचगंगेला मिळते. पंचगंगा कृष्णेला मिळते आणि कृष्णामाई महाराष्ट्र-आंध्राला ‘ सुजला सुफला ’ बनवीत बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. कोकणांत उतरलेलें पाणी थोडेंसें अंतर कापून अरबी समुद्राला जाऊन मिळतें. म्हणजे हनुमानाच्या मंदिरावरील छपरावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबाचें भाग्य एक-दोन इंचांच्या अंतरावर अवलंबून असतें. उत्तरेकडील

पाख्यावर पडणारा थेंब शेकडों मैलांचा प्रवास करून दक्षिण भारतांतील जन-जीवन पाहात पाहात बंगालच्या उपसागरांत विलीन होतो, तर त्याच ढगांत त्याच्याच शेजारीं असलेला दुसरा थेंब ढगाच्या विशिष्ट स्थितीमुळें किंवा वाऱ्याच्या झोतामुळें दक्षिणेकडील पाख्यावर पडतो आणि झरकन खालीं उतरून घाटांतून उड्या मारीत हां हां म्हणतां अरबी समुद्रांत ऊर्फ पश्चिम सिंधूंत विलीन होतो. परिस्थितीनें दिलेल्या थोड्याशा कलाटणीनें दोन सख्ख्या भावांच्या जीवनांत जमीन-अस्मानाचा फरक पडावा, तशासारखेंच नाहीं का हें ? त्या थेंबांना भावना असतील, तर त्यांना काय वाटत असेल ?

हें देऊळ थोडें पुढें बांधलें असतें, तर दोन्ही पाख्यांचें पाणी उत्तरेच्या उतारावरून वेदगंगेला येऊन मिळालें असतें, परंतु मग त्यांत कांहीं गंमत राहिली नसती. त्यामुळें ज्यानें हें देऊळ बांधलें असेल, त्याच्या हुशारीचें कौतुकच केलें पाहिजे. अर्थात् देऊळ खूप जुनें असल्यानें तें बांधणाऱ्याचा पत्ता लागणें शक्य नाहीं, परंतु लोक असें सांगतात, कीं समर्थांनीं जीं असंख्य हनुमान-मंदिरें बांधलीं, त्यांपैकींच हें एक आहे.

## निसर्गरम्य मनोहरगड

हणमंता घाट उतरण्यास सुरुवात करण्यापूर्वीं जेव्हां आपण समोर पाहातों, तेव्हां निळ्या भुऱ्या डोंगरांनीं वेष्टिलेली व हिरव्यागार झाडांझुडपांनीं भरलेली एक सुंदर खोल दरी आपल्याला दिसते आणि आपलें मन निसर्गाचें तें ऐश्वर्य पाहाण्यांत गुंग होऊन जातें. पाहातां पाहातां आपली नजर एका प्रचंड म्हैसूरपाकाच्या वडीसारख्या मोहक, आखीव डोंगरावर खिळते. चोहोंबाजूंनीं संपूर्णपणें मोकळा असलेला तो डोंगर म्हणजे एक किल्ला आहे आणि त्याचें नांव ‘ मनोहरगड ’ आहे, असें जेव्हां आमच्या वाटाड्यानें आम्हांस सांगितलें, तेव्हां त्या किल्ल्याला ‘ मनोहर ’ नांव देणाऱ्याच्या हुषारीचें व रसिकतेचें आम्हांला कौतुक वाटलें. अर्थात् आमच्याजवळ असलेला वेळ आणि

सामर्थ्य ह्यांचा विचार करतां, सारा घाट उतरून शिवापूरला जायचें व तेथून मनोहरगड चढायचा, हें अगदीं अशक्य आहे, हें आम्हांला कळत होतें. म्हणूनच मनोहरगडावर जाण्याचा मोह आम्हांला टाळावा लागला.

## ऐतिहासिक महत्त्व असलेला घाट

हनुमंतें येथील हनुमानाच्या ह्या मंदिरांतील मारुतीच्या दोन मूर्तिही चांगल्या सुबक आहेत. मारुतीच्या पुढें आलेल्या डाव्या पायाखालीं असलेल्या जंबू माळ्याची मूर्ति आपलें लक्ष वेधून घेते. देवळाच्या समोर दाट सावलीचे आम्रवृक्ष आहेत. त्यामुळें तें स्थान मोठें रम्य वाटतें. येथून जवळच वेदगंगा नदीचें उगमस्थान आहे. महाराष्ट्रांतील अत्यंत अवघड किल्ल्यांपैकीं एक, असा रांगणा नांवाचा गडही येथून जवळच आहे. ह्या किल्ल्यावर चढण्याची वाट इतकी अवघड आहे, कीं कांहीं ठिकाणीं गुडघे टेकून रांगत जावें लागतें, म्हणून ह्याला 'रांगणा' असें नांव पडलें, असें म्हणतात. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं ह्या किल्ल्यावर आपलें टेहळणीपथक ठेवलें होतें. शत्रूची चाहूल लागतांच येथून इशारत दिली जाई. ती भुदरगडावरील किल्लेदाराला समजे. तेथून तो पन्हाळ्यावरील किल्लेदारापर्यंत इशारतीनेंच निरोप पोंचवी. गोवेंकर पोर्तुगीजांशीं संबंध ठेवण्यासाठीं शिवाजीमहाराजांना ह्या हणमंता घाटाचा उपयोग प्रामुख्यानें होई. पोर्तुगीजांकडून दारूगोळा व शस्त्रास्त्रें विकत घेतलीं जात, तीं ह्याच मार्गानें देशावर येत. मौनी महाराजांचें दर्शन घेऊन शिवाजीमहाराज ह्याच मार्गानें दक्षिण-दिग्विजयाला गेले होते. अशा प्रकारें हनुमंतें येथील ह्या घाटाला एक ऐतिहासिक महत्त्वही आहे. हा घाट फोडून मोटार-रस्ता झाल्यास कोकणांतील जनतेचा फार फायदा होईल. पंचवार्षिक योजनेंत ह्या घाटाचें काम पूर्ण झाल्यास, गारगोटी ते हनुमंतें ह्या भागांतील मागस जनतेच्या विकासाला खूप जोराची चालना मिळेल, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

# पूर्वेकडील रोम

गोवा म्हटलें, कीं कांहीं रसिक लोकांच्या डोळ्यांसमोर रम्य वनश्रीनें नटलेली चिंचोळी कोकणपट्टी उभी राहाते, तर कांहीं भक्त मंडळींचें मस्तक मंगेश-नागेशांच्या स्मरणानें नत होतें. गायनप्रेमी मंडळींच्या कानांत संगीताचे मधुर स्वर घुमूं लागतात तर कांहीं नाटक-वेड्या मंडळींच्या नजरेसमोर आवेशपूर्ण नाट्य-प्रसंग उभे राहातात. परंतु जगांतल्या व विशेषतः भारतांतल्या कॅथॉलिक किरिस्तांवांना तुम्ही विचाराल, तर ते सांगतील, कीं गोवा हें पूर्वेचें रोम आहे. तेथल्या खिस्तमंदिरांचें आणि मुख्यतः संत फ्रान्सिसच्या शवाचें दर्शन जन्मांत एकदा तरी घडावें, असें प्रत्येक कॅथॉलिकाला वाटतें. 'काशीस जावें नित्य वदावें' असें भाविक हिंदु म्हणतात. मुसलमानांना मक्केची ओढ असते. तशीच ओढ किरिस्तांवांना गोव्याची, पण ती साऱ्या गोव्याची नव्हे. ज्या ठिकाणीं भव्य खिस्त मंदिरें व संत फ्रान्सिसचें शव आहे, त्या जुन्या गोव्याची.

## ऐतिहासिक महत्त्व

विशाल व भव्य खिस्त मंदिरांसाठीं प्रख्यात असलेलें जुनें गोवें ( Velha Goa ) आज जरी वैराण व ओसाड दिसत असलें, तरी एके काळीं अत्यंत भरभराटीस आलेल्या शहरांपैकीं तें एक होतें, आणि त्या दृष्टीनें त्याचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

गोव्याची राजधानी असलेल्या पणजी ( ऊर्फ गोवा, ऊर्फ नवा गोवा ) शहराहून आपण मंगेशीला जाऊं लागलों, कीं वाटेंत सहा मैलांवर रस्त्याच्या दोहों बाजूंस असलेलीं प्रचंड खिस्त मंदिरें ( चर्च ) आपलें

लक्ष चटकन वेधून घेतात. बस थांबते आणि बहुसंख्य ख्रिस्ती उतारू खालीं उतरतात. आपणही तेथेंच उतरायचें, कारण तेंच जुनें गोवें.

हिंदु मंदिरांपेक्षां अगदीं उलट दृश्य येथें दिसतें. सभोवतीं नारळी-पोफळींच्या राया नाहींत, मंदिरापर्यंत दुतर्फा झाडें असलेले प्रशस्त मार्ग नाहींत, कारण तीं रस्त्यापासून दूर नसून, रस्त्याला लागूनच आहेत. रस्त्याच्या सपाटीवरच तीं असल्यामुळें, मंदिरापर्यंत पोंचण्यास पायऱ्या नाहींत, अथवा हिंदु मंदिरांभोवतीं अग्रशाळा-धर्मशाळा असल्यामुळें मंदिराला आपोआपच एक प्रकारचा बंदिस्त प्राकार लाभतो, तोही ह्या ख्रिस्त मंदिरांना लाभलेला नाहीं. हातपाय धुवून, शुचिर्भूत होऊन, मंदिरांत प्रवेश करण्याची कल्पनाच नसल्यामुळें, देवळासमोर असतात तशीं सुरम्य तळींही नाहींत. त्यामुळें जुन्या गोव्याच्या परिसरांत हिंडतांना आपण निसर्गाच्या लाडक्या गोमंतकांत नसून, देश भागांतील माळरानावरील एखाद्या ओसाड, भग्नावशेषांनीं युक्त अशा ऐतिहासिक स्थळीं आहोंत, असा पदोपदीं भास होतो आणि तो खराही असतो. त्यांत ऐतिहासिक तथ्यही असतें.

## आदिलशाहींतील शान

कारण जुनें गोवें हें एक अत्यंत जुनें असें शहर आहे. वस्तुतः ‘ आहे ’ म्हणण्याऐवजीं ‘ होतें ’ म्हटलें पाहिजे. कारण आतां तें एक सामान्य दर्जाचें खेडेंच उरलें आहे, पण एके काळीं तें राजधानीचें शहर होतें. हें शहर केव्हां वसविलें गेलें असावें, ह्याचें संशोधन अद्यापि झालेलें नाहीं. तरीही चौदाव्या शतकांतील मुसलमानी राजवटींत तेथें बरींच मुसलमान कुटुंबें राहात होतीं.

विजापूरच्या आदिलशहानें गोमंतक घेतल्यानंतर गोवें हीच आपली राजधानी केली. मांडवी नदीच्या तीरावर वसलेल्या ह्या शहराची रचना त्या वेळीं मोठी सुंदर व व्यवस्थित होती. शहराभोवतीं मोठा तट असून, त्याला चार दरवाजे होते. तटाच्या आंतला

आदिलशहाचा वाडाही मोठा भव्य व रुबाबदार होता, शानदार राजधानीला शोभेल असाच !

आदिलशाहींत ह्या शहराची चांगलीच भरभराट झाली. बाहेरच्या लोकांची, विशेषतः मुसलमानांची मोठी ये-जा सुरू झाली. राजाश्रयानें अनेक मुस्लिम कुटुंबें येऊन स्थायिक झालीं. व्यापारही खूप वाढला. त्या वेळीं 'गोवें शहराचें उत्पन्न आदिलशहाला एक लक्ष पार्दाव (सुमारें १ रुपया किंमतीचें चांदीचें नाणें.) येई.' असें इतिहासकार जुआंव-द-बार्‍हुस ह्यानें लिहून ठेवलें आहे.

पोर्तुगीजांनीं गोमंतकांत पाय रोवल्यानंतर इ. स. १५१० पासून जुनें गोवें हीच आपली राजधानी बनविली. त्यानंतर ह्या शहराची अधिकच भरभराट होत गेली. आदिलशाहाच्या अमदानींत येथील सरकारी गोदींत व्यापारी व लढाऊ जहाजें बांधण्यांत येत होतीं. पुढें पोर्तुगीजांनीं त्या गोदीची सुधारणा व वाढ करून तेथें शेकडों लढाऊ जहाजें बांधलीं. दारूगोळा, तोफा, इत्यादि बनविण्याचा मोठा कारखाना सुरू करून, त्यांचा मोठा व्यापार चालू केला. मराठे, दक्षिणी मुसलमान व दिल्लीकर मोगल, हीं सारींच गिर्‍हाइकें त्यांना उपलब्ध असल्यामुळें, त्यांचा व्यापार किती जोरांत चालत असेल, ह्याची कल्पना येऊं शकते. गोवें शहराची लोकसंख्या त्या वेळीं चार ते सहा लाख होती. त्यावरूनही गोव्याच्या भरभराटीची कल्पना यावी.

पोर्तुगीजांनीं गोवें बंदराचाही खूप विकास केला. ह्या बंदरांत देशोदेशींचीं जहाजें नाना प्रकारचा माल घेऊन येत. जपानहून चांदीनें भरलेलीं जहाजें येत, चीनहून सोनें, रेशीम, वगैरे माल येई. मलायाहून लवंगा, बंगालहून उंची तलम कापड, सिलोनहून दालचिनी व जवाहीर, मलबारहून मिरीं-सुंठ, अरबस्तानांतून घोडे, आफ्रिका, ओर्मूज, दीव, मदुरा, खंबायत, वगैरे नाना प्रदेशांतून अनेक वस्तु येत. गोव्याच्या बंदरांत त्या वेळीं जवळजवळ अर्ध्या जगांतील व्यापारी जहाजांची रहदारी चालू असे.

## जुन्या वैभवांचा अवशेष :

आज त्या वैभवाची पुसटती साक्ष देणारी एक मोडकी कमान आहे. वास्को-डी-गामाचा नातू दो फ्रान्सिस्कु ह्याच्या आज्ञेवरून इ. स. १५५९ सालीं बांधलेली. हिच्या वरच्या बाजूस एका कोनाड्यांत सेंट कॅथेरिनची मूर्ति असून, खालीं वास्को-डी-गामाचा पुतळा आहे. तिला व्हाइसरॉयची कमान म्हणतात, मुंबईच्या 'गेट वे ऑफ इंडिया' सारखी ! अर्थात् त्या दोहोंची तुलनाही करतां येणार नाहीं. कोठें राजा भोज, कोठें गंगू तेली ! यौवनानें मुसमुसलेल्या व संपन्नतेनें बहरलेल्या राणीसमोर कंबरेंत वाकलेली एक जख्ख म्हातारी भिकारीण ! परंतु कधींकाळीं ह्याच कमानींतून आपल्या वैभवानें भोवतालच्या लोकांचे डोळे दिपवून टाकीत, राजेशाही दिमाखानें व रुबाबांत गोव्याचा गोरा व्हाइसरॉय अधिकारसूत्रें घेण्यासाठीं प्रवेश करीत होता, हें ज्यांना माहीत असतें, त्यांच्या डोळ्यांसमोरून आजची दैन्यावस्था क्षणभर लोप पावून, तो वैभवसंपन्न काळ तरळून गेल्याशिवाय राहात नाहीं. मांडवीचें पात्रही आतां ह्या कमानीपासून बरेंच दूर गेलें आहे. शतकांच्या गाळानें तें भरून गेलें असावें. तेथें एखादी दरिद्री होडी रेंगाळत इकडून तिकडे जातांना आपल्याला दिसते, तेव्हां आपलें मन तिच्या जागीं सोन्या-चांदीनें व हिरे-माणकांनीं भरलेलीं प्रचंड व्यापारी जहाजें पाहाण्याचा प्रयत्न करूं लागतें.

दर्यावर्दी, विलासी व रंगेल पोर्तुगीजांनीं ह्या शहरावर प्रेमही तसेंच केलें. त्यांनीं पोर्तुगालहून अत्यंत कुशल शिल्पकार व स्थापत्यविशारद आणले व त्यांच्याकडून इंद्रपुरीला लाजवतील अशा सुंदर इमारती बांधविल्या. शहराची रचना युरोपीय शहरासारखी ठेवली. प्रत्येक घरासमोर बाग असलीच पाहिजे, असा सक्त नियम केला आणि आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका, वगैरे खंडांतून नाना प्रकारचीं फुलझाडें व फळझाडें आणून, तीं ह्या बागांतून लावण्याची व्यवस्था केली. त्यामुळें गोवें शहराला एखाद्या पाश्चात्य शहराची शोभा

प्राप्त झाली. पोर्तुगीज कारागिरांच्या कौशल्यामुळें गोवें हें भारतांतील लिस्बन ( लिज्ब्रोअ ) आहे, असाच पाहाणाऱ्याला भास होई आणि पोर्तुगालहून आलेल्या मंडळींना आपण लिस्बनमध्येंच आहोंत, असें वाटे.

पणजी हें बंदर मांडवीच्या मुखाशीं असल्यामुळें गोवा बंदरापेक्षां अधिक सोयीचें होतें. म्हणून पोर्तुगीजांनीं १ डिसेंबर, १७५९ रोजीं गोमंतकाची राजधानी गोव्याहून हलवून पणजीस नेली. ह्या साऱ्या बंदराला त्यांनीं नवें गोवें ( Nova Goa ) असें नांव दिलें. पणजी हें त्या शहराच्या मुख्य वाड्याचें किंवा खेड्याचें नांव. इ. स. १७७४ सालीं जुन्या गोव्यांतून प्रमुख श्रीमंत कुटुंबें बाहेर पडलीं. शहर ओस पडूं लागलें. तेव्हां सरकारनें कोमुनिदादींना ( ग्रामसभांना ) शहर पुनः वसविण्यासाठीं सुमारें आठ लाख अशर्फ्या खर्च करायला लावलें. परंतु त्याचा कांहींही उपयोग न होतां, इ. स. १८०३ पर्यंत जुनें गोवें जवळ जवळ पूर्णपणें मोडून गेलें. व्यक्ति व घराणें ह्यांच्याप्रमाणें शहराच्या जीवनांतील चढउतारही मोठा विचित्र असतो, हेंच खरें !

## रोमन कारागिरीची 'झलक'

रोमन शिल्पकला व वास्तुकला ह्यांची किंचित् झलक तुम्हांला पाहायची असेल, तर तुम्हांला गोव्यालाच गेलें पाहिजे. तेथील सुखवस्तु ख्रिस्ती लोकांच्या घरांवर आजही रोमन कारागिरीची छाप पाहायला मिळते. जुनें गोवें येथें पोर्तुगीज कारागिरांनीं बांधलेल्या सां कायतान, बों जेजूस, सांत आगोस्तीन, से पात्रिआर्काल (Se Patriarcal किंवा The See Cathedral ), पालासियु-द-इंकिझीसांव, पालासियु-द-व्हिसेरैय् (व्हाइसरॉयचा वाडा), वगैरे इमारती विशेष प्रसिद्ध होत्या. त्यांपैकीं चार-पांच आजही उभ्या आहेत आणि जुन्या गोव्याला जाणारा मुशाफीर मुख्यतः ह्याच इमारती पाहाण्यासाठीं जात असतो. ह्यांपैकीं सां कायतानची ( ह्याचें स्पेलिंग St. Cajetan असें करतात. St. Caetano असेंही केलें जातें. ) इमारत रोमच्या सां पेद्र चर्चच्या

धर्तीवर आहे, असें म्हणतात. अर्थात् आम्हीं रोमचें मशारनिल्हे चर्च पाहिलेलें नसल्यामुळें, सां कायतानवरून सां पेद्रची कल्पना करून घेतली.

## मशिदीच्या जागीं कॅथीड्रल

रस्त्याला लागूनच असलेलें सुमारें १५० फूट उंचीचें भव्य ख्रिस्त मंदिर आपलें लक्ष चटकन् वेधून घेतें. ह्यालाच से पात्रिआर्काल किंवा सी कॅथीड्रल अशीं नांवें आहेत. गोव्यांत आलेला पहिला पोर्तुगीज सेनापति आफोन्स द अल्बुकर्क ह्यानें एक मशीद जमीनदोस्त करून, तिच्यावर १५१० सालीं हें चर्च बांधायला सुरुवात केली व सुमारें २३ वर्षांनीं तें पूर्ण झालें. सेंट कॅथेरीन, सेंट पीटर व मेरी माता ह्यांच्या भव्य मूर्ति ह्यांत आहेत. ह्या चर्चची घंटा 'सेंट पीटरची घंटा' किंवा 'सोनेरी घंटा' ह्या नांवानें प्रसिद्ध असून, ती गोव्यांतच कुंकळ्ळीला तयार करण्यांत आलेली आहे. ती खूप मोठी असून, जगांतील उत्कृष्ट घंटांमध्यें तिची गणना होते. ह्या चर्चमधील ऑर्गन गोव्यांतील सर्वांत मोठें वाद्ययंत्र आहे. गोव्यांतील सर्वांत जुनें व सर्वांत मोठें चर्च म्हणूनही ह्याचें महत्त्व आहे. ह्याच्यासारखेंच दुसरें भव्य चर्च सेंट फ्रान्सिस असीसी (Assisi किंवा Assiz) हेंही प्रेक्षणीय आहे.

## एका शूर महाकवीचा पुतळा

से पात्रिआर्कालची आठवण कायम केली, ती त्याच्यासमोर उभ्या असलेल्या एका पूर्णाकृति प्रचंड पुतळ्यानें. त्याच्याकडे पाहिल्यानंतर असें वाटतें, कीं मध्ययुगांत होऊन गेलेल्या एखाद्या युरोपियन योद्ध्याचा किंवा सत्ताधाऱ्याचा तो पुतळा असावा. परंतु वस्तुतः तो आहे एका शूर महाकवीचा. पोर्तुगीज भाषेंतील 'लुझीयद्श्' हें महाकाव्य लिहून अमर झालेल्या लुईश-द-कामोंइश्चा! लिस्बन शहरांत १५२४ मध्यें जन्मलेल्या व तेथेंच १० जून, १५८० रोजीं

निधन पावलेल्या ह्या वीराचें जीवन जसें अद्भुत, तसेंच हालअपेष्टांनीं भरलेलें होतें. एका हातांत लेखणी व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन, शेवटपर्यंत मातृभूमीसाठीं झुंजत राहिलेला असा महाकवि जगाच्या इतिहासांत बहुधा विरळाच. कोईंब्रा शहरांतील इतिहासप्रसिद्ध विश्वविद्यालयांत शिक्षण घेतल्यानंतर, कामोंइश आफ्रिकेंतील मूर लोकांशीं लढण्यासाठीं पोर्तुगीज सैन्याबरोबर तिकडे गेला. तेथील लढाईंत त्याचा एक डोळा जाऊन, तो एकाक्ष बनला. त्यानंतर १५५३ सालीं गोव्यांत आला. त्या वेळचे पोर्तुगीज अधिकारी अत्यंत बेताल होऊन वागत होते. त्यांचीं कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणण्यासाठीं कामोंइश्‌नें आपली लेखणी चालविली. त्यामुळें तत्कालीन गव्हर्नरची त्याच्यावर इतराजी होऊन, त्याला चीन देशांतील माकाव ह्या पोर्तुगीज प्रदेशांत १५५६ सालीं हद्दपार करण्यांत आलें.

माकाव येथील समुद्रकिनाऱ्यावरील एका निवान्त गुंफेंत बसून, त्यानें 'लुझीयदश्' ह्या आपल्या महाकाव्याचा बराच भाग लिहून काढला. पुढें त्याची शिक्षा रद्द होऊन, त्याला गोव्याला आणण्यांत येत असतां, मेकांग नदीच्या मुखाजवळ त्याचें जहाज फुटलें. त्या वेळीं कामोंइश एका हातांत 'लुझीयदश्' ची प्रत धरून, दुसऱ्या हातानें पाणी तोडीत, मोठ्या प्रयासानें किनाऱ्याला पोंचला. त्यानंतर गोव्यांत व आफ्रिकेंत कांहीं वर्षें हालांत व विपत्तींत काढून, तो मायभूमीला परतला. दोन वर्षें खपून, त्यानें आपल्या महाकाव्यावरून हात फिरविला व १५७२ सालीं तें प्रसिद्ध केलें. पोर्तुगालच्या राष्ट्रीय वीरांनीं वेळोवेळीं केलेल्या शूर कृत्यांचें, विशेषतः गामानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला त्या कामगिरीचें वर्णन, हा ह्या काव्याचा मुख्य विषय असून, अधून-मधून सुंदर अद्भुत कथांचा त्यानें वापर केला आहे. जगांतील सर्वश्रेष्ठ सात महाकाव्यांत ह्या 'लुझीयदश्' ची गणना केली जाते, ह्यावरून त्याच्या थोरवीची कल्पना येईल. ह्या महाकाव्यानें कामोंइशला कीर्ति मिळाली, परंतु त्याचें दारिद्र्य तसेंच राहिलें. अन्यायाविरुद्ध

धर्तीवर आहे, असें म्हणतात. अर्थात् आम्हीं रोमचें मशारनिल्हे चर्च पाहिलेलें नसल्यामुळें, सां कायतानवरून सां पेद्रची कल्पना करून घेतली.

## मशिदीच्या जागीं कॅथीड्रल

रस्त्याला लागूनच असलेलें सुमारें १५० फूट उंचीचें भव्य ख्रिस्त मंदिर आपलें लक्ष चटकन् वेधून घेतें. ह्यालाच से पात्रिआर्काल किंवा सी कॅथीड्रल अशीं नांवें आहेत. गोव्यांत आलेला पहिला पोर्तुगीज सेनापति आफोन्स द अल्बुकर्क ह्यानें एक मशीद जमीनदोस्त करून, तिच्यावर १५१० सालीं हें चर्च बांधायला सुरुवात केली व सुमारें २३ वर्षांनीं तें पूर्ण झालें. सेंट कॅथेरीन, सेंट पीटर व मेरी माता ह्यांच्या भव्य मूर्ति ह्यांत आहेत. ह्या चर्चची घंटा 'सेंट पीटरची घंटा' किंवा 'सोनेरी घंटा' ह्या नांवानें प्रसिद्ध असून, ती गोव्यांतच कुंकळ्ळीला तयार करण्यांत आलेली आहे. ती खूप मोठी असून, जगांतील उत्कृष्ट घंटांमध्यें तिची गणना होते. ह्या चर्चमधील ऑर्गन गोव्यांतील सर्वांत मोठें वाद्ययंत्र आहे. गोव्यांतील सर्वांत जुनें व सर्वांत मोटें चर्च म्हणूनही ह्याचें महत्त्व आहे. ह्याच्यासारखेंच दुसरें भव्य चर्च सेंट फ्रान्सिस असीसी (Assisi किंवा Assiz) हेंही प्रेक्षणीय आहे.

## एका शूर महाकवीचा पुतळा

से पात्रिआर्कालची आठवण कायम केली, ती त्याच्यासमोर उभ्या असलेल्या एका पूर्णाकृति प्रचंड पुतळ्यानें. त्याच्याकडे पाहिल्यानंतर असें वाटतें, कीं मध्ययुगांत होऊन गेलेल्या एखाद्या युरोपियन योद्धयाचा किंवा सत्ताधाऱ्याचा तो पुतळा असावा. परंतु वस्तुतः तो आहे एका शूर महाकवीचा. पोर्तुगीज भाषेंतील 'लुझीयदश्' हें महाकाव्य लिहून अमर झालेल्या लुईश-द-कामोंइश्चा! लिस्बन शहरांत १५२४ मध्यें जन्मलेल्या व तेथेंच १० जून, १५८० रोजीं

निधन पावलेल्या ह्या वीराचें जीवन जसें अद्भुत, तसेंच हालअपेष्टांनीं भरलेलें होतें. एका हातांत लेखणी व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन, शेवटपर्यंत मातृभूमीसाठीं झुंजत राहिलेला असा महाकवि जगाच्या इतिहासांत बहुधा विरळाच. कोईंब्रा शहरांतील इतिहासप्रसिद्ध विश्वविद्यालयांत शिक्षण घेतल्यानंतर, कामोंइश आफ्रिकेंतील मूर लोकांशीं लढण्यासाठीं पोर्तुगीज सैन्याबरोबर तिकडे गेला. तेथील लढाईंत त्याचा एक डोळा जाऊन, तो एकाक्ष बनला. त्यानंतर १५५३ सालीं गोव्यांत आला. त्या वेळचे पोर्तुगीज अधिकारी अत्यंत बेताल होऊन वागत होते. त्यांचीं कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणण्यासाठीं कामोंइश्नें आपली लेखणी चालविली. त्यामुळें तत्कालीन गव्हर्नरची त्याच्यावर इतराजी होऊन, त्याला चीन देशांतील माकाव ह्या पोर्तुगीज प्रदेशांत १५५६ सालीं हद्दपार करण्यांत आलें.

माकाव येथील समुद्रकिनाऱ्यावरील एका निवान्त गुंफेंत बसून, त्यानें 'लुझीयदश्' ह्या आपल्या महाकाव्याचा बराच भाग लिहून काढला. पुढें त्याची शिक्षा रद्द होऊन, त्याला गोव्याला आणण्यांत येत असतां, मेकांग नदीच्या मुखाजवळ त्याचें जहाज फुटलें. त्या वेळीं कामोंइश एका हातांत 'लुझीयदश्' ची प्रत धरून, दुसऱ्या हातानें पाणी तोडीत, मोठ्या प्रयासानें किनाऱ्याला पोंचला. त्यानंतर गोव्यांत व आफ्रिकेंत कांहीं वर्षे हालांत व विपत्तींत काढून, तो मायभूमीला परतला. दोन वर्षे खपून, त्यानें आपल्या महाकाव्यावरून हात फिरविला व १५७२ सालीं तें प्रसिद्ध केलें. पोर्तुगालच्या राष्ट्रीय वीरांनीं वेळोवेळीं केलेल्या शूर कृत्यांचें, विशेषतः गामानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला त्या कामगिरीचें वर्णन, हा ह्या काव्याचा मुख्य विषय असून, अधून-मधून सुंदर अद्भुत कथांचा त्यानें वापर केला आहे. जगांतील सर्वश्रेष्ठ सात महाकाव्यांत ह्या 'लुझीयदश्' ची गणना केली जाते, ह्यावरून त्याच्या थोरवीची कल्पना येईल. ह्या महाकाव्यानें कामोंइशला कीर्ति मिळाली, परंतु त्याचें दारिद्र्य तसेंच राहिलें. अन्यायाविरुद्ध

झगडणाऱ्यांच्या नशिबीं असणारी कंगाल स्थिति त्यालाच कशी चुकणार ?

आपल्या एका महाकवीचें कायमचें स्मारक उभारून, कलेची कदर करण्यांत, आपण भारतीयांहून वरचढ आहांत, हेंच पोर्तुगीजांनीं सिद्ध केलें होतें, असा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं !

## सां फ्रान्सिस्कु शाव्हियेरची शवपेटी

आम्हांला खरें औत्सुक्य होतें सेंट फ्रान्सिस झेवियरची शवपेटी पाहाण्याचें. ह्या शवपेटीचें दर्शन घेण्यास भारतांतीलच नव्हे, तर जगांतील भाविक कॅथॉलिक गोव्याला येतात. ( सेंट फ्रान्सिस झेवियरचा पोर्तुगीज उच्चार ' सां फ्रान्सिस्कु शाव्हियेर ' असा आहे. ) ही चांदीची शवपेटी बों जेजूस (Bon jesus-Good Jesus भला येशू ) ह्या ख्रिस्त मंदिरांत आहे.

ह्या ख्रिस्त मंदिराची पाठ रस्त्याकडे आहे. त्या बाजूनें इमारतीला आधार देण्यासाठीं उभारलेल्या नुसत्या चार-पांच फूट रुंदीच्या उंच भिंतीकडे आपली नजर जाते आणि हें स्थापत्य वेगळें आहे, भारतीय नाहीं, ह्याची कल्पना आपणाला येते. मंदिराला वळसा घालून, आपण त्याच्या दरवाजांत प्रविष्ट होतों, आंत नजर फेकतों, तेव्हां त्याच्या अंतर्भागांतील भव्यतेनें आपण क्षणांत भारावून जातों.

भव्य दरवाजांतून आम्हीं आंत प्रवेश केला. तेथील वातावरण मोठें शांत, गंभीर व भक्तीनें भारावलेलें होतें. भ्रमराच्या गुंजारवासारख्या आवाजांत प्रार्थना सुरू होती. दारावरच्या पहारेकऱ्याला आम्हीं विचारलें, " आम्हांला आंत जायला कांहीं हरकत नाहीं ना ? " तो म्हणाला, " कांहींच हरकत नाहीं. "

आम्ही आंत जाऊं लागलों. माझ्या पादत्राणांना नाल मारलेले असल्यामुळें त्यांचा खाड् खाड् आवाज त्या प्रचंड मंदिरांत घुमूं लागला. त्या शांत वातावरणांत तो आवाज माझ्याच कानांना खटकला.

म्हणून मीं मागें वळून पायांतील स्लिपर्स काढूं लागलों, त्याबरोबर जणूं कांहींतरी 'अब्रह्मण्यम्' घडत आहे, असा भाव चेहऱ्यावर आणून, तो पहारेकरी मला म्हणाला, "छेः ! छेः ! असं करूं नका. ह्या मंदिरांत अनवाणी पायांनीं प्रवेश करणं निषिद्ध आहे."

तो नियम मला मोठा चमत्कारिक वाटला. हा नियम फक्त गोव्यांतील ख्रिस्त मंदिरांतच आहे, कीं भारतांतील इतर चर्चमध्येंही असाच नियम आहे, ह्याची मला कल्पना नाहीं. बहुधा गोमंतकांतील ख्रिस्त मंदिरांतच हा नियम असावा. पोर्तुगीजांनीं गोमंतकीय ख्रिश्चनांना अभारतीय बनविण्यासाठीं योजिलेल्या उपायांपैकीं तो एक असावा. वस्तुतः भारतासारख्या उकाड्याच्या प्रदेशांतील प्रार्थना-मंदिरांत दक्षिणेंतील मंदिरांप्रमाणें उघड्या अंगानें व अनवाणी पायांनींच प्रवेश करण्याची प्रथा असणें योग्य, मग तें प्रार्थना-मंदिर किरिस्तांवांचें असो, मुसलमानांचें असो, कीं पारशांचें असो. मंदिराच्या दारांत शिखांच्या गुरुद्वाराप्रमाणें पाय धुण्याची व्यवस्था असेल, तर अस्वच्छ पावलांनीं कोणी मंदिरांत प्रवेश करणार नाहीं व मंदिराचें पावित्र्य कायम राहील.

माझ्यासमोर मोठें धर्मसंकट उभें राहिलें. पायांतील पादत्राणें तशींच ठेवून आंत जावें, तर नालांच्या आवाजानें प्रार्थना करणाऱ्यांच्या एकाग्रतेंत व्यत्यय येणार आणि पादत्राणांशिवाय आंत प्रवेश मिळणार नाहीं. अखेर आम्ही परत फिरलों आणि त्या मंडळींची प्रार्थना संपेपर्यंत जवळपासचीं सां कायतान, वगैरे इतर ख्रिस्त मंदिरें पाहून घेतलीं.

थोड्या वेळानंतर परत आलों, त्या वेळीं भक्त मंडळी प्रार्थना संपवून परत चालली होती. आम्हीं अगदीं आंत प्रवेश करून, समोरची नक्षीकाम केलेली चांदीची शवपेटी पाहिली. भारतांत हिरीरीनें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारा संत फ्रान्सिस्कु शाव्हियरे ह्याचें शव आजही त्या पेटींत आहे. दर बारा वर्षांनीं किंवा विशेष संकटप्रसंगीं ही

शवपेटी शवदर्शनासाठीं उघडण्यांत येते. गोवा-मुक्तीच्या वेळीं भारतीय फौजा गोव्याच्या सरहद्दीवर गोळा झाल्या असतां, ही शवपेटी उघडण्यांत आली होती. गोव्याचा गव्हर्नर, मुख्य पाद्री व स्थानिक अधिकारी ह्यांच्याजवळ प्रत्येकीं एकेक चावी असे व त्या तीन चाव्यांनीं ही पेटी उघडली जात असे. ३ डिसेंबर हा सेंट फ्रान्सिस झेवियरचा मृत्युदिन. त्या दिवशी तेथें मोठी जत्रा भरते.

## अंगुष्ठमात्र दर्शन

चीन-जपानपर्यंत प्रभु येशूचा संदेश घेऊन गेलेल्या संत फ्रान्सिस झेवियरला चीनमध्यें धर्मप्रचार करीत असतां मृत्यु आला. त्याच्या भक्तांनीं त्याचें शव भारतांत आणून, चांदीनें मढविलेल्या शवपेटींत ठेवलें आणि त्यावर इ. स. १५९४ सालीं हें चर्च उभारण्यास सुरुवात केली. तें १६०५ सालीं बांधून पुरें झालें. ह्या चर्चच्या मध्यभागाचें क्षेत्रफळ १६६×५० चौरस फूट असून, उंची ५८ फूट आहे. त्याला समोरच्या बाजूस ( पश्चिमेस ) तीन दरवाजे असून, त्याच्या खिडक्याही मोठ्या भव्य व रुबाबदार आहेत. सेंट फ्रान्सिसची शवपेटी फ्लोरेन्टाइन ( Florentine ) पद्धतीची असून, आग्र्याच्या ताजमहालांतील नूरजहानच्या कबरीशीं सौंदर्याच्या बाबतींत तिची तुलना केली जाते. ही पेटी तांब्याची असून, तिच्यावर सोन्या-चांदीचें नक्षीकाम केलेलें आहे मौल्यवान रत्नांचें जडावाचें कामही त्यावर आहे. विविध रंगांच्या चौकोनी संग-मरवरी चबुतऱ्यावर ती ठेवलेली आहे. तिच्यावर सेंट फ्रान्सिसच्या जीवनांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग उठावदार नक्षीच्या पद्धतीनें ( Basreliefs ) अंकित केले आहेत. पेटीच्या मागील वेदीवर सेंट फ्रान्सिसचा चार फूट उंचीचा पूर्णाकृति पुतळा असून, त्याच्या उजव्या हातांत क्रूस व डाव्या हातांत अधिकारदंड ( Baton ) आहे. हा पुतळा संपूर्ण चांदीचा असून, तो इ. स. १६७० सालीं उर्बानो डूराझो ( Urbano Durazo) ची विधवा पत्नी Genoese Lady हिनें स्वखर्चानें

तयार करविला होता. पुतळ्याच्या मस्तकावर सोनेरी मुगूट असून, त्यांत रत्नें जडविलेलीं आहेत. १६८३ सालीं छत्रपति संभाजीमहाराजांनीं गोव्यावर स्वारी केली असतां, गोवा आतां वांचत नाहीं हें पाहून, त्या वेळचा व्हाइसरॉय काउंट ऑफ आलवोर ( Alvor ) ह्यानें आपल्या राजसत्तेचें प्रतीक असलेला राजदंड सेंट फ्रान्सिसच्या मूर्तीच्या हातीं देऊन, गोव्याच्या रक्षणाचा भार त्या संतावर सोपविला. तेव्हांपासून गोव्यांत गव्हर्नर जनरल म्हणून येणारा प्रत्येकजण सेंट फ्रान्सिसच्या ह्या मूर्तीच्या हातून आपला राजदंड घेत असे. पुढें कालान्तरानें ही प्रथा आपोआप बंद पडली. अशा प्रकारें ह्या ख्रिस्त मंदिराचें ऐतिहासिक महत्त्वही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सुमारें चार-साडेचार फूट लांबीच्या ह्या शवपेटींत झेवियरचा संपूर्ण देह कसा काय मावतो, ह्याचें कुतूहल वाटून, मीं तेथील एका जबाबदार गृहस्थाला त्याविषयीं विचारलें, तेव्हां त्यानें सांगितलें, " संत फ्रान्सिस्कु मूळचाच टेंगणा होता, त्यांत पुनः मृत्यूनंतर त्याचं शरीर खूप आकसलं, त्यामुळें तें एवढ्याशा पेटीत मावतं. "

संताचें संपूर्ण शरीर जरी पाहायला मिळालें नाहीं, तरी त्याच्या उजव्या पायाचें तिसरें बोट पाहायला मिळतें, असें समजल्यावरून, आम्हीं तें पाहाण्याची इच्छा प्रदर्शित केली आणि ती मोठ्या तत्परतेनें पुरी केली गेली. उजव्या बाजूस असलेल्या एका छोट्याशा हॉलमध्यें † अनेक कड्या-कुलुपांच्या बंदोबस्तांत ठेवलेल्या त्या बोटाचें दर्शन आम्हांला त्वरित घडलें. जुन्या काळच्या न्हाव्यांकडे लाकडी दांडा असलेला आयना ( आरसा ) असे, तशा प्रकारच्या एका आयन्यांत ( monstrance ) तें बोट बसविलेलें आहे. अर्थात् तेंही वाळून गेल्यामुळें लहानच दिसतें. चीनमध्यें मृत्यूनंतर जंगलांतील कोल्ह्यांनीं

† ह्या खोलीला ' Vestry धर्मोपदेशकाची वस्त्रें, वगैरे ठेवण्याची चर्चच्या बाजूची खोली ' असें म्हणतात. पौर्वात्य देशांतील अत्युत्कृष्ट वस्त्रागारांत तिची गणना होते.

तें बोट तोडून काढलें होतें,* तें तसेंच इकडे आणण्यांत आलें व संपूर्ण शवाऐवजीं दर्शनार्थ ठेवण्यांत आलें. आम्हीं आमच्या पद्धतीप्रमाणें हात जोडून त्याला नमस्कार केला व संताबद्दलचा आदर व्यक्त केला. त्या गृहस्थानें मात्र खास पाश्चात्य पद्धतीनें त्या आयन्याचें तीनदा चुंबन घेऊन, मगच तो आंत ठेवला. थोर पुरुषांच्या शरिरांचे अवयव जपून ठेवण्याची ही प्रथा बौद्ध धर्मांतही आहे. भगवान बुद्धांच्या दांतांचें जतन अनेक ठिकाणीं केलेलं आहे. हजरत मुहंमदसाहेबांच्या दाढीचा केस हजरत बाल ह्या ठिकाणीं श्रीनगर (काश्मीर) मध्यें ठेवण्यांत आलेला आहे. मानवी मनांतील भक्तिभावना ह्या मार्गांनीं व्यक्त होत असते, हेंच खरें.

## 'कॅसा प्रोफेसा' ची ऐतिहासिक इमारत

बों जेझूसला लागूनच कॅसा प्रोफेसाची (Casa Professa or Professed House) ऐतिहासिक इमारत आहे. ज्यांनीं आपलें जीवन धर्मप्रसाराला वाहिलें आहे, अशा जेझुइट लोकांसाठीं ही इमारत इ. स. १५८५ सालीं बांधण्यांत आली. गोव्यांत जेझुइटांनीं धर्मप्रसाराच्या नांवाखालीं जे अत्याचार व क्रूर कर्में केलीं, त्यांचें संचालन ह्या इमारतींतून झालें. त्या दृष्टीनें ही उल्लेखनीय आहे. सध्या येथें एक पुराण-वस्तु-संग्रहालय (म्यूझियम) असून, त्यांत सेंट फ्रान्सिस झेवियरचा चांदीचा पुतळा व धर्मसमीक्षणाचें प्रार्थना-पुस्तक (a missal of the Holy Inquisition) आहे.

## प्रचंड चित्रें

सां कायतान व बों जेझूस ह्या ख्रिस्त मंदिरांतील प्रचंड चित्रें व लहान-मोठ्या मूर्ति हें एक महत्त्वाचें आकर्षण म्हटलें पाहिजे. हीं चित्रें ख्रिस्त जीवनावर आधारलेलीं आहेत. पंधरा-वीस फूट उंचीचीं तीं

* ही झाली दंतकथा. ऐतिहासिक घटना अशी आहे, कीं १८५९ सालीं लोकांच्या दर्शनार्थ शव बाहेर काढलें असतां, हें बोट गळून पडलें होतें.

चित्रें पाहातांना त्यांची भव्यता खचितच जाणवते. जाणकारांचें म्हणणें असें, कीं "व्हॅटिकन* मधल्या मंदिरांतलें नाजूक शिल्प वा चित्र जुन्या गोव्यांतील ह्या प्रचंड मंदिरांत दिसत नाहीं. येथें प्रचंड शिल्पांची भव्यता जाणवते, पण नाजूकपणा मात्र आढळत नाहीं." मला वाटतें, शिल्पांतील किंवा चित्रांतील नाजूकपणाचें मर्म जाणणारी जनता येथें नसल्यामुळें, तिच्यावर भव्यतेची छाप पडावी ह्या हेतूनेंच मूळ प्रवर्तकांनीं ही योजना आखली असावी आणि त्यांचा हेतु साध्यही झाला असला पाहिजे. कारण भक्तिभावानें एखाद्या ठिकाणीं जमणाऱ्या सर्वसामान्य लोकांवर प्रचंडपणाचा जेवढा परिणाम होतो, तेवढा नाजूक कलाकुसरीचा होत नाहीं, असा अनुभव आहे. हिंदु-मुस्लिम प्रार्थना-मंदिरांतही हा उपाय योजिण्यांत आला असल्याचें आपल्याला आढळतें.

## शिवमंदिराचें ख्रिस्त मंदिर

बॉं जेझूसमधून पहिल्या खेपेस बाहेर पडतांना तेथील पहारेकरी म्हणाला होता, "नदीच्या बाजूला एक महादेवाचं देऊळ आहे, तें पाहून घ्या." मला जरा आश्चर्य वाटलें. एके काळीं 'इन्क्विझिशन'-(धर्मच्छळा)चें केंद्र असलेल्या ह्या नगरींत हिंदूंचें देऊळ कसें राहिलें? परंतु नंतर समजलें, कीं पूर्वीं तेथें शिव-मंदिर होतें, परंतु नंतर त्याचें ख्रिस्त मंदिरांत रूपान्तर करण्यांत आलें आहे. पूर्वीं कित्येक वर्षेंपर्यंत त्या चर्चवर क्रॉस टिकत नसे. मंदिरांतून महादेव हलविला, तरी त्याचें सामर्थ्य हललें नव्हतें. तो तेथें क्रूस टिकूं देत नसे. चढविला कीं खालीं पाडीत असे. परंतु आम्हीं पाहिलें, त्या वेळीं त्यावर क्रूस होता. त्या ख्रिस्त मंदिराच्या एका भागांत हिंदु मूर्ति सांठवून ठेवण्यांत आल्या आहेत, असें कळलें, परंतु त्या मंदिराला कुलूप असल्यामुळें त्याचा खरेंखोटेंपणा पडताळून पाहातां आला नाहीं. वर उल्लेखिलेली

* रोम (इटली) जवळील पोपनगरींतील पोपचा वाडा.

मांडवीच्या तीरावरील व्हाइसरॉयची कमान येथून जवळच आहे. व्हास्कु-द-गामानें ( वास्को-डी-गामा ) येथून गोव्यांत प्रवेश केला होता, असें ऐकलें, परंतु त्यांत ऐतिहासिक तथ्य नसावें. कारण व्हास्कु-द-गामा केरळमध्यें कालिकत बंदरांत उतरला होता. बहुधा १५१० सालीं गोवा शहरांत प्रवेश करणारा व्हाइसरॉय आफोंसु-द-आल्बुकर्क हाच पहिला पोर्तुगीज येथून गोव्यांत आला असावा.

## ह्यांचें जतन झालें पाहिजे

जुन्या गोव्यांतील ख्रिस्त-मंदिरें, व्हाइसरॉयची कमान व लुईश-द-कामोंईशचा पुतळा, वगैरे पाहिल्यानंतर माझ्या मनांत असा विचार आला, कीं ह्या साऱ्याचें नीट जतन झालें पाहिजे. पोर्तुगीजांनीं आपल्या परीनें गोव्याच्या विकासासाठीं जे प्रयत्न केले, त्यांतील कलेशीं संबंधित प्रयत्नांची आठवण बुजूं देतां कामा नये. त्यांनीं बांधलेल्या डांबरी सडका जर आपण उखडून न टाकतां वापरतों, तर त्यांनीं बांधलेलीं ख्रिस्त मंदिरेंही कां राहूं नयेत ? उलट त्यांच्या रक्षणाची उत्तम तरतूद झाली पाहिजे. बॉं जेझूसच्या मागील भिंतीवर गवत व झाडेंझुडपें वाढलेलीं आहेत, तीं काढून, तो भाग लख्ख केला पाहिजे. ख्रिस्ती राज्यकर्त्यांनीं पूर्वीं कितीही अत्याचार केले असले, तरी आतां त्यांचा विचार मनांतून काढून टाकून, त्यांनीं मागें ठेवलेल्या चांगल्या गोष्टीच नव्या पिढीपुढें आल्या पाहिजेत. ‘ गोव्याचें वेगळें व्यक्तिमत्व कायम ठेवलें जाईल ’ असें आश्वासन पंडित जवाहरलाल नेहरूंनीं जेव्हां दिलें, तेव्हां त्यांच्या मनांतही बहुधा हाच विचार असला पाहिजे !

स मा प्त

REFBK 0017698

REFBK-0017698

भारताच्या भावनात्मक ऐक्याला
हातभार लावावा हा हे
भ्रमण-लेख लिहिण्यामागील एक हेतु.
आपण सारा भारत
एक असल्याचें बोलतों खरें,
परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश
व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं
आपल्याला किती थोडी माहिती असते ?
ही माहिती नसेल, तर आपण
आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार ?
अशी माहिती आपल्या वाचकांना
मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर
हिंडतांना जें निरीक्षण केलें,
त्याचें चित्र ह्या भ्रमण-लेखांतून दिसेल.

'भ्रमणा' च्या वाचनानें भारताची
व भारतीय लोकसमूहांची
थोडीबहुत ओळख व्हावी आणि
भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व
लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची
ही माहिती हातोहात मिळावी
हा ह्या 'भ्रमणा' चा प्रमुख हेतु.